
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. २२५४
१९६५



REFBK-0014486

# र[illegible]भीं आठवा

पुस्तक सं. ३८५५१ वि. चारित्र
ग्रंथांक १२५८ प्र. दि. ९३।११।५५

# चंद्र नभीं आला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ... वि: चरित्र
क्रमांक १२५४ नों: दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## उमाशंकर

REFBK-0014486

श्री. तु. चों. तथ [illegible] र समिति, मुंबई

मूल्य : १ रुपया

# समितीचें निवेदन

श्री. तुकाराम धोंडबाराव तथा दादासाहेब मोरे यांनीं गेल्या पंचवीसतीस वर्षांत केलेल्या सामाजिक सेवेचा गौरव करून त्यांचें चरित्र प्रसिद्ध करावें असा विचार अनेक दिवस आमच्या मनांत वसत होता. त्यांनीं दि. १५-६-१९६५ रोजीं छपन्नाव्या वर्षांत पदार्पण केलें आणि तत्पूर्वी महाराष्ट्र सरकारतर्फे त्यांना जे. पी. असा बहुमानहि मिळाला हा योग साधून आम्ही त्यांचे मित्र, चाहते आणि सहकारी आमच्या मनीषेला मूर्त स्वरूप देत आहोंत. दिनांक २० जून १९६५ रोजीं महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री नामदार श्री. पी. क. तथा बाळासाहेब सावंत यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचा सत्कार घडवून आणून श्री. गं. गो. ऊर्फ बाबासाहेब गावडे यांच्या हस्तें त्यांच्या या जीवनचरित्राचें प्रकाशन करीत आहोंत.

ह्या चरित्राचें लेखन चालू असतांना आम्हांला अनेकांचें सहकार्य लाभलें. श्री. दादासाहेबांच्या जीवनाविषयीं आणि त्यांच्या आतांपर्यंतच्या कार्याविषयीं आम्हांला अनेकांकडून जी माहिती मिळाली तिच्यामुळेंच हें चरित्र या स्वरूपांत आकार घेत आहे. आम्हांला या बाबतींत सहाय्य करणाऱ्या पुढील व्यक्तींचे आम्ही ऋणी आहोंत.

सवश्री रा. ना. शिंदे, नानू संझगिरी, रा. भि. अंगणे, ग. शि पंडित, ना. पु. देवधर, रा. रा. शिंदे, अ. कों. राजेशिर्के, स. य. कदम, र. बा. देसाई, बा. गो. देसाई, सो. ना. चव्हाण, द. ज. पवार, आ. ना. पवार, अ. शि. आंब्रे, शं. य. मोरे, शंकरराव शिंदे, बाळकृष्ण खामकर, बापूसाहेब सावंत, विनायकराव सावंत, अनंतराव शिर्के, राममोहन इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक श्री. व्यं. ना. नाईक, सौ. वत्सलाबाई मोरे आणि श्री. ल. पंडित.

त्याचप्रमाणें प्रभात प्रोसेस स्टुडिओचे मालक श्री. विष्णुपंत कडव यांनीं फोटोचे ब्लॉक्स करून दिले, श्री. चंद्रकांत यांनीं पुस्तकाचें मुखपृष्ठ विनामूल्य तयार केलें, राष्ट्रवैभव प्रेसचे श्री. जयराम दिपाजी देसाई यांनीं अल्पावधींत छपाईचें काम दक्षतेनें पूर्ण केलें आणि कॉन्टिनेंटल् ट्रेडिंग कॉरपोरेशनचे मालक श्री. हरगोविंददास यांनीं पुस्तकासाठीं कागद पुरविला याबद्दल आम्ही या सर्वांचे आभारी आहोंत.

प्रस्तुत चरित्र–लेखनाची कामगिरी आमचे स्नेही श्री. उमाशंकर यांनीं आस्थेनें पार पाडली याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत. श्री. राजाराम रामाजी शिंदे यांनीं त्यांना या कामीं जें सहाय्य दिलें याबद्दलहि आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

या चरित्राला पृष्ठांची मर्यादा पडली असल्यामुळें अनेक व्यक्ती आणि संस्था यांचा उल्लेख करतां आला नाहीं याची आम्हांला जाणीव आहे. कोणीहि अपसमज करून घेणार नाहीं अशी आम्हांला आशा आहे.

श्री. दादासाहेबांच्या जीवनकार्यावर टाकलेला हा प्रकाश अनेकांच्या पाऊलवाटेपर्यंत पोंचेल अशी आम्हांला उमेद आहे.

सदस्य
श्री. तु. घों. तथा दादासाहेब मोरे,
सत्कार समिति, मुंबई.

---

मुखपृष्ठ : श्री. चंद्रकांत

प्रकाशक :

श्री. राजाराम रामाजीराव शिंदे,
सर चिटणीस,
श्री. तु. घों. ऊर्फ दादासाहेब मोरे सत्कार समिति, मुंबई.

मुद्रक :

श्री. जयराम दिपाजी देसाई,
राष्ट्रवैभव प्रेस,
गिरगांव, मुंबई ४.

ज्या मातेनें आपल्या पुत्राच्या भवितव्यासाठीं
खेडें सोडून मुंबई गांठली त्या
कै. कृष्णाबाई धोंडबाराव मोरे
यांना
**सादर अर्पण**



श्री. तुकाराम धोंडबाराव तथा दादासाहेब मोरे

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे
अ. क्र. १२५४८६
ता. २३।११।६५

*********

# १

# गाडी हलली... घुंगुर वाजले

चिपळूण शहराच्या दक्षिणेस सताराअठरा मैलांच्या अंतरावर कापशी नदी पावसाळ्यांत दुथडी भरून खळखळत अरबी समुद्राकडे धाव घेते आणि उन्हाळ्यांत कोरडी होते. पावसाळ्यांत फुगण्याचा व उन्हाळ्यांत सुकण्याचा तिचा परिपाठ गेलीं शेंकडों वर्षें अखंड चालू आहे. तिच्या गतींत, दिशेंत किंवा पात्रांत यत्किंचितहि फरक पडलेला नाहीं.

परंतु कापशी नदीच्या दक्षिण कांठावर वसलेलें तुरंबव खेडें गेल्या साठसत्तर वर्षांत पार बदलून गेलें आहे. आतां, १९६५ मध्यें तुरंबवची लोकवस्ती दोन हजारांवर गेली आहे. सुमारें अडीचशें उंबरा आहे. नदीनाल्यांवर पूल व साकव आहेत. शाळा, पोस्टऑफिस, विहिरी, दवाखाना इत्यादि सोयी बऱ्यापैकीं आहेत. शिवाय, ज्यांचा अभिमानपूर्वक उल्लेख करतां येईल अशी तीसचाळीस सुविद्य माणसें गांवानें मुंबई शहरांत व अन्य ठिकाणीं पाठविलीं आहेत.

साठ वर्षांपूर्वी तुरंबव किर्र अशा दाट झाडीनें वेष्टिलें होतें. वाघाची डरकाळी किंवा कोल्ह्याचें ओरडणें ऐकूं आलें नाहीं अशी सुनी रात्र सहसा जात नसे. सर्व वाड्यांतील एकूण घरांची संख्या शंभराच्या आसपास होती आणि त्यांत लहानथोर पाचशें माणसांचे संसार थाटले होते. कांहीं लोक नोकरीधंद्यासाठी मुंबईस जात. पण बहुतेकजण शेती करून उपजीविका करीत. लंगोटी, सदरा व फेटा हाच त्यांचा पोषाख. गांवांत दहाबारा धोतरें दिसत. ज्यांना शाळेचें दर्शन घडलेलें असे अशींच माणसें धोतरें परिधान करीत. बाकीच्यांच्या लंगोट्या. कांहीं वर्षांनीं लंगोट्यांची जागा पंचांनीं घेतली. हळुहळू पंचे कमी होऊन धोतरें

आलीं. आतां धोतरांच्या बरोबरीनें विजारी आणि पाटलोणी आपल्या ताठ इस्त्रीचा दिमाख दाखवीत आहेत.

त्यावेळीं दिवाळीसारखा सणसुद्धां अगदीं साध्या पद्धतीनें साजरा व्हावयाचा. तांदळाच्या पिठांत गूळ व तीळ घालून "बोरें" करीत. लहान लाडू म्हणजे बोरें. गांवांत करंज्या आल्या त्या फार उशीरां. मुंबईस नोकरी करणारीं माणसें रजा काढून, नवे कपडे घालून गांवीं येत तेव्हां तीं चणे, कुरमुरे, खजूर अशी नवलाईची मिठाई आणीत. तिचा लहान मुलांना केवढा आनंद वाटायचा. आणि मोठ्यांनाहि. गांवांत भावे नांवाच्या ब्राह्मणाचें भुसारी मालाचें एक छोटें दुकान होतें. ह्याच दुकानांतील माल शंभर उंबऱ्यांपर्यंत पोंचत असे आणि साध्या भोळ्या शेतकऱ्यांचे संसार फुलवीत असे.

भाव्यांच्या दुकानाशेजारीं एक शाळा होती. तींत वर्ग होते चार. पण ते एकाच दालनांत भरत असत. शाळेंतील एकूण मुलांची संख्या चाळीसच्या आसपास. मुली शाळेच्या आसपास वावरत नसत हें त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीला धरूनच होतें. शाळेंत येणारी मुलें साधारणपणें थोराडच. लहान वयाचीं मुलें फार थोडीं. पण सर्वांचा पोषाख सारखा. त्यावेळचा तो अलिखित सर्वमान्य गणवेष होता. कुडत्यासारखा सदरा, त्याखालीं लंगोटी आणि डोक्यावर टोपी. टोपीखालीं साफ भादरलेलें डोकें आणि मध्यावर गरगरीत घेरा ऊर्फ भोवरा!

पाटी, दफ्तर, दौत आणि बोरू हें विद्यार्थ्यांचें प्रमुख साहित्य. बिगरींतील मुलें पाट्यापेन्सिली घेऊन धुळाक्षरें घटवींत आणि पहिलीपासून चौथीपर्यंत बोरूंची कुरकूर चालू होई. सकाळीं शाळेची घंटा झाल्यानंतर अभ्यासाला सुरुवात होई ती ह्याच कार्यक्रमानें. आणि शाळा सुटे ती पाढे पर्वचांच्या जयघोषानें.

शाळा सकाळदुपार अशी दोन वेळां भरत असे. पण मास्तर एकच. त्यांचें नांव रायकर. गांवकरी त्यांना "मास्तर" या नांवानें संबोधीत असत. मास्तरांचें शिक्षण 'फायनल'पर्यंत झालेलें असावें. धोतर, सदरा, उपरणें व रुमाल हा त्यांचा पोषाख. रायकर नियमितपणें शाळेंत येत आणि कळकळीनें शिकवीत. मुलें फी देत असत. महिना प्रत्येकीं दोन पैसे. या दोन

पैशांचा मुलांना पुरेपूर मोबदला मिळाला पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. मुलांनीं अभ्यास करून मोठें व्हावें असें त्यांना तीव्रतेनें वाटे. आणि म्हणून विद्यार्थ्यांनीं अभ्यासांत कुचराई केली म्हणजे त्यांचा राग अनावर होई. मग ते मुलांचे हात उलटे करून रूळानें बडवीत असत. कधीं कधीं झाडाच्या शेलाटीनें त्यांना फोडून काढीत. पण गांवकऱ्यांनीं कधीं तक्रार केली नाहीं. कारण, छडीचा प्रसाद भक्षण केल्यावांचून तुरंबवचीश्री शारदादेवी प्रसन्न होणार नाहीं अशी गांवांतील स्त्रीपुरुषांची ठाम समजूत होती आणि त्यामुळें रायकर मास्तर लोकप्रिय झाले होते. गांवांत त्यांना आदर होता. त्यांच्या शब्दाला मान होता.

रायकर मास्तर गांवकऱ्यांशीं एकरूप झाले होते. ते त्यांच्याशी खेळी-मेळीनें बोलत. गप्पागोष्टी करीत. बोलतां बोलतां ते सहज म्हणत, घोंडबा मोऱ्यांचा तुकाराम नांव काढणार!

मोऱ्यांचा तुकाराम हा रायकर मास्तरांचा लाडका विद्यार्थी. त्याच्यावर त्यांचा जीव होता. कारण, तुकाराम कधीं शाळा चुकवीत नसे कीं शाळेंत उशीरां येत नसे. मुलांशीं भांडत नसे कीं मारामाऱ्या करीत नसे. उनाड पोरांच्या नादीं लागून कापशी नदींत मासेखेकडे पकडायला जात नसे. याउलट, त्याचें वर्तन कोणाहि शिक्षकाला आवडेल असेंच असायचें. तो वर्गांत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरें बिनचूक देई. नेमून दिलेला अभ्यास चोख तयार करून येई आणि रायकर मास्तर खूष होत.

तुकारामाला खेळांचे आकर्षण कधीं वाटलें नाहीं. विटीदांडू, गोट्या किंवा लगोरी खेळण्यांत त्याचें मन कधीं रमलें नाहीं. पण त्याला निसर्गाची ओढ होती. रविवारीं किंवा अन्य सुटीच्या दिवशीं तो गुराख्यांबरोबर गांवाबाहेर पडे. निळे निळे आकाश, पांढरे तरंगते ढग आणि पक्ष्यांची भरारी पाहण्यांत त्याचें मन रमून जाई. निसर्गाच्या सान्निध्यांत त्याचा जीव सुखावून जाई.

त्याचे मित्रहि मोजके होते. श्री. गणपतराव शिवराम पंडित व श्री. तुकाराम शिवराम पंडित हे त्याचे शाळा-सोबती. श्री. गणपतराव सध्यां जॉर्ज ओक्स कंपनींत एका हुद्याच्या जागीं आहेत. ते बालपणींच्या आठवणी सांगतांना म्हणतात, श्री. दादासाहेब मोरे आणि मी एकाच वर्गांत होतों.

दादासाहेब माझ्यापेक्षां फक्त सहा महिन्यांनीं वडील. त्यांचें माझें अगदीं सुरळीत चालत असे. लहानपणीं आम्हीं कधीं भांडलों नाहीं. नंतरहि भांडलों नाहीं. याचें श्रेय मुख्यतः दादासाहेबांनाच द्यावें लागेल. कारण स्वभावानें ते अत्यंत सोशीक आणि मनमिळाऊ होते.

रायकर मास्तरांनीं आपल्या मुलाबद्दल वारंवार प्रशंसोद्‌गार काढावेत याचा धोंडबाराव मोऱ्यांना हर्ष होई आणि पुत्राबद्दल अभिमानहि वाटे. आणखी एका गोष्टीचा त्यांना अभिमान वाटायचा. तो त्यांच्या घराण्याचा. मोरे वंशाचा. आपण जावळीच्या शूर चंद्रराव मोऱ्यांच्या घराण्यांतील आहोंत ही जाणीव त्यांच्या मनावेगळी कधींहि झाली नव्हती.

जावळीचा मुलूख श्री शिवाजीमहाराजांनीं आपल्या ताब्यांत घेतल्यानंतर चंद्रराव मोरे यांच्या वंशांतील कित्येक कुटुंबें आपलीं नांवें बदलून तेथेंच राहिलीं तर कांहीं परागंदा झालीं. ज्यांनीं त्यावेळीं जावळी प्रांत सोडला त्यांत कृष्णराव मोरे यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. कृष्णराव निघाले ते गौशाबंदर ऊर्फ गुहागरपासून दहाबारा मैलांवर पिंपर येथें वसाहत करून राहिले. कृष्णरावांनीं पिंपर येथें भुईकोट किल्ला बांधला आणि सुरक्षिततेसाठीं सभोंवतालीं २५ फूट खोलीचा व १२ फूट रुंदीचा खंदक खणला. किल्ल्यांत त्यांनीं कुळस्वामिनी सोमजाई (पार्वती) आणि केदारनाथाचीं सुंदर देवालयें बांधलीं. सांजसकाळ देवालयांत गंभीर घंटानाद होऊं लागला आणि कृष्णरावांच्या कर्तृत्वाचा सुगंध आसमंतांत दरवळूं लागला.

पिंपर येथील एक घराणें शिरळ येथें रहावयास गेलें. त्या घराण्यांतील श्री. गोपाळराव मोरे यांच्याकडे ताम्रपट व वंशावली अद्यापपावेतों आहेत.

धोंडबाराव मोरे यांचे पूर्वज उपरोक्त पिंपरगांवींच रहात होते. ते १९३० च्या दरम्यान तुरंबत येथें आले. तुरंबव हें त्यांचें आजोळ आणि कर्मधर्मसंयोगानें धोंडबारावांची सासुरवाडीहि तुरंबव हीच.

धोंडबारावांचे शिक्षण मराठी चौथीपर्यंत झालें होतें. ते सज्ञान झाल्यानंतर त्यांनीं बडोदें संस्थानांत लष्करांत नोकरी धरली. ते पायदळांत एक दुय्यम अधिकारी होते. ते लष्करांतून निवृत्त झाले त्यावेळीं त्यांना पांच रुपये पेन्शन मिळालें. शेती व पेन्शन यांवर धोंडबारावांचा संसार त्या स्वस्ताईच्या दिवसांत सुखानें चालला होता.

धोंडबारावांना पांच अपत्यें. तीन मुली व दोन मुलगे. सर्वांत मोठी मुलगी लहानपणींच कालवश झाली. दुसरी कन्या नर्मदाबाई. योग्य वेळीं हिचा विवाह भोर संस्थानांतील खोडद्याचे जमीनदार श्री. साळवी यांच्याशीं मोठ्या इतमामानें झाला. परंतु दुर्दैवानें विहिरींत पडून तिचा अंत झाला. तिसरें अपत्य गंगूबाई. यांचा विवाह तुरंबवचे श्री. बापूजी पंडित ऊर्फ पवार यांच्याशीं झाला. सौ. गंगूबाई पंडित यांचें वास्तव्य सध्यां तुरंबव येथेंच आहे.

गंगूबाईच्या जन्मानंतर सहा वर्षांनीं १५ जून, १९१० रोजीं सकाळीं साडे नऊ वाजतां धोंडबारावांना पुत्ररत्न प्राप्त झालें. नामकरण विधि होऊन त्याचें "नारायण" असें नांव ठेवण्यांत आलें. धोंडबारावांच्या सासऱ्यांचेंहि नांव नारायणच. आपल्या मुलाला एकेरी हांक मारीत असतांना सासऱ्यांचा अवमान होण्याची शक्यता आहे हें ओळखून धोंडबाराव आपल्या मुलाला "तुकाराम" ह्या नांवानें संबोधूं लागले.

तीन मुलीनंतर जन्मास आलेला "तुकाराम" सर्वांना हवाहवासा वाटे. सर्वांच्या तोंडीं तुकाराम हेंच नांव खेळूं लागलें. तेंच रुळलें. आणि शाळेंत नांव लागलें तें तुकाराम धोंडबा मोरे असेंच.

धोंडबारावांना पुनः अपत्यलाभ झाला. ह्या मुलाचें नांव सीताराम. पण काळानें सीतारामावर बालपणींच झडप घातली.

धोंडबाराव शेतावर काम करीत. पण एके दिवशीं ते शेताला गेलेच नाहींत. बरें वाटत नाहीं म्हणून त्यांनीं अंथरूण धरलें तें कायमचेंच. त्यांचा आजार तीनचार महिने रेंगाळला आणि अखेर क्षीण होऊन वयाच्या पन्नासाव्या वर्षीं त्यांनीं इहलोकाची यात्रा संपविली. ( इ. स. १९२० )

छोट्या तुकारामानें बालपणीं दोन मृत्यु पाहिले. एक आपल्या चिमुकल्या भावाचा आणि दुसरा पित्याचा. बालमनाला मृत्यूचें भीषण स्वरूप जाणवत नाहीं असें म्हणतात. तुकारामाचेंहि साधारणतः तसेंच झालें. पित्याच्या निधनानें आपल्यावर कोणती भयानक आपत्ति कोसळली आहे याचें त्या अजाण मनाला आकलन झालें नाहीं.

पण एका दृश्यानें तो हादरून गेला. आपल्या आईचें दुःख पाहून त्याच्या मनाचा थरकांप उडाला.

नातलगांनीं पुत्राच्या हस्तें धोंडबारावांचा अंत्यसंस्कार पार पाडला. परंतु गतधवा पत्नीचें दुःख कोणालाहि हलकें करतां आलें नाहीं.

पतिनिधनाचा कृष्णाबाईंच्या मनावर तीव्र आघात झाला. त्यांच्या भावना गोठून गेल्या. मन विषण्ण झालें. भविष्यकाळ भेसूर दिसूं लागला. त्या एकसारख्या विचार करूं लागल्या. पुढें काय?... ..उलटसुलट विचारांचें त्यांच्या मनांत थैमान सुरू झालें. मनाशी योजलेल्या बेतांची भयानकता भेडसावूं लागली......अशा अवस्थेंत कांहीं दिवस निघून गेले. आणि अखेर त्यांनी निर्णय घेतला.

घरांतील कोंबड्यानें पहिली बांग देण्यापूर्वीच त्या उठल्या. स्नान केलें. देवपूजा आटोपली. त्यांनीं मुलाला उठवलें. त्याला आंघोळ घातली आणि कपाळावर गंधाचा टिळा टेकला.

"आपल्याला निघायचं आहे," आईनें म्हटलें.

"कुठं?" पुत्रानें भीतभीत दबलेल्या आवाजांत विचारलें.

"मुंबईला." आईनें उत्तर दिलें.

मुंबई! तुकारामानें मुंबई हें नांव अनेकदां ऐकलें होतें. त्याचें कुतूहल जागृत झालें. त्याच्या डोळ्यांपुढें मुंबईची काल्पनिक चित्रें तरंगूं लागलीं.

घराबाहेर एक बैलगाडी उभी होती. तींत तुकाराम गाडीवानाच्या शेजारीं बसला. कृष्णाबाईंनीं पदर सांवरीत, अश्रु ढाळीत, वाडींतील वडीलधाऱ्या मंडळींना वांकून नमस्कार केला, त्यांचे आशीर्वाद घेतले आणि कुळस्वामीनीचें नांव घेऊन त्याहि गाडींत चढल्या.

आतां मुंबईला निघायचें. तुकारामाचें मन आनंदानें बहरून निघालें परंतु मुंबईला जाण्याच्या कल्पनेपेक्षां त्याला एका वेगळ्याच गोष्टीचा आज अपार आनंद होत होता.

त्यानें आज लंगोटी घातली नव्हती. नवी पँट चढविली होती!

लंगोटीऐवजीं निळी अर्धी पँट!

गाडीवानानें बैलांना इशारा दिला. गाडी हलली आणि बैलांच्या गळ्यांतील मोठ्या घुंगरांचा कर्ण-मधुर आवाज झाला......

खुळ् खुळ्ळ्! खुळ् खुळ्ळ्!......

२

# मुंबई आली !

तुरंबवहून सकाळीं निघालेली बैलगाडी सूर्य माथ्यावर येण्याच्या सुमारास चिपळूणला पोहोंचली. तेथें कांहीं वेळ विश्रांति घेतल्यानंतर पुनः बैल गाडीला जुंपले गेले ते थेट गोवळकोटला येऊन थांबले. असा हा हाडें खिळखिळा करणारा बैलगाडीचा एकवीस मैलांचा प्रवास संपला.

गोवळकोटच्या धक्क्यावर तुकारामाला अज्ञात अशा जगाचें दर्शन घडलें. तेथें कितीतरी माणसें बोचकीं बांधून बसलीं होतीं. समाजाच्या सगळ्या थरांतलीं. सुखवस्तु तशींच कामकरी. ब्राह्मण, मराठे नि अस्पृश्य. विस्तीर्ण खाडींत निळेंहिरवें संथ पाणी पसरलें होतें. त्यावर अनेक लहानमोठीं होडकीं व नावा तरंगत होत्या. कांहीं स्थिर होत्या. कांहींची येजा चालू होती. धक्क्याशीं लगट करून उभी होती ती हाजी कासीमची बोट. त्या बोटींत तुरंबवचीं मायलेंकरें बसलीं.

हाजी कासमची बोट धक्क्यापासून दूर झाली तेव्हां तुकारामाला कळून आलें कीं, धक्क्यावर जेवढीं माणसें जमलीं होतीं त्यांपैकीं फक्त पंचवीस तीस लोक बोटींत चढले आहेत, बाकीचे शंभर सव्वाशें स्त्रीपुरुष धक्क्यावरच उभे आहेत. ते सारे लोक निरोप द्यायला आले होते तर !

“ बाबा, जपून जा हो, कागद लिव हं. ” अशी धक्क्यावरील माणसें परोपरीनें सांगत होतीं. “ घराकडे लक्ष दे हं ” असा प्रतिसाद बोटींतील लोक देत होते. बोटीनें शंभर दीडशें फूट अंतर कापल्यावर धक्क्यावरील लोकांचीं फडकीं आणि लुगड्याचे शेव हलूं लागले. बोटींतील लोकांचीहि फडकीं बाहेर आलीं आणि तीं हलूं लागलीं. बोट मैल दीड मैल लांब जाऊन ती डोंगराआड होईपर्यंत फडकीं हलवून निरोप देण्याचा कार्यक्रम चालला

होता. हा लोकविलक्षण निरोप समारंभ तुकारामाच्या स्मृतिपटलावर कायमचा चिकटून राहिला.

गोवळकोटहून दाभोळ बंदर पंचवीस मैल. सुमारें तीस उतारू घेऊन निघालेल्या बोटीनें मधलीं बंदरें घेत घेत, हें अंतर केव्हां कापलें तें तुकारामाच्या लक्षांतहि आलें नाहीं. खाडीच्या दोन्ही कांठावरील रम्य वनश्री पाहण्यांत त्याचें मन दंग झालें होतें.

दाभोळ बंदरांत माणसांची केवढी गर्दी ! बहुतेक सारे प्रवासी मुंबईला जाणारे. इतर कांहीं उतारूंप्रमाणें तुरंबवच्या प्रवाश्यांनी बरोबर आणलेली शिदोरी सोडली व रात्रीचें जेवण एका खाणावळीच्या दाराशीं बसून उरकून घेतलें.

आठाच्या सुमारास एक मोठी बोट धूर ओकीत दाभोळ बंदरांत शिरली तसा एकच गलका उडाला. उतारूंची धांवपळ सुरू झाली. कांहीं लोक खाणावळींत जेवणासाठीं बसले होते. खाणावळवाल्यानें घाईघाईनें गरमगरम भात वाढला. त्यावर मासळीचें कोरड्यास ओतलें. आपली बोट चुकेल या भीतीनें प्रवाश्यांनीं वाफ येणाऱ्या भाताचे चार घास गळ्याखाली फेकले आणि हात धुतले. पोटभर गरम भात खाण्याला त्यांना वेळ होता कुठें ?

बोट बंदरांत घुसतांच खाणावळवाल्यांनीं प्रवाश्यांच्या ताटांत थोडासा गरम भात वाढावा, बोट चुकेल या कल्पनेनें त्यांनीं तो अर्धवटच सोडावा, पण पूर्ण जेवणाचे पैसे आधींच चुकते केलेले असल्यामुळें धांवत धांवत बोट पकडावी, असा प्रकार दाभोळ बंदरावर अद्यापिहि चालू आहे. पण तुकारामाने तो प्रथमच पाहिला होता.

कृष्णाबाईनीं आपलें अख्खें आणि तुकारामाचें अर्धें अशीं तिकिटें आधींच काढलीं होतीं. मोठ्या माणसाला गोवळकोटहून मुंबईला दीड रुपया आणि मुलांना बारा आणे.

इशारा होतांच इतर प्रवाश्यांबरोबर कृष्णाबाई मुलांसह बोटींत चढल्या. भोंगा झाला आणि बोट बंदराबाहेर सरकूं लागली.

बोटींत सुमारें दोनअडीचशें उतारू होते. स्त्रिया, पुरुष, मुलगे व मुली. कुणी विड्या ओढीत होते, कुणी पान खात होते, कुणी जेवीत होते तर

कुणी झोंपी गेले होते. पण बरीचशी माणसें बोलत बसलीं होतीं. हें सारें दृश्य तुकारामाला नवें होतें. तो कांहींसा बावरून गेला असला तरी त्याचें संवेदनाक्षम मन नव्या गोष्टी उत्सुकतेनें टिपून घेत होते. तें करीत असतांनाच त्याचें अंतःकरण भारावून गेलें तें समुद्राच्या अमर्याद विस्तारानें. कापशी नदीच्या प्रवाहावरून त्यानें समुद्राचा अंदाज बांधला होता. त्याच्या बुद्धीला वाटलें होतें, समुद्र कापशीपेक्षां शंभर पट मोठा असेल. पण प्रत्यक्षांत तो दशसहस्र पट–नव्हे लक्षपट मोठा होता. समुद्राच्या अफाट विस्तारानें तो चकित झाला. बोट जसजशी किनाऱ्यापासून दूर जाऊं लागली तशा समुद्राच्या सीमा दूरदूर सरकूं लागल्या आणि तुकारामाच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं.

ह्या आश्चर्यानें नाना रूपें धारण केलीं. एक म्हणत होतें, ह्या अफाट पाण्यावर एवढीशी बोट तरंगते कशी ? ती बुडत कशी नाहीं ? ...बोटी बुडाल्याच्या गोष्टी तुकारामानें ऐकल्या होत्या. त्या जाग्या होऊन त्यांनी भीति घातली, मोठें वादळ होऊन ही बोट बुडणार तर नाहीं ? ती फुटून बुडूं लागली तर काय करायचें !...

पण बराच वेळ झाला तरी वादळ झालें नाहीं नि बोट बुडाली नाहीं. बोट ज्या रीतीनें पुढें सरकत होती त्याच वेगानें त्याचें विचारचक्र सुरू होतें. त्या चक्रावर फिरतां फिरतां, समुद्रावरील गार वाऱ्याच्या झुळकींत, त्याच्या पापण्या मिटल्या. दिवसभराच्या प्रवासानें त्याला गाढ निद्रा लागली.

त्याला जाग आली तेव्हां चांगलें उजाडलें होतें. तो उठून बसला. लोक बोलत होते, ती बघा मुंबई.

तुकारामानें डोळे विस्फारून पाहिलें आणि त्याच्या कोंवळ्या ओठांतून कुतूहलाचे शब्द बाहेर आले, मुंबई आली !

*********

# ३

# आतां मी इंग्रजी शाळेंत जाणार !

बोट भाऊच्या धक्क्याला लागली तेव्हां तुकारामाच्या पूर्वसंचित ज्ञानाला धक्का बसला. समुद्राच्या कांठाशीं त्याला मोठमोठ्या इमारती दिसल्या. पाण्यापासून अगदीं थोड्या अंतरावर. त्याला आश्चर्य वाटलें, समुद्राचें पाणी ह्या इमारतींत शिरत कसें नाहीं ? समुद्राला पूर येऊन त्या वाहून कशा जात नाहींत ?...त्यानें कापशी नदीचा पूर पाहिला होता. नदीच्या प्रवाहापासून किती तरी दूर अंतरावर घरें आणि झोपड्या बांधलेल्या असायच्या. तुरंबवच्या लोकांना पुराची भीति वाटायची. मुंबईच्या लोकांना समुद्राच्या पुराचें भय वाटत नाहीं काय ?

कृष्णाबाईंना उतरून घ्यायला त्यांची एक आतेबहीण आली होती. तिनें पाहुण्यांना घोड्याच्या गाडींत बसवून आपल्या बिऱ्हाडीं आणलें.

बोहऱ्याची चाळ. ग्रँट रोडवर नॉव्हेल्टी सिनेमासमोर ही चाळ अद्यापिहि उभी आहे. पूर्वीपेक्षां माणसांनीं अधिक गजबजलेली आहे.

कृष्णाबाईंच्या आतेबहिणीचें याच चाळींत बिऱ्हाड होतें. ह्या बिऱ्हाडांत तुरंबवच्या मायलेकरांचें मोठ्या आस्थेनें स्वागत झालें.

तुकारामानें मुंबईसंबंधीं ज्या कल्पना उराशीं बाळगल्या होत्या, जे आडाखे बांधले होते, ते येथें आल्यानंतर साफ ढांसळून गेले. त्याला वाटलें होतें, मुंबईत कापशी नदीपेक्षां एखादी मोठी नदी असेल, दहाबारा ओढे असतील, मोठीं शेतें असतील, चाळीस पन्नास रस्ते असतील आणि शें दीडशें वाड्या असतील. पण त्याला येथें दिसलें तें सारेंच विचित्र. येथें नद्या नव्हत्या, ओढे नव्हते आणि शेतेंहि नव्हतीं. येथें असंख्य रस्ते आणि त्यांच्या दोन्ही बाजूंना मजले असलेल्या मोठ्या इमारती होत्या. त्यांत बिऱ्हाडें,

नाना प्रकारचीं दुकानें, हॉटेलें, दारूचे गुत्ते नि कचेऱ्या होत्या. व्हिक्टोरिया, मोटरी आणि ट्रॅम गाड्या यांची एकसारखी धावपळ चालली होती. आणि माणसें तरी किती ? जत्रेला जमावींत इतकीं. निरनिराळा पोषाख केलेलीं. वेगवेगळ्या भाषा बोलणारीं. त्याला वाटलें, हीं इतकीं माणसें मुंबईला कशासाठीं आलीं आहेत ? इथें दररोज एखादी जत्रा भरते कीं काय ?

दिवसगत होऊं लागली तशी तुकारामाच्या कुतूहलाला उत्तरें मिळूं लागलीं. उत्तरें मिळूं लागलीं तीं दृश्य गोष्टींच्या प्रत्यक्ष परिचयानें. ट्रॅमचें त्याला मोठें कुतूहल. म्हणून त्यानें ट्रॅमच्या पुढील भागाला स्पर्श करून पाहिला तों हॅन्डलच्या खालच्या भागाला लावलेला काळा रंग त्याच्या दोन्ही हातांना चिकटला. त्या रंगाची निशाणी घेऊन त्यानें कुलाब्यापर्यंत प्रवास केला. रंगाच्या रूपानें जणुं त्याच्या मनावर मुंबईचा पहिला संस्कार घडला.

कृष्णाबाई जो हेतु मनाशीं बाळगून मुंबईस आल्या होत्या तो सिद्धीस जाण्यास त्यांना फार दिवस वाट पहावी लागली नाहीं. त्यांना उदरनिर्वाहाचें साधन हवें होतें. तें त्यांना मिळालें. त्यांना गिरगांवांतील मंगळदास मिलमध्यें काम लागलें.

गिरगांवांतील ही मंगळदास मिल स्वदेशी मिल्सच्या आवारांत, रॉक्सी चित्रपटगृहाच्या मागें होती. गांवदेवीलाहि एक गिरणी होती. तिचें नांव व्हिक्टोरिया मिल्स. कांहीं वर्षांनंतर या दोनहि गिरण्या त्या भागांतून हलविण्यांत आल्या.

कृष्णाबाईंना मंगळदास गिरणींत महिना १५ रुपये पगार होता. १९१८ सालामध्यें गिरण्यांचा जो सार्वत्रिक संप झाला होता त्याचें फलित म्हणून गिरणी कामगारांच्या पगारांत वाढ झाली होती. पुरुषांचा पगार वीसपंचवीस रुपयांच्या आसपास आणि स्त्रियांचा त्यांच्यापेक्षां चारपांच रुपयांनीं कमी.

त्या पंधरा रुपयांत कृष्णाबाईनीं सुखाचा संसार थाटला. त्यांना टंचाई कशी ती भासलीच नाहीं. कारण त्यावेळचे दिवसच वेगळे होते. स्वस्ताईचे. पुन्हा कधींहि न येणाऱ्या स्वस्ताईचे. रुपयाचे तांदूळ आणि रुपयाचे जोंधळे घेतले कीं ते दोन माणसांना महिनाभर पुरत. तीन किंवा चार आणे शेर

दूध. गिरण्यांचा संप झाला म्हणजे मिशीवाले भय्ये चाळीचाळींतून फिरून दोन आणे शेराप्रमाणें दूध विकीत. एका पैला खोबऱ्याचा तुकडा; पैला मूठभर हिरव्या मिरच्या, आलें व कोथिंबीर; आणि तिसऱ्या पैला कांदेलसूण. एका पैशांत बहुतेक सगळा मसाला. एक पैशाची भाजी घेतली तर ती दोन्ही वेळेला पुरायची. पाहुणा आला तर पैशाची साखर, पैशाचा रवा आणि पैशाचें तूप घेऊन त्याला पोटभर शिरा घालतां येई.

माधवाश्रमांतील पहिल्या प्रतीच्या भोजनाचा मासिक दर रुपये बारा, गिरणगांवांत पुरुषांना पांच रुपये व बायकांना चार रुपये अशी 'खाणावळ'. बेकार माणसाच्या खिशांत एक आणा असला म्हणजे तो सबंध दिवसभर निर्धास्त असे. त्या एका आण्यांत मसाल्याचा मोठा पाव, बशीभर उसळ आणि सिंगल चहा मिळायचा. मुलांनी पैशाची सुकी भेळ घेतली तर दोन्ही खिसे भरायचे. पैची चिक्की घेतली तर ती संपेपर्यंत तोंड दुखायचें.

पान खाणाऱ्यांची हौस एका पैशांत भागायची. पैला आठ पानें. त्या पानांना पुरेल इतकी पैला सुपारी आणि दिवसभर संपणार नाहीं एवढा पैला तंबाखू. विड्या ओढणाऱ्यांची दिवसभरची तलफ दोन पैशांत भागायची. एका पैशाला चौदा विड्या आणि पैशाला हरण छापाच्या दोन काड्यांच्या पेट्या.

सातआठ आण्यांत दुकानांत चांगला शर्ट मिळे. शर्ट मनाप्रमाणे बेतून घ्यायचा असला तर शिलाईसाठीं सहा पैसे किंवा दोन आणे मोजायचे. लांब पाटलोणीस एक रुपया द्यावा लागे. अडीच रुपयांपासून पुढें धोतरजोड्या आणि तीन रुपयांना नऊवारी लुगडें मिळे. वर चार आणे टेकले म्हणजे रंग न जाणारा धारवाडी खण.

दुपारच्या वेळीं ट्रॅमचा दर दोन पैसे आणि सकाळसंध्याकाळीं चार पैसे. त्या चार पैशांच्या तिकिटांत उतारूला तीनदां ट्रॅम बदलण्यास मुभा असे.

त्यावेळीं रहाण्याची जागा हवी तेवढी आणि हवी तेव्हां मिळे. लहान खोल्या महिना चारपांच रुपये भाड्यानें मिळत. पंधरावीस रुपयांत मोठी प्रशस्त डबलरूम मिळे. निम्म्या अधिक घरांच्या भिंतींवर किंवा फाटकांवर 'जागा भाड्यानें देणें आहे' अशा लहान पाट्या असत. संसारी माणसांनीं बिऱ्हाड बदलायचा विचार सकाळीं करावा आणि संध्याकाळीं दुसऱ्या इमारतींत संसार थाटून यथेच्छ आमटीभात खावा असे ते दिवस होते.

अशा दिवसांत पहिला पगार होतांच आपल्या लाडक्या मुलाला नवे कोरे कपडे घालून शाळेंत पाठविणें कृष्णाबाईंना कठीण वाटलें नाहीं. मराठी तिसरींत असतांनाच तुकारामाला तुरबेवची शाळा सोडावी लागली होती. आणि म्हणून त्याला मुंबईत लॅमिंग्टन रोड वरील मराठी शाळेंत प्रवेश मिळाला तोहि तिसऱ्या इयत्तेंतच. ( १९२० )

एकदां बोहऱ्याच्या चाळींत एक ज्योतिषी आला. सर्वसाधारपणें ज्योतिषी कुंडली मांडून किंवा तळहातावरील रेषा पाहून भविष्य वर्तवितात. पण हा हस्तसामुद्रिक तळहातावरील रेषा न पाहतां, हात उलटा करून त्यावरील रेषा व चिन्हें तपाशीत असे आणि भूतभविष्य सांगत असे.

या भविष्यवाद्यानें चाळींतील अनेकांचीं भविष्यें वर्तविली. तुकारामाचेंहि भविष्य सांगितलें. तें सांगतांना तो म्हणाला, या मुलाच्या हातांत राजयोग आहे. त्यावर कुणीसें म्हटलें, राजयोग म्हणजे काय? ज्योतिषीबुवानें स्पष्टीकरण केलें: मुलाच्या हातांत राजयोग आहे याचा अर्थ तो संस्थानिक होईल असें नव्हें. ज्याच्या हातांत राजयोगाचीं चिन्हें असतात तो मोठ्या लोकांत वावरतो, त्याचा राजे लोकांशीं संबंध येतो आणि सरकार दरबारांत तो मान्यता पावतो.

हें भविष्य ऐकून कृष्णाबाईंना समाधान वाटलें. भविष्यवाद्याला भरपूर कमाई झाली.

तुकारामाला तिसऱ्या इयत्तेंत जे वर्गशिक्षक लाभले त्यांचें नांव करंदीकर. चौथीचे वर्गशिक्षक दामले आणि मुख्याध्यापक जोशी. जोशी मास्तर डोकीला रुमाल बांधीत, खांद्यावर उपरणें घेत आणि पायांत लाल पुणेरी जोडे चढवीत. त्या लाल जोड्यांचा सर्वांना दरारा वाटे. कारण ते वारंवार रुद्रावतार धारण करीत असत.

मुंबर्इंतहि तुकारामानें फार मित्र जोडले नाहींत. कै. सदाशिव बाजी पाटील व श्री नारायण पुरुषोत्तम देवधर हे त्यांचे मराठी शाळेंतील प्रमुख स्नेही. शिक्षण झाल्यानंतर पाटील एका गिरणींत नोकरीस होते. कांहीं वर्षांपूर्वी ते दिवंगत झाले. श्री. देवधर अद्यापिहि मुंबई नगरपालिकेच्या नियंत्रणाखालीं बी. इ. एस्. टी. मध्यें नोकरीस असून ते जून १९६५ मध्यें सेवानिवृत्त होणार आहेत.

त्यावेळच्या आठवणी सांगतांना श्री. देवघर म्हणतात, मोरे माझ्याच तुकडींत होते. अगदीं घोपटमार्गी. त्यांचे फक्त अभ्यासाकडे लक्ष. वर्गांत पहिला नंबर असायचा. सर्व साधारण मुलांना गणित आवडत नसे. पण मोऱ्यांची त्या विषयांत विशेष प्रगति होती.

आपला मुलगा शाळेंत नियमितपणें जातो, स्वेच्छेनें अभ्यास करतो आणि पहिला नंबर पटकावतो याचा कृष्णाबाईंना केवडा अभिमान वाटे. त्याच्याबद्दल कौतुक वाटे. कौतुक वाटे तें आणखी एका दाम्पत्याला. जाधव पतिपत्नींना. सौ. लक्ष्मीबाई आणि श्री. बाळकृष्ण अण्णाजी जाधव यांना. हें तरुण जोडपें बोहऱ्यांच्या चाळींत रहात असे. लक्ष्मीबाई वयानें लहान. त्यांची आणि कृष्णाबाईंची जुनी ओळख. नातलग म्हणून. त्या कृष्णाबाईंना आपल्या आईप्रमाणें मान देत. त्यांच्या सल्ल्यानें वागत. श्रीयुत बाळकृष्णराव मनानें अत्यंत उदार, दिलदार आणि ऐसपैस. तुकाराम लक्ष्मीबाईंना "बायो" म्हणे आणि बाळकृष्णरावांना दादा म्हणून हांक मारी. तुकारामाची अभ्यासांतील प्रगति पाहून बाळकृष्णदादांना आनंद होई. ते त्याची पाठ थोपटीत.

अशा रीतीनें दोन वर्षें निघून गेलीं. १९२२ मध्ये एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यांत तुकाराम एके दिवशीं शाळेंतून अत्यंत आनंदानें घरीं आला. आई गिरणींतून यावयाची होती. त्यानें तिची अत्यंत अधीरतेनें वाट पाहिली. संध्याकाळीं आई आली तेव्हां त्यानें पुढें होऊन खिशांतील परीक्षेचें निकालपत्र बाहेर काढलें नि म्हटलें, आई, मी पास झालों. माझा पहिला नंबर आला !

कृष्णाबाईंच्या डोळ्यांत आनंदाश्रु डवरले. त्यांनीं प्रेमभरानें पुत्राच्या मस्तकावरून हात फिरविला. तुकारामाचें सर्वांग पुलकित झालें. त्याच्या मनांत सहस्र फुलें फुललीं. त्याच्या मनांतील आनंद उफाळून म्हणाला, आतां मी इंग्रजी शाळेंत जाणार !

*********

# ४

# मातेच्या स्मृतींवर अश्रूंचा अभिषेक

पहिला तास. वर्ग शिक्षक वर्गांत आले. मुलें आदरानें उभीं राहिलीं. "सिट् डाऊन, चिल्ड्रेन्!" मास्तर म्हणाले. मुलें बसलीं. हजेरी घेतल्यानंतर मास्तर म्हणाले, आज वर्गाचा मॉनिटर निवडायचा.

आणि मग मॉनिटर कसा निवडावयाचा यासंबंधीं मास्तरांनीं विद्यार्थ्यांना साद्यंत कल्पना दिली. लगेच निवडणुकीसाठीं नांवें सुचविण्यांत आलीं. मॉनिटरपदासाठीं फळ्यावर जीं नांवें लिहिण्यांत आलीं त्यांत एक नांव होतें—

टी. डी. मोरे

मग हात वर करून विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मतें दिलीं. मास्तरांनीं मोजून तीं फळ्यावर लिहिलीं. विद्यार्थी टी. डी. मोरे यास सर्वांत अधिक मतें मिळालीं होतीं. तो मॉनिटर म्हणून निवडून आला. गिरगांव येथील राम मोहन इंग्लिश स्कूल मधील पहिल्या इयत्तेचा मॉनिटर! मुलांमुलींनीं त्याच्याकडे कौतुकानें पाहिलें. विजयी मॉनिटरच्या मुद्रेवर कृतज्ञतेचें स्मितहास्य उजळलें.

जून १९२२ मध्यें तुकारामाचें नांव राममोहन इंग्लिश स्कूलमध्यें घालण्यांत आलें त्यावेळीं शाळेंत एकून १३८ विद्यार्थी होते. १२० मुलगे आणि १८ मुली. सुप्रसिद्ध प्रार्थना समाजानें १९१७ मध्यें सुरू केलेल्या ह्या शाळेंत प्रथमपासूनच मुली घेण्यांत येत असत. मुलांमुलींना एकाच वर्गांत बसवून शिक्षण देणारी महाराष्ट्रांतील ही पहिलीच इंग्रजी शाळा. ह्या शाळेंत सुरवातीला तीन वर्ग उघडण्यांत आले. नंतर तीन वर्गांची भर घालण्यांत

आली. प्रत्येक वर्गांत सुमारें वीसपंचवीस विद्यार्थी. साधारणतः वीसएक मुलगे आणि तीनचार मुली.

त्यावेळीं रावसाहेब सोहनी शाळेचे प्रिन्सिपॉल होते. श्री. श्रीखंडे हेड्मास्तर. प्रिन्सिपॉल सोहनी यांचा शाळेंत विलक्षण दरारा होता. ते पँट आणि बूट घालायचे. पूर्वींच्या सर्वच शिक्षकांप्रमाणें ते शिस्तीचे कडक भोक्ते. त्यांच्या बुटांचा आवाज झाला की सर्वत्र शांतता होई. मुलें चुपचाप बसत.

राम मोहनचा शिक्षकवर्ग नाणावलेला होता. श्री. पेंढारकर गणित शिकवीत. ज्या विद्यार्थ्यांना गणिताचें वावडें असायचें अशांनाहि त्या विषयाची गोडी वाटावी अशा मोहक हातोटीनें ते शिकवीत असत. सर्वश्री पाटकर, सोवनी, आठले इंग्रजी शिकवूं लागले कीं तास संपल्याची घंटा केव्हां होई ते विद्यार्थ्यांना कळतहि नसे. श्रीमती कृष्णाबाई जव्हेरी मराठी शिकवीत. त्यांचें वाचन दांडगें होतें. त्या लिहीतहि असत. त्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाच्या कुंपणापलीकडे येऊन जात. सरस्वतीच्या मंदिरांत अभावितपणें आणून सोडीत. शास्त्र हा विषय शिकविण्यांत श्री इंगळे यांचा हातखंडा. एके काळीं गाजलेल्या 'चित्रा' साप्ताहिकाचे संपादक डॉ. चिटणीस मराठीच्या तासांना येत आणि शिकवतां शिकवतां विद्यार्थ्यांना राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन प्रांतांचा फेरफटका घडवीत. अशा चतुरस्र शिक्षकांच्या व्यक्तिमत्वानें विद्यार्थी मोहित होत. त्यांना शिक्षकांबद्दल साहजिकच आदर वाटे.

चांगल्या शिक्षणाचा एक विशेष असतो. ज्ञानदानाबरोबर तें मुलांवर चांगले संस्कारहि घडवितें. राम मोहन इंग्लिश स्कूलमध्यें मुलांचें शील घडविण्याच्या क्रियेला महत्त्वाचें स्थान होतें. अभ्यास सुरू होण्यापूर्वी नीति-शिक्षणाचा पाठ असे. हा पाठ वीस मिनिटें चाले. त्यांत विविध विषयांची चर्चा होई. पण ती सारी सद्वर्तनाच्या पार्श्वभूमीवरून. शीलसंवर्धाचा उद्देश ठेवून. जीवनांत कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या, कोणत्या चांगल्या, कोणत्या वाईट, समाजाला काय इष्ट नि काय अनिष्ट इत्यादि गोष्टींचें विद्यार्थ्यांना ह्या चर्चेत दर्शन घडे. ते नीतिपाठांत रमून जात.

मुलांच्या मनावर सुसंस्कार घडविणारा आणखी एक कार्यक्रम राम मोहनमध्यें चालायचा. दर रविवारीं सकाळीं प्रार्थना व्हायची. त्यासाठीं प्रार्थना समाजाचे सभासद, शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षक समाजाच्या उपासना मंदिरांत जमावयाचे. भजन हें प्रार्थनेचें एक विशेष अंग. भजनांत मुख्यतः तुकाराम महाराजांचे अभंग म्हटले जात. प्रार्थना झाल्यानंतर प्रवचन चाले. प्रवचनांत धार्मिक विषयापासून राजकारणापर्यंत सर्व विषयांना स्थान असे. ह्या अशा सर्वस्पर्शी विवेचनामुळे विद्यार्थी बहुश्रुत झाला नाहीं तरच नवल !

याकाळीं प्रार्थना समाजांत सर नारायणराव चंदावरकर. व्ही. जी. भांडारकर, बी. बी. कोरगांवकर, प्रो. एन्. जी. वेलिंगकर, जे. एन्. वैद्य, राव बहाद्दुर आर. आर. काळे, ए. एम्. सय्यद......अशांसारख्या विद्वान् व्यक्तींकडून उपासना होई. अशा थोर लोकांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या जीवनावर पडल्यावांचून कसा राहील !

प्रार्थना समाज हे महाराष्ट्रांतील नेमस्त सुधारकांच्या केंद्रांपैकीं एक प्रमुख केंद्र. सामाजिक ढोंगाविरुद्ध लढणाऱ्या, धार्मिक अन्यायाविरुद्ध बंड करून उठणाऱ्या बालेकिल्ल्यांपैकीं हा एक किल्ला. ह्या किल्ल्यांत रहिवास करण्याची, त्याच्या परिसरांत वावरण्याची ज्यांना ज्यांना संधि मिळाली त्यांच्या अंतःकरणांत समाज सुधारणेची व सेवेची बीजें नकळत खोलवर रुजलीं.

विद्यार्थी मोरे याच वातावरणांत तयार झालेला एक बालसैनिक. येथें त्याच्या दृष्टिसमोर समाजसेवकांचे आदर्श प्रत्यहीं उभे राहात होते. त्याच्या मनावर उदारमतवादित्वाचे संस्कार घडत होते. त्याच्या मनाची घडण सुधारणावाद्यांच्या घाटणीची होऊं लागली होती.

तुकारामाचें मन निरोगी विचारांनीं सुदृढ होत असतांनाच त्याच्या शरिराचाहि योग्य दिशेनें विकास होत होता. तो इंग्रजी शाळेंत जाऊं लागल्यानंतर कृष्णाबाईनीं व त्यांच्या आतेबहिणीनें आपलें बिऱ्हाड बोहऱ्याच्या चाळींतून हलविले होतें. त्या नानाचौकांतील इराण्याच्या चाळींत राहावयास गेल्या होत्या. जवळच, नानाचौकाच्या मागें, एक आखाडा होता. श्री. घागांचा आखाडा. तुकारामाचें मन नकळत या

आखाड्याकडे ओढलें गेलें. त्याची पावलें दररोज सकाळीं आखाड्याकडे वळूं लागलीं. तो जोरबैठका काढीत घुमूं लागला. मोठया आरशांत आपल्या स्नायूंची पीळदार वाढ पाहूं लागला. पण केवळ दंडबैठकांवरच त्याचें समाधान झालें नाहीं. त्यानें लाठीबोथाटी, पट्टा, फरीगदगा इत्यादि ऐतिहासिक कालापासून चालत आलेले मर्दानी खेळांचे प्रकारहि आत्मसात केले. आखाड्यांत जाऊन त्यानें फक्त एकच गोष्ट केली नाहीं. तो कुस्ती खेळला नाहीं. कुस्तीचें आकर्षणच वाटलें नाहीं त्याला. कोणाच्याहि अंगाशी झोंबाझोंबी करणें इष्ट नव्हे असें वाटलें म्हणूनच कीं काय त्यानें चड्डी कसून, लाल मातींत पाय रोवून, दंड थोपटीत, शड्डू मारीत त्यानें कोणाशींहि हातमिळवणी केली नाहीं.

तुकारामाला देशी मर्दानी खेळांची जेवढी आवड होती तेवढीच क्रिकेटचीहि. रविवारीं आणि इतर सुट्टीच्या दिवशीं तो आणि त्याचे स्नेही हातांत बॅट आणि स्टंप्स घेऊन चर्नीरोड स्टेशन जवळील विल्सन कॉलेजच्या जिमखान्यावर जात आणि तेथें उन्हाची पर्वा न करतां तासन् तास ठोकाठोकी करीत.

क्रिकेट खेळायला वीस पंचवीस मुलें जात होतीं खरीं. पण त्यांतील चारच मुलांचा तुकारामाचा विशेष स्नेह होता. कै. जगन्नाथ बाळकृष्ण पालव (मृत्यु १९६० ). श्री. रामचंद्र भिकाजी अंगणे, श्री. नारायण पुरुषोत्तम देवघर, श्री. व्ही. एन्. कामत, आणि श्री. जी. आर. आंजर्लेकर हे त्याचे जिव्हाळ्याचे मित्र. यांतील पहिले तिघे तुकारामासह हँगिंग गार्डनवर अभ्यासाला जात, एकमेकांच्या घरी जाऊन गप्पागोष्टी करीत, केव्हां केव्हां इराणी चाळींत अभ्यासाला बसत आणि अधूनमधून रविवारीं सिनेमाला जात.

त्यावेळच्या आठवणी सांगतांना श्री अंगणे म्हणतात, " आम्ही रविवारीं सकाळीं इंग्रजी चित्रपट पाहायला जात असूं. दर फक्त दोन आणे. तो काळ फक्त चलत्चित्रांचा होता. बोलपट अजून यायचे होते. चित्रें पडद्यावर येऊन झालीं म्हणजे पात्रांचें बोलणें व्यक्त करण्यासाठीं पाट्या यायच्या. त्या पाट्या आम्हांला अर्धवट समजत असत. पण कथानक मात्र कळायचें.

"माझे मित्र आणि मी कै. कृष्णाबाईंना आई म्हणत असूं. आई दिसायला फार उंच नव्हत्या आणि ठेंगण्याहि नव्हत्या. मध्यम उंचीच्या. अंगलट सुद्धां मध्यम. वर्ण गोरा, नाक तरतरीत, डोळे करारी. त्यांत त्यांच्या कर्तृत्वाची छटा स्पष्ट दिसून येई. त्या डोक्यावरून पदर घेत. त्यांचा पदर डोक्यावरून खांद्यावर आलेला आम्ही कधीं पाहिला नाहीं.

"आई मला नाना या नांवानें हांक मारीत. मी त्यांना मुलाप्रमाणें वाटायचा. शाळा सुटल्यानंतर आईच्या हातची गरम भाकरी मी अनेक वेळां खाल्ली होती. मला त्या ममतेनें वाढीत आणि मी आवडीनें जेवीं. आम्हां मित्रमंडळीवर त्यांची फार माया. आम्ही शाळेंतल्या गंमती सांगत असूं आणि आई त्या जिज्ञासेनें ऐकत असत."

श्री अंगणे पुढें म्हणाले, "दादासाहेबांची अभ्यासांतील प्रगति पाहून आईना आनंद होई. ते वर्गांत बहुधा पहिले असायचे. ते आणि प्रो. वसंतराव नाईक यांच्या कन्येमध्यें नेहमीं स्पर्धा असायची आणि त्या स्पर्धेत दादासाहेब पुढें सरकायचे. मी पांच वर्षे राम मोहन इंग्लिश स्कूलमध्यें होतों. त्या अवधींत दादासाहेबांनीं वार्षिक परीक्षेंत पहिल्या क्रमांकाचीं तीन वेळां पारितोषिकें पटकाविल्याचें मला आठवतें. शाळेंत बक्षीसादाखल पुस्तकें व रोख रकमा देत. वर्गांत पहिला येणाऱ्या मुलाला रु. २५ चें बक्षीस मिळायचें. डॉ. काशीबाई नवरंगे यांच्याकडून बक्षीसादाखल बरीचशीं पुस्तकें मिळायचीं. दादासाहेबांना बक्षीसें म्हणून मिळालेल्या पुस्तकांची एक पेटी भरलेली होती. एकदां त्यांचा पहिला नंबर शिक्षकांच्या चुकीमुळें हुकला. दादासाहेबांच्या एका विषयाच्या उत्तरपत्रिकेंतील दोन प्रश्न शिक्षकांनीं तपासलेच नव्हते. त्यामुळें दादासाहेबांचा नंबर खालीं गेला.

"आई म्हणत असत, तुकारामाला शिकवून मोठा करायचा. मी मोठा करणार आहे त्याला!"

कृष्णाबाईंचा नाना इराणी चाळींत वारंवार जात असे तसा जगन्नाथ पालवहि. एके दिवशीं जगन्नाथ घरीं आला आणि गप्पागोष्टी करतांना आईना म्हणाला, "आई, आम्ही तुकारामाचं नांव बदलून टाकलं आहे."

"कां रे, बाबा?" कृष्णाबाईंनीं विचारलें.

"तो आम्हांला आवडतो म्हणून !" जगन्नाथ सांगूं लागला. "तुकाराम आमचा मॉनिटर आहे. पहिलीपासून मॉनिटर आहे. आम्हांला मदत होते त्याची. आणि बरं का आई, आमच्या वर्गांतील मुलीसुद्धां त्याच्याकडून पेन्सिली करून घेतात. आमचा दादा आहे तो. आम्ही त्याला "दादा" म्हणून हाक मारणार आहोंत."

कृष्णाबाईंना आपल्या मुलाचें हें नवें नांव आवडलें आणि तेव्हांपासून तुकाराम "दादा" म्हणून ओळखला जाऊं लागला.

अशा रीतीनें दादाचें शिक्षण निर्वेधपणें चाललें होतें. कृष्णाबाई गिरणींत कामाला जात आणि आपला संसार हिंमतीनें चालवीत. त्यांनीं दादाला कांहीहि कमी पडूं दिलें नाहीं. दारिद्र्याची झळ त्याला लागूं दिली नाहीं.

एके दिवशीं कृष्णाबाईंनीं खाडा केला. त्या गिरणींत गेल्या नाहींत. त्यांना बरें वाटत नव्हतें. त्या घरींच राहिल्या. दिवसगत झाली तरी त्यांना आराम वाटेना. म्हणून त्यांनीं हवा बदलण्यासाठीं तुरंबवला जाण्याचें ठरविलें. जातांना त्यांनी दादाला श्री. बाळकृष्ण अनाजीराव जाधव यांच्या घरीं ठेवलें.

त्यांनीं मुंबई सोडली नि तुरंबव गांठलें. आणि कांहीं दिवसांनीं दादाच्या नांवावर त्यांच्या काकाकडून ( मावशीचा नवरा ) गोविंद कृष्णाची देसाई यांच्याकडून पत्र आलें: आईचें दुखणें बळावलें आहे. तूं लवकर निघून ये.

दादानें हें पत्र सौ. लक्ष्मीबाई आणि बाळकृष्णराव जाधवांना दाखविलें आणि आपल्याला तुरंबवला गेलें पाहिजे असें सांगितलें. उभयतां पतिपत्नीनें दादाच्या विचाराला दुजोरा दिला. घाईघाईनें जाण्याची तयारी झाली आणि दादानें बरीचशी संत्रीमोसंबी एका पिशवींत कोंबली. बाळकृष्णराव त्याला भाऊच्या धक्क्यावर पोंचवायला आले. मुंबईहून दादा दाभोळला पोंचला. तेथून गोवळकोटला. गोवळकोटहून चिपळूण. चिपळूण येथें त्याला मारुतीराव पंडित यांचे वडील भिकाजीराव पंडित ( रिटायर्ड सब इन्स्पेक्टर ऑफ पोलीस ) भेटले. त्यांनी त्याला तुरंबवला आणलें.

घरीं येईपर्यंत दादानें आपल्या मनाशीं अनेक सुखद मनोरे रचले. आईला चिपळूणला आणायचें आणि एखाद्या चांगल्या डॉक्टरकडून तिची

प्रकृति तपासून घ्यायची. तिची सेवाशुश्रुषा करायची. हातपाय दाबायचे. डोकें चेपायचें. तिला खडखडीत बरें करायचें.

आपल्याला आलेला पाहतांच आई म्हणेल, दादा, आलास. बरं झालं बाबा! आतां मी लवकर अंथरूण सोडीन!

अशा सुखकर विचारांत दादानें घरांत पाऊल टाकलें आणि 'आई!' अशी हांक मारली.

मोठी बहीण सौ. गंगूबाई पुढें आल्या आणि भावाला पाहतांच त्यांच्या तोंडून आर्त स्वर बाहेर पडला,

"आई देवाघरीं..........."

गंगूबाईनीं भावाला पत्र लिहिण्यापूर्वीच कृष्णाबाईनीं वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी देवाची हांक ऐकली होती. (१९२६)

दादाच्या डोळ्यांपुढें अंधार पसरला. त्याच्या गात्रांतील सारी शक्ति नाहींशी झाली. आपण कोसळून पडतों कीं काय असें त्याला वाटलें. गंगूबाईनीं पुढें होऊन त्याला सांवरलें. दुःखावेगानें भावाबहिणींचे देह गदगदां हलले. अश्रूंचे बांध फुटले. कोण कुणाचें सांत्वन करणार? त्यांच्या अश्रूंचे ओघळ एकमेकांत मिसळले. आईच्या अनंत स्मृतींवर अश्रूंचा अभिषेक झाला.

दादाच्या हातांतील पिशवी खालीं पडली होती. तिच्यांतील संत्रीमोसंबीं बाहेर आलीं. तीं घरंगळत जाऊन घराच्या कोपऱ्यांत निश्चेष्ट पडलीं आणि दोन दिवसांनीं सुकून गेलीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, .
3८०८९.... वि: चरित्र
९२५६.... नों: दि: ९३।१९।५६

*********

५

# आगेकूच – लेफ्ट्, राइट्, लेफ्ट....

दुःखानें खचलेल्या दादाच्या खांद्याला एका जीर्ण कापऱ्या हातानें स्पर्श केला. सुरकुतलेला हाडकुळा हात. तो हात होता वृद्ध रमाबाई जाधवांचा. रमाबाईचें घर तुरंबवला वाड्यावर होतें. पण त्या राहात असत मोऱ्यांच्याच घरीं. त्या दादाच्या आईच्या आत्या. त्यांचें पालन पोषण त्यांच्या वैधव्यांत दादाच्या आईनें केलें व त्यानंतर त्यांच्या मृत्यूपर्यंत दादांनीं केलें. कांहीं माणसें आजूबाजूच्या लोकांवर प्रेमाचा सतत वर्षाव करीत असतात. तो त्यांचा स्वभावधर्म असतो. आपण जसा श्वासोच्छवास सहज करतों तशीं हीं माणसें माया करीत असतात. रमाबाई याच थोर लोकांच्या जातीच्या. त्या वाडींतील मुलांना जवळ बोलावून त्यांना आंबे, फणस खायला देत; भुतांच्या व राजाराणीच्या गोष्टी सांगत आणि घरीं जातांना त्यांच्या पाठीवरून ममतेचा हात फिरवीत. दादा तर घरचाच मुलगा. रमाबाईचा अमृताचा हात त्या दुःखाच्या वेळीं दादाच्या पाठीवरून सतत फिरत होता. मातृवियोगानें त्याच्या मनाला आलेली विषण्णता, हृदयांत शिरलेलें नैराश्य, शरीराला आलेली क्षीणता हीं सारीं हलकीं झालीं त्या अमृत स्पर्शानें.

रमाबाईच्या प्रेमळ सहवासांत दादाचें दुःख ओसरलें. भावनावेश कमी झाला तशी विचारचक्राला गति मिळाली. भविष्यकालाचा विचार. पुढें काय होईल, काय करावें हा विचार. तो स्वतःशींच म्हणत होता, इथं तुरंबवला राहून काय करायचें ? आपल्याला मुंबईला गेलेंच पाहिजे. पण यापुढें शाळा बंद. राममोहन इंग्लिश स्कूलच्या इंग्रजी पांचवीच्या वर्गांत आतां आपल्याला बसतां यायचें नाहीं. आपल्याला नोकरी केली पाहिजे. कसली ? कसलीहि. गिरणींत, कारखान्यांत, दुकानांत, हॉटेलांत, कोठेंहि. जमलें तर रात्रीच्या शाळेंत नांव घालूं आपण......

तेवढ्यांत श्री बाळकृष्णराव जाधवांकडून त्याला पत्र आलें. आईचें दिवस-कार्य उरकलें आहे. आतां तुरंबवला राहण्याची आवश्यकता नाहीं. मुंबईला परत ये.

दादा मुंबईला आला. बाळकृष्णरावांना भेटला. ते त्याला म्हणाले, तुका, (ते दादाला प्रेमानें "तुका" म्हणत असत.) यापुढें माझें घर तें तुझेंच घर असं मान. आमच्याकडेच राहा. इथंच जेव. इथंच झोंप. शाळेला जा.

दादा पुनः शाळेला जाऊं लागला. शाळेच्या आनंदी वातावरणांत त्याचें मन रमूं लागलें. काळानें हृदयाला केलेली जखम हळुहळू बुजूं लागली.

याच सुमारास त्याला वाचनाचें वेड लागलें. कादंबऱ्या हीं त्याचीं आवडीचीं पुस्तकें. नाथमाधवांच्या सर्व ऐतिहासिक कादंबऱ्या त्यानें वाचून काढल्या. हरि नारायण आपट्यांच्याहि कादंबऱ्यांचीं पारायणें केलीं. कांहीं सामाजिक कथाकादंबऱ्याहि हातावेगळ्या केल्या. पण सामाजिक कादंबऱ्यांपेक्षां ऐतिहासिक कादंबऱ्यांनींच त्याच्या मनावर अधिक मोहिनी घातली होती.

त्याचें मन आणखी एका गोष्टीकडे आकृष्ट झालें होतें. ती म्हणजे नाट्यकला. १९२२ मध्यें तो राम मोहनमध्यें आला त्याच वर्षी राजा राममोहन रॉय यांची पुण्यतिथि दरवर्षीप्रमाणें शाळेंत साजरी झाली. त्या वर्षी श्रीमती कृष्णाबाई जव्हेरी यांनीं राजा राममोहन रॉय यांच्या जीवनावर आधारलेला एक संवाद मराठींत लिहिला होता. तो समारंभाच्या प्रसंगीं नाट्यरूपानें सादर करण्यांत आला. दादानें नाट्य पाहिलें तें त्याच प्रसंगीं. तेव्हांपासून दादाच्या मनानें नाट्याकडे झेंप घेतली. हें त्यांच्या शिक्षकांनीं हेरलें आणि म्हणून शाळेच्या संमेलनप्रसंगीं किंवा अन्य समारंभाच्या वेळीं नाट्यप्रवेश होत त्यांत दादाला स्थान मिळूं लागलें. त्याचीं कामें चांगलीं वठतात असें आढळून आल्यावर शाळेच्या संपूर्ण मोठ्या नाटकांत त्याला प्रमुख भूमिका मिळाल्या. उदाहरणार्थ, 'बेबंदशाही' नाटकांत दादानें पश्चात्तापदग्ध संभाजी नेटानें उभा केला. 'हिरा हरपला' या नाटकांत तो पराक्रमी उदयभानूच्या स्वरूपांत चमकला. आणि 'पुण्यप्रभाव' मधील त्याच्या कंकणानें प्रेक्षकांत हास्याची खसखस पिकविली.

यावेळीं राम मोहनचे शिक्षक, विशेषतः श्री एस. पी. ओक मुलांकडून

कसोशीनें भूमिका करवून घेत. दादाच्या अंगीं असलेल्या नाट्यांकुराला खतपाणी घालून वाढविण्याचें श्रेय ओक मास्तरांनाच द्यावें लागेल.

शाळेच्या नाट्यविभागांत दादानें ज्या आत्मीयतेनें भाग घेतला तेवढाच बालवीर संघटनेंतहि. बालवीरांच्या कवायती, त्यांची शिस्त, करमणुकीचे कार्यक्रम आणि सेवावृत्तीची शिकवण हीं सर्व त्याच्या वृत्तीला मिळतीं-जुळतीं होतीं.

श्री. जव्हेरी हे शाळेचे स्काउट मास्तर. ते बालवीरांना रविवारीं सकाळीं विल्सन कॉलेजच्या जिमखान्यावर बोलावीत असत. तेथेंच बालवीरांची कवाईत होई आणि कॅम्प फायर्स होत ते अंधेरी–जोगेश्वरीच्या जंगलांत. आज ज्या ठिकाणीं अंधेरी–जोगेश्वरींत सिमेंटच्या इमारती उभ्या आहेत तो भाग पूर्वी जंगलानें व्यापला होता. आणि म्हणून कॅम्प फायर्ससारख्या कार्यक्रमासाठीं बालवीरांना तो आकर्षक वाटे.

बालवीरांना कॅम्प फायर्स जेवढे आवडत त्याच्या खालोखाल आवडे दैनंदिनी लिहिण्याचें काम. आपण दररोज कोणत्या चांगल्या गोष्टी केल्या, किती लोकांना सहाय्य केलें याची नोंद दैनंदिनींत व्हावयाची. दादाची दैनंदिनी अशा छोट्या विविध घटनांनीं भरलेली होती. मुंबईत नवीन आलेल्या लोकांना रस्ते दाखविणें, पत्ते सांगणें, घरें शोधून देणें, म्हाताऱ्या माणसांना ट्रॅममध्यें बसविणें किंवा तींतून उतरविणें, दंडाला धरून त्यांना रस्ता ओलांडून देणें, कोणाच्या डोक्यावरील बोजा खालीं उतरवून ठेवणें किंवा खालचा डोक्यावर ठेवणें इत्यादि कृत्यांचा तींत उल्लेख असे. पण एका गोष्टीचा वारंवार उल्लेख असे तो रस्त्यांत किंवा जिन्यावर पडलेल्या केळ्यांच्या साली उचलून टाकल्याचा! आज दोन साली उचलून टाकल्या ...आज तीन साली कचऱ्याच्या पेटींत फेकून दिल्या! केळांच्या साली उचलल्या नाहींत असा दिवस विरळाच!

त्यावेळीं बालवीर चळवळीला सामाजिक तसेंच शालेय जीवनांत महत्त्वाचें स्थान होतें. देशांत ठिकठिकाणीं बालवीरांचे मेळावे भरत आणि त्यांना मोठमोठीं माणसें उपस्थित राहात. खडकी येथें मुंबई राज्यांतील बालवीरांचा जो मोठा मेळावा भरला होता त्याला स्काउट चळवळीचे

प्रणेते लॉर्ड बेडेन पॉवेल जातीनें हजर होते. त्यांच्याशीं हस्तांदोलन करण्याचा मान दादाला मिळाला होता. नंतर वरळी येथें भरलेल्या विराट बालवीर मेळाव्याला हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनाहि दादानें बालवीरांची तीन बोटांची सलामी दिली होती.

मुंबईत मुलांची सदतीस आणि मुलींची तीन पथकें होतीं. त्यांत पारशी विद्यार्थ्यांचा विशेष भरणा असे. कांहीं इंग्लिश मुलेंहि होतीं. मोठ्या मुलांच्या हातीं रायफल्स देऊन त्यांना नेमबाजीचें शिक्षण देण्यांत येई. हें शिक्षण क्रॉस मैदानावर सध्यां जेथें होम गार्डच्या कवायती चालतात त्या जागीं होई. पण प्रत्यक्ष नेमबाजी कुलाब्याला चाले. ती करण्यासाठीं बालवीर मोठ्या हौसेनें कुलाब्याला जात.

दादानें अठराव्या वर्षांत पदार्पण केल्यानंतर त्याला बालवीरांचा ट्रूप लीडर होण्याचा मान मिळाला ( १९२८ ). त्याच्या हुकमतीखालीं साठ बालवीर होते. ट्रूप लीडर म्हणून नेमणूक झाल्यानंतर पहिल्या रविवारीं तो आणि त्याचे बालवीर क्रॉस मैदानावर गणवेषांत जमा झाले. त्यांनीं रायफली घेतल्या आणि खांद्यावर टाकल्या. सारेजण संचलनासाठीं तीन रांगा करून उभे राहिले. त्यांना कुलाब्याला नेमबाजीसाठीं जावयाचें होतें.

ट्रूप लीडर दादा मोरे साठ विद्यार्थ्यांच्या तीन रांगांपुढें उभा होता. त्यानें मोठ्या आवाजांत हुकूम दिला : अटेनशन ! लेफ्ट राइट, लेफ्ट राइट, लेफ्ट टर्न, क्विक् मार्च !

ट्रूप लीडर मोरे आपल्या तुकडीबरोबर कुलाब्याच्या दिशेनें चालू लागला. रस्त्यानें येणारे जाणारे स्त्रीपुरुष रायफली घेतलेल्या त्या उमद्या बालवीरांकडे कौतुकानें पाहात होते. आणि ट्रूप लीडर छाती पुढें काढून, मान ताठ ठेवून मोठ्यानें म्हणत होता–लेफ्ट–राइट–लेफ्ट.........

*********

# ६

# जपून ठेवलेला आशीर्वाद

मार्च १९३० मध्यें श्री. दौलतराव जीवनराव घाग यांच्या घरासमोर शृंगारलेला प्रशस्त लग्नमंडप शोभत होता. दौलतराव मुंबईस पोलीस खात्यांत नोकरीस होते. पण हा लग्नमंडप त्यांच्या मुंबईतील घरासमोर नव्हता. तो उभारला होता त्यांच्या जन्मगांवीं दहीवली ( बुद्रुक ) मुक्कामीं. संध्याकाळीं पांचाच्या सुमारास गांवांतील मंडळींची मंडपांत गर्दी झाली. सात आठशें लोक जमा झाले. सनई, ताशा, ढोलकें, रणशिंग इत्यादि वाद्यवादनादि साहित्य आलें आणि मग दौलतराव फेटे बांधलेल्या गांवकऱ्यांसह वऱ्हाडी मंडळींचें स्वागत करण्यासाठीं मंडपाबाहेर पडले.

वऱ्हाडी मंडळी तुरंबवची. दहीवली तुरंबवपासून सहा मैलांच्या अंतरावर. सजविलेल्या बैलगाड्यांतून दीडदोन तासांचा प्रवास करून तुरंबवहून पन्नास साठ पाहुणे आले होते. त्यांचें दौलतरावांनीं मोठ्या इतमामानें स्वागत केलें, वाजत गाजत आणलें आणि यथोचित आदरातिथ्य केलें.

दुसऱ्या दिवशीं देवक बसलें. प्रथम नवरी मुलीच्या घरीं. नंतर मुलाच्या घरीं. त्यासाठीं गांवचा भटजी आला होता. धूत वस्त्र परिधान केलेल्या भटजींनीं मुलाच्या घरीं यथासांग देवकविधि पूर्ण केल्यानंतर घाणा भरणें झालें. मुलाचा घाणा आधीं. मुलीचा नंतर. या घाण्यांत हातीं मुसळ घेतलेल्या पांच सुवासिनींसह अनेक सौभाग्यवतींनीं ओव्या गायिल्या, गाणीं म्हटलीं. त्यानंतर दोन्हीकडचें नवग्रहपूजन झालें. नातेवाईकांना कपड्यांचा अहेर झाला आणि मध्यान्हींचीं मिष्टान्न भोजनें आटोपलीं. चाराच्या सुमारास नवरामुलगा शृंगारलेल्या घोड्यावर बसून वाजतगाजत नवरीच्या मंडपांत

आला. नियोजित सासूसासऱ्यांनीं जांवयाचे पाय धुतले, हळदीसमारंभ झाला आणि वधुवरांचा स्नानविधि आटोपला. आणि मग एकच धांदल उडाली. नवऱ्यामुलानें मंगलसूत्र ओंवलें, अक्षता वाटण्यांत आल्या, अंतरपाट धरण्यांत आला, मंगलाष्टकें म्हटलीं गेलीं, मंगलवाद्यें वाजलीं, बंदुकांचे आवाज उठले, संमिश्र ध्वनींच्या आवर्तांत पांच वेळां अक्षता पडल्या आणि नवरा-नवरीनें एकमेकांच्या गळ्यांत सफेत चांपयाच्या माळा घातल्या. [तेवढ्याच धांदलीनें बाशिंगे बांधलीं गेलीं, होम झाला आणि वधू वराच्या मागून सात पावलें चालत गेली. सौभाग्यकांक्षिणी सौभाग्यवती झाली. श्री. दौलतराव घागांची थोरली लेक कृष्णाबाई कै. कृष्णाबाई आणि धोंडबाराव मोरे यांची सून झाली! सुनेचें नांव ठेवण्यांत आलें वत्सला.

मंगलाष्टकें म्हटलेल्या भटजीनें नवविवाहित वधुवरांस किंचित् बाजूला घेतलें आणि अपेक्षायुक्त आशीर्वाद दिलाः तो पाहा आकाशांत ध्रुवतारा. त्या ताऱ्याप्रमाणें तुमचें प्रेम अढळ राहो!

या लग्नसंबंधामुळे तुरंबव आणि दहीवली या गांवांच्या सीमा अधिक जवळ आल्या असा भास होतो न होतो तोंच त्या दोन्ही गांवांत दुरावा, नव्हे कायमचें वैमनस्य निर्माण होतें कीं काय अशी भीति वाटण्याचा प्रसंग उद्भवला. प्रसंग क्षुल्लक पण त्याला स्वरूप मिळालें गंभीर. त्याचें असें झालें. वरपक्षाकडील भोजनासाठीं गांवकरी मंडळी जमत होती. मंडपांत दोन बाकें आणि तीनचार खुर्च्या होत्या. बाकीची जागा दोनतीन जाजमांनीं आच्छादली होती. बांकांवर व खुर्च्यांवर बसलीं होतीं तुरंबवचीं मुलें. वरपक्षाकडील छोटे पाहुणे. दहीवलीची वडील माणसें आलीं तरी तीं मुलें उठलीं नाहींत. वडील माणसें आल्याचें पाहून, उत्थापन देऊन, त्यांना आदरानें बांकाखुर्च्यांवर बसवावें एवढा पोंच त्या मुलांना कुठला? तीं आपल्याच नादांत एकमेकांशीं बोलत होतीं, हंसत, खिदळत होतीं. आपल्याला बाकेंखुर्च्यांऐवजीं जाजमावर बसावें लागणार याचें दहीवलीच्या कांहीं लोकांना वैषम्य वाटलें. अपमान वाटला. अपमानाचें हें शल्य ज्याला अधिक खुपलें व झोंबलें अशा एका दहीवलीकराला राहवलें नाहीं. तो तडकाफडकी जाजमावरून उठला आणि त्यानें तुरंबवच्या मुलांना उपरोधपूर्ण स्वरांत म्हटलें, "आणखी खुर्च्या आणून देऊं का?"

हा प्रश्न श्री. गणपत शिवराम पंडित यांनीं ऐकला. त्यावेळीं गणपतरावांचें वय होतें एकोणीस वर्षांचें. ते दादासाहेबांचे परम मित्र. वरपक्षाकडील तरुण पाहुणे. गणपतराव चटकन् बोलून गेले, " तुम्ही खुर्च्या आणल्या तर चालतील. बसूं आम्ही. "

ठिणगी पडली नि भडका उडाला. शब्दानें शब्द वाढत गेला. आवाज मोठे झाले. लहानमोठा, उच्चनीच इत्यादि वाद निर्माण झाला आणि विकोपाला गेला. कोणीच पड खाईना. जेवणाची वेळ जसजशी जवळ आली तसा भांडणानें वाढता पेट घेतला. आदल्या रात्रीं आपण वरातींत भाग घेऊन, दारू काम करून आनंद व्यक्त केला हें दहीवलीकर रागाच्या भरांत विसरले. त्यांनीं वर पक्षाला धडा शिकविण्याचा चंग बांधला. एक गृहस्थ तावातावानें म्हणाले, आम्ही तुरंबवचें अन्न खाणार नाहीं ! जेवायला बसणार नाहीं !

असें म्हणून त्यानें विडी पेटवली.

दौलतरावांनीं दहीवलीच्या मंडळींना नमस्कार केला आणि जेवायला उठण्याची विनंति केली. पण दहीवलीचे लोक आपल्या निश्चयापासून रति-भरहि दूर सरण्यास तयार नव्हते.

प्रसंग मोठा कठीण होता. गोष्टी एवढ्या थराला पोंचतील असें वाटलें नव्हतें. काय करावें तें कोणाला कळेना. दहीवलीकरांचा राग कसा दूर करावा याचा कोणालाच उमज पडेना.

या साऱ्या प्रकारानें एक व्यक्ति मनोमन हबकून गेली होती. तिच्या हृदयांत अक्षरशः धडकी भरली होती. ती व्यक्ति म्हणजे नवपरिणिता षोडशवर्षा सौ. वत्सला. या घटनेला अनिष्ट वळण लागेल कीं काय या आशंकेनें तिचें मन काळवंडून गेलें होतें.

तेवढ्यांत दादासाहेब आंतून मंडपांत आले. त्यांनीं हळदीनें पिवळ्या झालेल्या हातांनीं दहीवलीकरांना नमस्कार केला आणि अत्यंत सौम्य शब्दांत त्यांची समजूत काढली. त्यांच्या म्हणण्याचा थोडक्यांत आशय असा—

मंडळी हो, झाल्या प्रकाराबद्दल मला खेद होतो. परंतु चूक माझ्या मित्राची एकट्याची नव्हे. आपल्यापैकीं पुष्कळशी मंडळी वयोवृद्ध आहेत. आम्हीं तुमचे पाहुणे. त्यांतून जे वर बसले होते ती सर्व मुंबईतील तरुण

मंडळी. त्यांना इकडच्या चालीरीती कशा माहीत असणार! अशा परिस्थितींत तुम्ही जर त्यांना "या मंडळी, खालीं मडपांत बसा," असें सांगितलें असतें तर ते खालीं बसले असते व हा प्रसंग उद्‌भवला नसता. ज्या तऱ्हेनें प्रश्न विचारण्यांत आला त्याच तऱ्हेनें उत्तर देण्यांत आलें. असो. आपलीं नवीं नातीं जडलीं आहेत. मी माझ्या मित्रातर्फें दिलगिरी प्रदर्शित करतों. हा झाला प्रकार विसरून आपण यजमानांच्या विनंतीस मान द्यावा.

झालें! मोठ्यांना मोठेंपण मिळालें, लहानांनीं अपराध केल्याची कबुली मिळाली. चित्र क्षणांत पालटलें. दहीवलीकर खूष होऊन जेवायला उठले.

भांडण मिटल्याचें पाहून सौ. वत्सलाबाईचा जीव भांड्यांत पडला. अरिष्ट टळलें. चेहऱ्यावर हास्य उमटलें. तिचा आणि पतीचा पहिला परिचय झाला तो असा. अनोळखी पतीबद्दल आदराची भावना उसळून आली. तिच्या हृदयाचीं थरथरतीं कवाडें आपोआप उघडलीं. तेथें पतीची प्रतिष्ठापना झाली.

भोजनोत्तर पुनः खेळीमेळीचें वातावरण निर्माण झालें. दिलजमाई झाली आणि तुरंबवच्या वऱ्हाडांतील कांहीं मंडळींनीं दहीवलीला आठ दिवस मुक्काम ठोकला.

लक्ष्मीबाई जाधव दादासाहेबांना आपल्या लहान भावाप्रमाणें मानीत. परंतु त्यांनीं वत्सलाबाईकडे पाहिलें तें आईच्या डोळ्यांनीं. त्याच मायेच्या दृष्टीनें त्यांनीं तिचें आपल्या घरीं स्वागत केलें. त्यावेळीं श्री बाळकृष्णराव जाधव बोहऱ्याची चाळ सोडून फॉर्जेट हिलवरील एका इमारतींत राहावयास गेले होते. बोहऱ्याच्या चाळीपेक्षां ही नवी जागा प्रशस्त होती. वत्सलाबाई सासरीं म्हणून आली त्यावेळीं लक्ष्मीबाईनीं तिच्यावरून दहींभात ओवाळला आणि तिला नव्या बिऱ्हाडांत घेतलें. ( मे १९३० )

कांहीं दिवसांनीं जाधव कुटुंबानें पुनः बिऱ्हाड बदललें. बाळकृष्णराव ताडदेव येथील गुलाबमहालमध्यें राहावयास गेले. आतांपर्यंत दादासाहेब आणि वत्सलाबाई जाधवांच्याच घरीं राहात होतीं. पण तीं दोघेंहि जण स्वतंत्रपणें संसार करावयास समर्थ आहेत असें पाहून जाधव पतिपत्नींनीं मोरे पतिपत्नींना वेगळा संसार थाटून द्यावयाचें ठरविलें. त्यांनीं दादा-

साहेबांसाठीं नाना चौकांतील "श्री हरिनिवास"ची निवड केली. जाधवरावहि गुलाब महाल सोडून दादासाहेबांच्या शेजारीं राहावयास आले. हरिनिवास नं. ३ मध्यें जाधवरावांचें बिऱ्हाड आणि हरिनिवास नं. २ मध्यें दादासाहेबांचा संसार.

लक्ष्मीबाईंनीं वत्सलाबाईंची नवी चूल हरिनिवासांत स्वतः आपल्या हातांनीं घातली. वत्सलाबाईंच्या संसारासाठीं ताटें, वाट्या, पातेलीं, तांबे कपबशा, पोळपाट, लाटणें इत्यादि सर्व साहित्य लक्ष्मीबाईंनीं खरेदी केलें.

त्या दिवशीं अठरा वर्षांच्या वत्सलाबाईनें स्वतंत्रपणें पाकसिद्धि करावयास प्रारंभ केला. स्वयंपाक करीत असतां तिच्या मनःचक्षूंसमोर भावी संसाराचीं अनेक रम्य चित्रें उभीं राहिलीं. त्या चित्रांवरून एका सुखद स्मृतीचा सुगंध तरळत होता. दोन वर्षांपूर्वीं मंगल अक्षता पडल्यानंतर भटजींनीं दिलेल्या आशीर्वादाचा सुगंध. तो आशीर्वाद तिनें जपून ठेवला होता—

तो पाहा ध्रुवतारा. त्या ताऱ्याप्रमाणें तुमचें प्रेम अढळ राहो !

*********

# ७

# आई, आज तूं असायला पाहिजे होतीस

बहुसंख्य तरुण आधी नोकरीधंदा करून जीवनाला थोडेसें आर्थिक स्थैर्य प्राप्त झालें म्हणजे विवाहाला सिद्ध होतात. परंतु दादासाहेबांनीं आधीं केलें लग्न आणि नंतर धरली नोकरी. बाळकृष्णराव जाधव यांनीं त्यांना बोहल्यावर चढविलें होतें. त्यांनींच दादासाहेबांना दोनअडीच महिन्यांनीं दि नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्कमध्यें आणून सोडलें. दादासाहेबांची मुलाखत झाली, चांचणी घेण्यांत आली आणि ते कामावर रुजूं झाले ता. १५ मे, १९३० रोजीं. स्टेनो टायपिस्ट म्हणून. महिना रु. ५० पगारावर. त्यावेळीं पदवीधरांना शाळांत महिना रु. ३५ ते रु. ४० वेतन मिळत असे. त्यामानानें दादासाहेबांचा पगार निश्चितच आकर्षक होता

मॅट्रिक झाल्यानंतर दादसाहेबांनीं श्री. पाध्ये यांच्या संस्थेमध्यें शॉर्टहॅंड व टायपिंगचा एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. याच ज्ञानाच्या आधारावर ते स्टेनोटायपिस्टच्या खुर्चीवर जाऊन बसले.

स्टेनो टायपिस्ट आपली खुर्ची सहसा सोडीत नाहीं. पण दादासाहेबांनीं ती अवघ्या तीन वर्षांत सोडली. मि. टेनब्रुक यांच्या कृपेमुळें. मि. टेनब्रुक हे अमेरिकन गृहस्थ बँकेचे सब अकौंटंट. ते पूर्ण शाकाहारी होते. कधीं मद्य-पानहि करीत नसत. त्यांना हिंदु तत्त्वज्ञानाबद्दल विलक्षण आकर्षण वाटे. त्यावेळीं डॉ. ॲनी बेझंट यांची थिऑसॉफिकल सोसायटी लोकप्रिय होती. अनेक भारतीय व पाश्चात्य विद्वान् सोसायटीचे सभासद होते. मि. टेनब्रुकहि सभासद म्हणून सोसायटीच्या सभांना व चर्चांना उपस्थित राहात असत. ते दादासाहेबांच्या कामांतील अगत्यावर अत्यंत खूष होते. त्यांनीं

दादासाहेबांना बढती दिली आणि त्यांना दुसऱ्या खात्यांत घातलें. अशा रीतीनें दादासाहेबांनीं स्टेनोची जागा सोडली ती कायमची.

दादासाहेबांना दोनतीन वर्षांच्या अंतरानें बँकेंतील खातीं बदलण्याची संधि मिळाली. विविध स्वरूपाच्या कामाचा अनुभव आला आणि त्याबरोबर पगारांतहि सतत वाढ होत गेली.

बारा वर्षांच्या नोकरीनंतर ती कायमची सुटते कीं काय अशी शंका वारंवार निर्माण होण्याचा प्रसंग १९४२ मध्यें आला. १९३९ मध्यें दुसऱ्या महायुद्धास तोंड फुटलें होतें. हिटलर, मुसोलिनी आणि जपान एका बाजूला आणि इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका इत्यादि राष्ट्रें दुसऱ्या बाजूला. युरोपांत आणि उत्तर आफ्रिकेंत हिटलर-मुसोलिनींचा एकसारखा जय होत होता आणि दोस्त राष्ट्रें मार खात मागें हटत होतीं. इकडे पूर्वेस जपानचा सूर्य वेगानें वर येत होता. तो माध्यान्हीं आला तेव्हां त्याच्या तापाने संत्रस्त झालेले इंग्रज–अमेरिकन आसऱ्यासाठीं सैरावरा धावू लागले. भूमीवर, पाण्यावर आणि आकाशांत जपानचा विजयी ध्वज फडकयानें घुंगुरटीं झाडावींत त्याप्रमाणें शत्रुसैनिकांना बाजूला झटकीत पुढें सरकूं लागला. जपानी सैनिक ब्रह्मदेशांत घुसले आणि त्यांनीं हिंदुस्थानच्या पूर्व सीमेवर धडक दिली. कलकत्त्यावर बॉम्बवृष्टि झाली आणि मुंबईत पळापळ सुरू झाली.


या दुघटनेचा व्यापारी जगतावर अनिष्ट परिणाम झाला. विशेषतः ब्रिटिश आणि अमेरिकन व्यवहारावर. अतिपूर्वेकडील अमेरिकेच्या व्यापारी कंपन्या व बँका यापूर्वींच धडाधड बंद झाल्या होत्या. ती पाळी आतां मुंबईंतील नॅशनल सिटी बँकेवर आली होती. जगांतील सर्वांत तीन मोठ्या बँकांपैकीं ही एक बँक. आणीबाणीचा प्रसंग येतांच ही बँक संपूर्णपणें बंद ठेवायची असा चालकांनीं निर्णय घेतला होता. त्या दृष्टीनें हालचाल चालू झाली. मुंबईच्या बँकेंतील बरीचशी मालमत्ता विकून टाकण्यांत आली. बँकेंतील नोकरवर्गाची संख्या १५० पेक्षां अधिक होती ती आतां फक्त १८ वर आणण्यांत आली. आर्थिक व्यवहार क्रमशः कमी करण्यांत आले. किंबहुना ते परिस्थितीच्या तडाख्यानें आपोआपच कमी झाले असेंच म्हणणें वस्तुस्थितीला धरून होईल.



श्री. दादासाहेब यांनीं फर्स्ट नॅशनल सिटी बँकेंत पंचवीस वर्षें सेवा केल्याबद्दल त्यांना चांदीचें तबक देण्यांत येत असून कोटाला सोन्याची पिन लावण्यांत येत आहे. व्हा. प्रे. मि. ए. डी. कॅल्हून, दादासाहेब व सौ. लालकाका.



फर्स्ट नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्कच्या क्लबचे अध्यक्ष या नात्यानें श्री. दादासाहेब भाषण करीत आहेत.




बँकेच्या क्लबतर्फे झालेल्या सामन्यांतील रस्सीखेंच



बँकेच्या क्लबतर्फे झालेल्या क्रिकेटच्या सामन्यांत



बँकेच्या सोव्हनीरमध्यें प्रसिद्ध झालेलें दादासाहेबांचें एक चित्र




श्री. दादासाहेबांनीं बँकेच्या सहलीचें घेतलेलें छायाचित्र



तुरंबव येथील नाचणीच्या मळणीचें श्री. दादासाहेबांनीं घेतलेलें छायाचित्र

प्रतापगडावरील
श्री शिवाजी महाराजांच्या
पुतळ्याचें श्री. दादासाहेबांनीं
घेतलेलें छायाचित्र



सारांश, बँकेचें भवितव्य धोक्यांत होतें. जे अठरा लोक बँकेंत काम करीत होते त्यांना नोकरीची शाश्वती न वाटावी हें साहजिकच होतें. उद्यां कोणता निर्णय कानीं येईल हें कोणालाच सांगतां येत नव्हतें.

अशा संभ्रमित अवस्थेंत बँकेंतील लोक दिवस मोजीत असतांना एक मद्रासी व्यापारी कामासाठीं बँकेंत आला. त्याचें बँकेंत खातें होतें म्हणून तो आला होता. बँक चालू राहील कीं नाहीं याविषयीं बोलतां बोलतां तो म्हणाला, हें भविष्य सांगणं कांहीं कठीण नाहीं. तुमच्यापैकीं एकाचा मला हात पाहायला मिळाला तर मी बँकेचें बिनचूक भविष्य वर्तवीन.

पण हात कोणाचा पाहायचा ?

कुणीसें म्हटलें, मि. मोऱ्यांचा हात दाखवा.

दादासाहेबांनी आपला हात पुढें केला. सगळे लोक भोंवतीं जमा झाले. हस्तसामुद्रिकानें दादासाहेबांच्या उजव्या तळहातावरील रेषांचें सूक्ष्म परीक्षण केलें आणि म्हटलें, बँक बंद होत नाहीं !

सर्वांचे चेहरे कुतूहलमिश्रित आनंदानें उजळले.

मद्रासी गृहस्थ पुढें म्हणाला, ही पाहा रेषा. ही नोकरीची. कशी अखंड आहे पाहा. मध्यें कुठेंच तुटलेली नाहीं. मि. मोरे यांच्या नोकरींत खंड नाहीं, बदल नाहीं. मोरे याच बँकेंत नोकरी करतील !

भविष्यकथनाबद्दल मद्रासी गृहस्थाचें तोंड चहा देऊन गोड करण्यांत आलें. पण त्यानंतर अठराजणांचीं तोंडें गोड झालीं. दुसऱ्या युद्धाचें पारडें फिरलें. दोस्त राष्ट्रांचा विजय झाला. बँकेचे व्यवहार पूर्ववत् जोमानें सुरू झाले.

दादासाहेबांबद्दलचें भविष्य खरें झालें म्हणूनच कीं काय नंतरच्या तपांत व पुढें ते बँकेंत वाढत्या क्रमानें प्रिय झाले. स्टाफ सोसायटीचे ते सतत पंधरा वर्षें पदाधिकारी म्हणून निवडून आले. म्युच्युअल एड सोसायटीचे ते दोनदां अध्यक्ष झाले. बँकेचा एक क्लब आहे. त्याचें नांव सिटी बँक क्लब. या क्लबतर्फे सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात, सहली होतात आणि विविध प्रकारच्या स्पर्धा ठेवल्या जातात. दादासाहेब या क्लबचे तीन वेळां अध्यक्ष म्हणून निवडून आले. आपल्या अध्यक्षीय कारकिर्दीत त्यांनीं क्लबच्या कार्याला चालना देऊन त्यांत संघटितपणा निर्माण केला.

वरील तीनहि संस्थांच्या कार्यामुळें त्यांचें संघटनाकौशल्य जसें व्यक्त झालें तसा आणखी एक गुण प्रगट झाला. तो म्हणजे छायाचित्रणांतील नैपुण्य. बँकेंत छायाचित्रांच्या स्पर्धा होत असतात. त्यांत दादासाहेबांना पहिलें पारितोषिक मिळालें होतें. क्लबच्या सहली झाल्या किंवा ते अन्य ठिकाणीं गेले कीं ते आपल्याबरोबर कॅमेरा घेतात आणि त्याच्या सहाय्यानें आकर्षक दृश्यें टिपून घेतात.

कॅमेऱ्याप्रमाणेंच त्यांची बुद्धिहि कामांतील बारकावे टिपून घेते आणि त्यांचा संचय करते. असा अनुभवांचा संचय करीत, वरिष्ठांचा विश्वास संपादीत आणि सहकाऱ्यांचें प्रेम जोडीत दादासाहेबांनीं १९५५ साल गांठले. मे महिन्याची पंधरावी तारीख उजाडली. १५ मे १९५५. दादासाहेबांनीं बँकेच्या नोकरीचीं पंचवीस वर्षे पूर्ण केलीं तो दिवस. त्या दिवशीं सकाळीं बँकेकडून दादासाहेबांच्या घरीं शंभरसव्वाशें टपोरे गुलाब रवाना झाले. वत्सलाबाईंना भेट म्हणून. वत्सलाबाईंनीं ते गुलाब आजूबाजूच्या बिऱ्हाडांतील मुलांना, मुलींना आणि गृहिणींना वाटले. दोन प्रहरी बँकेत एक सूचना फिरली. मि. टी. डी. मोरे यांनीं आपल्या नोकरीचीं पंचवीस वर्षे पूर्ण केली हें सांगणारी. त्या निमित्त होणाऱ्या समारंभाची. ज्या व्यक्ती बँकेची पंचवीस वर्षे सेवा करतात त्यांना सिटी बँक क्वॉर्टर सेंचरी क्लबचे सभासद करून घेण्यांत येतें. बँकेच्या अनेक चांगल्या परंपरेपैकीं ही एक परंपरा आहे.

या समारंभाला नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्कचे उपाध्यक्ष मि. ए. डी. कॅल्हून उपस्थित होते. बँकेचे स्थानिक मॅनेजर मि. एफ्. डी. सी. मॅथ्यूज यांनीं अल्पसें भाषण करून दादासाहेबांच्या विविध गुणांचा व सेवेचा गौरव केला. मग दादासाहेबांना प्रशस्तिपत्र अर्पण करण्यांत आलें. एका पारशी महिलेनें बँकेचें मानचिन्ह मानली गेलेली एक पिन् दादासाहेबांच्या कोटाला लावली. मि. कल्हून यांनीं त्यांच्या हातांत चांदीचें एक तबक दिलें, गळ्यांत फुलांचा हार घातला आणि हातांत एक भला मोठा पुष्पगुच्छ दिला. आणि नंतर समारंभाचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं छोटेंसें भाषण करून श्री. टी. डी. मोरे यांना सिटी बँक क्वॉर्टर सेंचरी क्लबचे सभासदत्व अर्पण करण्यांत आल्याचें जाहीर केलें.

त्या दिवशीं संध्याकाळीं दादासाहेब नेहमींपेक्षां लवकर घरीं आले. त्यांचें

मन बँकेंत झालेल्या सन्मानानें आणि मिळालेल्या सभासदत्वानें आनंदून गेलें होतें. त्यांच्या मनांत कृतार्थतेची भावना दाटून आली होती. मनाला एक प्रकारची मधुर तृप्तता आली होती. त्यांनीं घरांत पाऊल टाकलें. वत्सलाबाई सामोऱ्या आल्या. दादासाहेबांनीं पत्नीच्या हातांत तबक, पुष्पगुच्छ आणि हार दिला. आणि त्यांना एकदम आठवण झाली. कै. कृष्णाबाईंची—आईची आठवण! त्यांचा कंठ रुद्ध झाला. डोळे पाणावले. मनानें उसळी घेतली आणि हांक दिली—आई, तूं आज जिवंत असायला पाहिजे होतीस. माझ्या हातांतला हार घ्यायला तूं आज हवी होतीस!

---

मराठा ठा
अनुक्रम ...३८८८९... वि: ...चारित्र
क्रमांक ...१२५गु... नों: दि: ...२३।११।६५

*********

# ८

# पांखरांना आसरा देणारें घरटें

कांहीं दांपत्यांना राजाराणीचा संसार करण्याची संधि लाभत. पण त्या सुखांत तीं मश्गुल होत नाहींत. त्यांना जणुं एकटें रहावतच नाहीं. स्वतःपुरतें पहाण्याची त्यांची वृत्तीच असत नाहीं. सुंदर फुलांभोंवतीं जशीं फुलपांखरें जमतात तशीं त्यांच्याभोंवतीं माणसें जमतात. एकाद्या मोठ्या वृक्षाच्या आसऱ्याला चारी दिशांनीं पांखरें यावींत तशीं त्यांच्या घरांत मुलेंमाणसें गोळा होतात. दादासाहेब आणि वत्सलाबाई यांच्या बाबतींत तसेंच झालें.

त्यांनीं १९३२ मध्यें नाना चौकांतील हरि निवासमध्यें स्वतंत्र बिऱ्हाड थाटलें आणि दुसऱ्याच वर्षी, १९३३ मध्यें, कुमारी वारणाबाई त्यांच्याकडे राहावयास आली. वारणाबाई ही वत्सलाबाईंची धाकटी बहीण. ती हरि निवास मध्यें आली त्या वेळीं ती तेरा चौदा वर्षांची होती. पूर्वी मराठी शाळेंत जात होती. येथेंहि शाळेला जाऊं लागली. वत्सलाबाईंना धाकट्या बहिणीची सोबत फार सुखावह झाली. पण ती फक्त दीड वर्षच.

कारण वारणाबाईला शिक्षण देण्याऐवजीं तिचा विवाह उरकून टाकावा असा सर्वांचा आग्रह होता. तद्नुसार वरसंशोधन सुरूं झालें. वरसंशोधनाचें कार्य नातलगांच्या सहकार्यानें झालें खरें, पण त्यांत पुढाकार घेतला दादासाहेबांनीं. चेंबूरच्या सुखवस्तु शिंदे घराण्यांतील श्री गोविंदराव यांची वर म्हणून निवड करण्यांत आली. आणि वारणाबाईचा त्यांच्याशी थाटानें विवाह झाला.

वारणाबाईची जागा घेतली इंदिरा हिनें. इंदिरा ही श्री बाळकृष्ण अनाजीराव जाधव यांची मुलगी. जाधवांना तीन अपत्यें. इंदिरा, सतीश

आणि शशिकान्त. इंदिरा आपल्या भावंडांत वडील. ती १९३४ मध्यें दादासाहेबांकडे राहावयास आली. असें म्हणण्यापेक्षां दादासाहेबांनींच तिला उचलून आणलें असें म्हणणें उचित ठरेल. कारण इंदिरा त्यावेळीं होती तीन वर्षांची. बोबडे बोलणारी, खेळकर आणि लडिवाळ. मोरे पतिपत्नींना तिचा पूर्वींच लळा लागला होता. एकुलत्या एक अशा लाडक्या लेकीची हौस करावी तशी उभयतां पतिपत्नींनीं इंदिरेची पुरवली. वत्सलाबाई तिची केश-रचना करीत आणि फुलें माळीत. दादासाहेब तिच्यासाठीं फोर्टमधून खेळणीं व बाहुल्या आणीत, रंगीबेरंगी फ्रॉक आणि तांबड्या रंगाचे बूट खरेदी करीत. तिला सजविण्यांत, तिच्याशी खेळण्यांत, तिला रमविण्यांत, सुख-विण्यांत पतिपत्नींना मनस्वी सुख होत असे. आणि इंदिरेचें वागणेंहि असायचें मन खुलविणारें, कामाचा शीण हलकें करणारें. इंदिरा सहा वर्षांची झाली आणि शाळेंत जाऊं लागली. अभ्यासू आणि बुद्धीनें तीक्ष्ण. परंतु ती पंधरा वर्षांची झाली त्यावेळीं बाळकृष्णदादांनीं आणि लक्ष्मीबाईनीं तिच्या विवाहाचा विषय काढला आणि पुढल्याच वर्षी तिचा श्री. आत्माराम राघोजी घाग यांच्याशीं विवाह घडवून आणला.

आज तिचा संसार मुलांबाळांनीं, सुखसमृद्धीनें फुलला आहे.

इंदिरा घरीं आली, त्याच वर्षी दादासाहेब तुरंबवच्या एका मुलाला घेऊन आले. त्या मुलाचें नांव बाबाजी गोविंद देसाई. बाबाजी हा दादासाहेबांच्या मावशीचा मुलगा. दादासाहेबांच्या मातोश्री ह्या ज्येष्ठ भगिनी आणि त्यांच्या पाठीला पाठ लावून आली ती मुक्ताबाई. मुक्ताबाईचा हा मुलगा तुरंबवच्या शाळेंत चौथीपर्यंत शिकला. पण त्याचें शिक्षण तेथेंच खुंटलें. कारण तुरंबवला पुढील शिक्षणाची सोय नव्हती. बाबाजी रुपानें देखणा आणि बुद्धीनें हुशार. आपण शिकावें असें त्याला फार वाटे. पण शिकणार कसें? गांवांत शिकण्याची सोय नव्हती. आणि इतर ठिकाणीं शिक्षणासाठीं पाठविण्याइतकी घरची सांपत्तिक स्थिति नव्हती. घरीं जेवावें आणि गुराखी मुलांची भाकरी नदीकाठीं नेऊन द्यावी असा त्याचा कांहीं दिवस क्रम होता.

दादासाहेब मे १९३४ मध्यें तुरंबवला गेले होते त्यावेळीं त्यांनीं अकरा वर्षांच्या बाबाजीला वरील अवस्थेंत पाहिलें आणि ते मुंबईला परतले ते बाबाजीला बरोबर घेऊन.

बाबाजींचें इंग्रजी पहिलींत नांव दाखल करण्यांत आलें तें बॉम्बे एज्युकेशन लीगच्या शाळेमध्यें. हल्लींच्या मराठा मंदिरच्या ठाकुरद्वार हायस्कूलमध्यें. श्री. बाबाजी गोविंदराव देसाई त्या वेळची आठवण सांगतांना म्हणतात, " दादासाहेबांनीं हरिनिवासमध्यें जी दोन गाळ्यांची मोठी जागा घेतली होती तिचें भाडें होतें महिना रु. १७. सबंध मजल्यावर फक्त आमचेंच बिऱ्हाड. इतर खोल्या रिकाम्या आणि त्यांच्या किल्ल्या होत्या आमच्याकडे. त्यामुळें मला, रघुनाथराव घाग आणि दत्ताराम पवार यांना अभ्यास करायला भरपूर जागा होती.

" दादासाहेब मला अभ्यास कर असें कधीं सांगत नसत आणि कधीहि रागवत नसत. पण त्यांची मला फार भीति वाटायची आणि त्यामुळें मी त्यांना कधींहि अभ्यासांतील शंका विचारीत नसे. माझें प्रगतिपत्र त्यांना दाखवून त्यावर त्यांची पालक म्हणून सही घेतांनाहि माझी छाती धडधडत असे. माझी वारंवार होणारी अशी अवस्था पाहून ते मला एकदां म्हणाले, 'अरे, तुझा वर्गांत पहिला नंबर आणि प्रगतिपत्रक दाखवायला तुला एवढी भीति कशासाठीं ?'

" मी १९४२ मध्यें मॅट्रिक पास झालों. परंतु त्या आधींच दादासाहेबांनीं मला सामाजिक कार्याला जुंपले होतें. सामाजिक कार्याची मला गोडी वाटूं लागली ती त्यांच्याचमुळें.

" शिक्षण झाल्यानंतर त्यांनीं मला प्रथम मेबासर प्रिंटिंग वर्क्समध्यें नोकरीस लावलें. कांहीं दिवसांनीं त्यांच्या प्रयत्नानें मला फोर्ड मोटरमध्यें नोकरी मिळाली. आणि मग या दोन्हीहि नोकऱ्यांपेक्षां आर्थिकदृष्ट्या फलदायी अशी नोकरी मिळाली ती दादासाहेबांच्या बँकेंत.

" माझा विवाह करून माझा संसार उभा केला तोहि दादासाहेबांनीच. दादासाहेबांनी मला मुंबईला आणलें नसतें तर माझ्या आयुष्याचें काय झालें असतें कुणास ठाऊक ! "

गत आयुष्यांतील या आठवणी सांगत असतांना बाबाजीरावांच्या अंतःकरणांत दादासाहेबांबद्दल असलेला गाढ आदरभाव पदोपदीं व्यक्त होत होता. अशीच आदरबुद्धि आणखी एका पदवीधर सद्गृहस्थांनीं पत्रें

पाठवून प्रकट केली आहे. श्री दत्ताराम जयराम पवार हें त्यांचें नांव. श्री पवार सध्यां कैरा जिल्ह्यांत वासो या ठिकाणीं केन्द्र सरकारच्या एक्साईज खात्यांत डे. सुपरिंटेंडेंटच्या हुद्यावर आहेत. श्री पवार आपल्या पत्रांत म्हणतात, "मी दादासाहेबांकडे वर्ष दीड वर्ष रहावयास होतों. ते मला इंग्रजी शिकवीत असत. त्यांनीं माझ्याकडून तर्खडकरांची तीन भाषांतरें करून घेतलीं. प्रसंगीं माराहि खाल्ला. त्यांनीं माझ्या अंतःकरणांत शिक्षणाची तीव्र इच्छा निर्माण केली. आज मी ज्या परिस्थितींत आहे त्याचें श्रेय दादासाहेबांनीं माझ्या ठिकाणीं उत्पन्न केलेल्या शिक्षणप्रेमाला द्यावें लागेल."

याच सुमारास दादासाहेबांकडे आणखी एक मुलगा शिकावयास आला. वत्सलाबाईंचा भाऊ रघुनाथराव घाग. रघुनाथराव दोन अडीच वर्षें दादासाहेबांकडे होते. त्यांचें शिक्षण झाल्यानंतर दादासाहेबांनीं त्यांना फर्स्ट नॅशनल बॅंकेमध्यें नोकरीस लावले.

श्री. रघुनाथराव सध्यां ग्लासगो कंपनीमध्यें अधिकाऱ्याच्या जागेवर चांगला पगार घेत आहेत.

१९३० च्या सुमारास श्री रामचंद्र भिकाजी अंगणे दादासाहेबांकडे राहावयास आले. दादासाहेबांचे ते राममोहनमधील स्नेही. घरच्या प्रतिकूल परिस्थितीमुळें श्री अंगणे मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेऊं शकले नाहींत. त्यांनीं अर्ध्यावरच शाळा सोडली आणि नोकरी करण्याचा प्रयत्न केला. त्यांना नोकरी मिळे पण ती मनासारखी नसे. स्वभावाला न जुळणाऱ्या, वृत्तीला न मानवणाऱ्या नोकऱ्या परिस्थितीच्या दडपणामुळें कित्येकांना कराव्या लागतात. अंगणे यांच्यावरहि असाच प्रसंग येई. पण अशा नोकरींत मन न रमल्यामुळें ते कायम एकाच ठिकाणी राहूं शकले नाहींत. त्यांना वारंवार बेकारीला तोंड द्यावें लागे. अशा बेकारीच्या काळांत दादासाहेब हेच अंगणे यांचें आशास्थान. ते निर्धास्तपणें दादासाहेबांकडे मुक्काम ठोकीत.

त्या वेळच्या आठवणी सांगतांना श्री अंगणे म्हणतात, ऑगस्ट १९४० पर्यंत दादासाहेब नाना चौकांतील हरिनिवासमध्येंच रहात होते. त्यांनी ऑगस्ट १९४० मध्यें बिऱ्हाड बदललें व ते सोनावाला बिल्डिंगमध्यें राहावयास आले. तेव्हांपासून ते तेथेंच आहेत. बिऱ्हाड बदललें त्यावेळी

वत्सलावहिनी माहेरीं गेल्या होत्या. हरिनिवासमधील संसार सोनावाला इमारतीच्या नव्या जागेंत मांडला तो मींच. मींच स्वयंपाक केला. मला स्वयंपाक चांगला करतां येई. आतां पूर्वीपेक्षां अधिक चांगला करतों. दादासाहेब माझ्या पाककौशल्यावर निहायत खूष असत.

श्री अंगणे पुढें म्हणतात, माझी बेकारी आठपंधरा दिवसांची नसायची. ती मोठी चिवट. महिनोगणती टिकून रहायची. पण माझ्या बेकारीच्या दिवसांत दादासाहेबांनीं माझ्याकडे कधी तुच्छतेने पाहिलें नाही कीं रागाचा शब्द उच्चारला नाही. मी चांगला जेवायचा आणि भरलेल्या पोटावर लागोपाठ दोन सिगारेट ओढायचा. सिगारेटचा खर्च अर्थात दादासाहेबांचा !''

श्री रामचंद्रराव अंगणे यांनीं १९४२ मध्यें लष्करांत नोकरी धरली. सध्यां त सुभेदार म्हणून काश्मीरच्या आघाडीवर खडे आहेत. रामचंद्रराव सैन्यांत घुसले त्याच सुमारास पांच वर्षांच्या शिवाजीनें दादासाहेबांच्या घरीं प्रवेश केला. दौलतराव घाग यांचा हा सर्वांत लहान मुलगा आणि वत्सला-बाईचा सर्वांत लहान भाऊ. दादासाहेबांनीं शिवाजीला मराठी शाळेंत घातलें. चौथी पास झाल्यानंतर शिवाजी इंग्रजी शाळेंत गेला. पण त्याचें शिक्षणाकडे विशेष लक्ष नव्हतें. इंग्रजी पांचवी इयत्ता झाल्यानंतर त्यानें हातांतील पुस्तकें बाजूला सारलीं. म्हणून दादासाहेबांनी त्याला मराठा मंदिर को-ऑपरेटिव्ह बँकेंत नोकरीस लावून दिलें.

१९४५ ते १९५० च्या दरम्यान दादासाहेबांकडे दोन मुली राहावयास आल्या. मालती आणि वत्सला. सौ गंगूबाई पंडित ह्या दादासाहेबांच्या मोठ्या भगिनी. त्यांच्या ह्या मुली. प्रथम आली मालती, नंतर आली वत्सला. मालतीबाईचें पांचवीपर्यंत शिक्षण झालें. ती पांच वर्षें दादासाहेबांकडेच होती. मोठी होतांच दादासाहेबांनीं तिचा विवाह करून दिला. हा विवाह वरळी हायस्कूलच्या हॉलमध्यें मोठ्या थाटानें पार पडला.

मालतीची लहान बहीण वत्सला ही दादासाहेबांच्या घरीं आठ वर्षें होती. तिचें शिक्षण मुंबईस दादासाहेबांच्या घरींच झालें. ती उपवर होतांच दादासाहेबांनी पांच हजार रुपये खर्चून तिचा विवाह मराठा मंदिरच्या शिवाजी महाराज शिन्दे हॉलमध्यें घडवून आणला.

१९५१ च्या सुमारास सौ. लक्ष्मीबाई जाधव गिमवीहून (गुहागर) तालुक्यांतील चिपळूणपासून जवळ असलेलें गांव) आपल्या चार वर्षांच्या शशिकान्तसह मुंबईस आल्या. त्यावेळीं बाळकृष्णराव जाधव ऑफ्रिकेंत नोकरीसाठीं गेले होते. कांहीं चांगल्या माणसांना विशिष्ट कारणामुळें आयुष्यांत वाईट अनुभव येतात, दुःखें सहन करावीं लागतात, तशींच तीं बाळकृष्णरावांना सहन करावीं लागलीं. ते फर्स्ट नॅशनल् सिटी बँकेंत नोकरीस होते. पण तेथील त्यांची नोकरी सुटली. त्यानंतर त्यांनीं तीनचार ठिकाणीं नोकऱ्या केल्या. एक नोकरी सुटून दुसरी लागेपर्यंत बराच कालावधि लोटत असे. पण हा बेकारीचा काळ त्यांना असह्य वाटला नाहीं. कारण दादासाहेब सतत त्यांच्या पाठीशीं उभे होते. दादासाहेबांना बाळकृष्णरावांनीं दोन वर्षें आधार दिला पण दादासाहेबांनीं बाळकृष्णरावांना कित्येक वर्षें आर्थिक साहाय्य केलें.

लक्ष्मीबाई जाधव मुंबईस आल्या त्या शशिकान्तासाठीं. चौथ्या वर्षी शशिकान्तला पोलिओनें गांठलें आणि त्याला लुळें केलें. मानेपासून पायापर्यंत त्याचें सर्वांग निर्जीव झालें होतें. दादासाहेबांनीं डॉ. आर. के. भोसले यांच्याकडे त्याला लगेच उपचारासाठीं नेलें. डॉ. भोसले हे पाश्चिमात्य देशांत मसाजचें शिक्षण घेऊन आले होते. आणि त्यांच्या हातून पोलिओचे रोगी बरे होतात असा त्यांचा लौकिक होता. डॉ. भोसले यांनीं सतत दीड वर्ष शशिकान्तवर उपचार केले आणि मग केम्प कंपनीतील पायाचा आधार घेऊन शशिकान्त फिरूं लागला. त्याला पायावर उभा करण्यासाठीं दादासाहेबांनीं दोन हजार रुपये खर्च केले.

त्या नंतर आठनऊ वर्षांनीं मोरे पतिपत्नींच्या मनावर एक मोठा आघात झाला. तो शिवाजी घागच्या मृत्यूनें. शिवाजी त्यांच्याकडे पांच वर्षांपासून राहात होता. दादासाहेबांनीं व कमलाबाईंनीं त्याला मुलाप्रमाणें सांभाळलें होतें; त्याच्यावर माया केली होती. पण १९६० च्या सुमारास शिवाजीला क्षय झाला आणि त्यानें अंथरुण धरलें. त्याला उठविण्यासाठीं दादासाहेबांनीं प्रयत्नांची शिकस्त केली. त्याला पुण्याला हॉस्पिटलमध्यें ठेवलें. पांचगणी येथें ठेवून औषधोपचार केले. सहासात हजार रुपये खर्च केले. पण शिवाजी

दिवसेंदिवस अधिक क्षीण होत चालला आणि अखेर दहिवली येथें त्याचा अंत झाला.

या घरट्यांत १९३३ पासून १९६० पर्यंत अनेक पांखरें आलीं. कांही तुरंबवहून, कांहीं दहिवलीहून, कांहीं गिमवीहून आणि कांही मुंबईचींच. मुलें आली आणि वाढलीं. त्यांच्या जीवनांत दादासाहेब व वत्सलाबाई दोघेहि रंगलीं, त्यांना वाढविण्यासाठीं पतिपत्नींना आनंद वाटला.

पण आलेलीं पांखरें पंख फुटतांच दाही दिशांना उडून गेलीं आणि अखेर घरट्यांत राहिले दोन जीव......पांखरांच्या पंखांत बळ आणणारीं, त्यांना उडावयास शिकविणारीं, त्यांच्या पंखांना गति देणारीं अपत्यहीन मातापिता !

तीं दोघें अखेरपर्यंत एकटींच राहाणार काय ?

********

# ९

# सहकार्य केलें, तुरंबव नटलें

१९४० एप्रिलमधील पहिला रविवार. सकाळीं दहाच्या सुमारास दादासाहेबानीं दोन पाहुण्यांचें मोठ्या आस्थेनें स्वागत केलें. पाहुणे तुरंबवचे. कै. माधवराव बाबाजीराव ऊर्फ आबासाहेब पंडित आणि श्री मारुतीराव भिकाजीराव पंडित. गांवचे सेवक आणि नेते. आपल्या मागासलेल्या गांवांची सुधारणा व्हावी अशी त्यांची तळमळ आणि धडपड. पण दोघांचें व्यक्तिमत्व भिन्न.

कै. आबासाहेबांचा पोषाख अगदीं साधा. डोक्यावर पिंगट रंगाची टोपी. सदऱ्यावर दाट रंगाचा सुती स्वेटर आणि त्यावर जाड लोकरी जाकीट. सदऱ्याला आणि जाकीटाला बटणें सहसा लावलेलीं नसायचीं. चेहरा लांबट, कपाळ उंच, नाक लांब आणि कान मोठे. डोळे खोल गेलेले आणि त्यांवर झोंपेपर्यंत चष्मा. शिक्षण मराठी चौथीपर्यंत झालेलें. १९०३ सालीं, वयाच्या १९ व्या वर्षीं ते मिलिटरींत भरती झाले आणि त्यांनीं पहिल्या महायुद्धांत मर्दुमकी गाजवली. एकदां एका गोऱ्या अंमलदारानें त्यांना कांहीं कारणामुळें शिवी दिली. म्हणून त्यांनीं अधिकाऱ्याला बेदम चोप दिला. त्यामुळें त्यांच्यावर शिस्तभंगाचा इलाज होऊन ते हवालदार मेजर हुद्यावरूनच पेन्शनींत आले.

श्री मारुतीरावांचा पोषाख प्रथमपासूनच ठाकठीक. अंगांत लांब कोट आणि डोक्याला पांढरा रुमाल. कोटाला व सदऱ्याला बटणें लावलेलीं आणि रुमाल व्यवस्थित बांधलेला. डोळे भावपूर्ण आणि रेखीव. नाक लांब व तरतरीत. त्याखालीं कातरलेली बारीक मिशी. शिक्षण मराठी पांचवीपर्यंत. शेतीची व बागायतीची प्रथमपासून आवड. त्यांनीं प्रथम एक बगीचा केला.

पण आतां त्यांत फुलें, भाजा आणि फळें यांचें मोठें उत्पन्न येतें. त्यांनीं बगीच्याप्रमाणेंच आपला गांवहि फुलविला.

दादासाहेबांना या दोनहि व्यक्तींबद्दल प्रथमपासून आदर. त्या आदराला साजेसें चहापाणी झाल्यानंतर कै. आबासाहेब पंडितांनीं आपण तुरंबवहून कां आलों तें सांगितलें.

ज्या शाळेंत दादासाहेबांचें प्राथमिक तीन इयत्तांपर्यंत शिक्षण झालें होतें त्या श्री शारदा मंदिराची इमारत फार जुनी झाली होती. मोडकळीस आली होती. भिंती पडायला झाल्या होत्या. कौलें उडालीं होतीं. पावसाळ्यांत पाणी येत होतें. शिवाय प्रतिवर्षी मुलांची संख्या फुगत होती. इमारत विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येला अपुरी होती.

शाळेची ही अवस्था पाहून आबासाहेब व मारुतीराव यांनीं कांहीं दिवसांपूर्वी ग्रामस्थांची एक सभा घेतली होती. तींत विचारविनिमय झाला होता. शाळेसाठीं नवी इमारत बांधायचें ठरलें होतें. या कामाला साधारणपणें दीडदोन हजार रुपये लागतील असा अंदाज होता.

एवढें सांगून झाल्यावर आबासाहेब म्हणाले, पण पैसा कुठून आणायचा ? हा पैसा मुंबईहून यावा अशी गांवकऱ्यांची इच्छा आहे. दादासाहेब, तुम्ही गांवचे पहिले मॅट्रिक. सार्वजनिक कामाची तुम्हांला आवड आहे हें आम्हांला माहीत आहे. तेव्हां निधि गोळा करण्याच्या कामीं तुम्ही पुढाकार घ्यावा.

आणि मग दादासाहेबांनीं पुढाकार घेऊन कुलाबा येथें चंदारामजी प्रेसच्या बिल्डिंगमध्यें १९ एप्रिल १९४० रोजीं एक सभा घेतली. तुरंबवच्या पंचवीसतीस लोकांना निमंत्रणें देण्यांत आली होतीं. सभेंत असें ठरलें कीं, " श्री. शारदा फंड तुरंबव " या नांवाची संस्था स्थापून शाळेच्या इमारतीसाठीं निधि जमा करावा.

या कार्यासाठीं दोन कार्यकारी मंडळें निवडण्यांत आलीं. एक मुंबईसाठीं, दुसरें तुरंबवकरतां. तुरंबवच्या कार्यकारी मंडळाचें अध्यक्षस्थान आबासाहेबांना देण्यांत आलें आणि मुंबईच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षस्थानीं दादासाहेबांची नियुक्ती झाली.

तुरंबवच्या ज्या लोकांची महिना रु. २५ मिळकत आहे अशा

लोकांकडून मासिक चार आणे सभासदवर्गणी म्हणून द्यावे असें ठरविण्यांत आलें. आणि तदनुसार निधि जमविण्याच्या कामाला प्रारंभ झाला. साधारणतः दीड वर्षांत रु. ३०० जमले.

येवढी रक्कम हातीं येतांच ग्रामस्थांनीं शाळेच्या इमारतीचा पाया खणला आणि दादासाहेबांनीं ता. २६–१०–१९४१ रोजीं तिची कोनशिला बसविली.

पाया भरला आणि पैसा संपला. ग्रामस्थांनीं मुंबईकडे पैशाची मागणी केली. वर्गणीच्या स्वरूपांत फार मोठी रक्कम जमत नाहीं असा अनुभव पूर्वींच आला होता. म्हणून दादासाहेबांनीं एक नाटक करायचें ठरविलें. नाटकासाठीं श्री. नानू संझगिरी यांच्या सहाय्यानें नाट्यसंस्थेचीहि स्थापना झाली. आणि "म्हातारपणचे डोहाळे" या नाटकाचा प्रयोग बालीवाला थिएटरमध्यें सादर करण्यांत आला. नाटकाचें उत्पन्न झालें रु. ११५०. त्यांपैकीं दादासाहेबांनीं तिकीटविक्री करून मिळविले होते रु. ६७५. खर्च वजा जातां कार्यकारी मंडळाच्या हातीं रु. ९०० आले. शिवाय देणग्यांच्या स्वरूपांत रु. ३०० मिळाले होते. अशा रीतीनें मुंबईच्या कार्यकर्त्यांनीं रु. १२०० तुरंबवला पाठविले.

शाळेच्या भिंती सरसर वर चढूं लागल्या आणि बाराशें रुपयांचा फन्ना उडाला. ग्रामस्थ समितीनें खर्चाच्या बाबतींत जो अंदाज केला होता तो चुकला होता. त्यांना अद्यापि रु. २००० ची आवश्यकता होती. म्हणून तुरंबवचे दोन्ही पुढारी मुंबईत पुनः दाखल झाले.

मुंबईत ग्रामस्थांची पुनः सभा झाली. तींत आबासाहेब आणि मारुतीराव यांनीं आपल्या अडचणी सांगितल्या. इमारत संपूर्ण दगडांची असल्यामुळे आणि वापरलेलें साहित्य चांगलें असल्यामुळें खर्च वाढत चालल्याचें त्यानीं निवेदन केलें. शेवटीं अधिक लागणारा पैसा कसा उभा करावा यासंबंधीं चर्चा होऊन देणग्यांच्या रूपानें निधि गोळा करण्याचा निर्णय घेण्यांत आला आणि त्याच सभेंत देणग्यांचे आंकडे टाकण्यांत आले. देणग्यांची एकूण रक्कम रु. १५०३ इतकी झाली. त्यांपैकीं दादासाहेबांचें रु. २०१ होते. आपल्या मातोश्रींच्या नांवें दिलेली ती देणगी होती.

हे पंधराशें रुपये संपले, पण इमारतीचें काम संपलें नाहीं. ग्रामस्थांनीं पुनः पैशाची मागणी केली. आतां वर्गणी-देणग्यांचा मार्ग खुंटला होता. म्हणून

दादासाहेबांनीं पुनः नाटकाचा प्रयोग करण्याचें ठरविलें. नाटकाचें नांव आचार्य अत्रे यांचें 'वंदे मातरम्'. प्रयोग वालीवाला नाट्यगृहांत झाला आणि उत्पन्न रु. १४५० आलें. त्यांपैकीं दादासाहेबांनीं जमविले रु. ७५८. खर्च वजा जातां कार्यकारी मंडळाच्या हातीं रु. ११०० आले.

या रकमेच्या आधारें तुरंबवचें श्री शारदा मंदिर पूर्ण झालें. तें उभें करण्यासाठीं हरिजनांसह सर्व गांवकऱ्यांनीं श्रमदान केलें. कोणी दगड उचलले, कोणी चुना तयार केला, कुणी वासे आणले, कुणी तुळया आणल्या. दादासाहेबांच्या मातोश्री कै. कृष्णाबाई यांच्या नांवें एक खोलीहि बांधण्यांत आली. अशा रीतीनें दहा हजारांचें काम सहा हजारांत आटोपलें.

शाळेचें उदघाटन झालें त्यावेळीं दादासाहेब जातीनें उपस्थित होते. उद्घाटक म्हणून त्यावेळचे रत्नागिरीच्या डि. लो. बोर्डाचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर श्री रेगे यांना पाचारण करण्यांत आलें होतें. या प्रसंगीं भाषण करतांना श्री रेगे यांनीं प्रशस्ति दिली ती अशी: रत्नागिरी जिल्हा उत्तर भागामध्यें तुरंबवच्या शाळेच्या इमारतीसारखी नमुनेदार इमारत दुसरी नाहीं.

उद्घाटनानंतर श्री. शारदा मंदिर मुलामुलींनीं फुलून गेलें.

शाळेच्या इमारतीचा प्रश्न ग्रामस्थांनीं प्रयत्नपूर्वक सोडवला तसाच पोस्ट ऑफिसचाहि. १९४२ पर्यंत तुरंबवचे बरेच लोक मुंबईत स्थायिक झाले होते. ते तुरंबवला आपल्या घरीं पत्रें पाठवून क्षेम कळवीत. पण पत्रें वेळेवर पोचायला पाहिजेत ना ? मुंबईचें टपाल तुरंबवला चार दिवसांनीं पोचायचें. टपालवाला सोमवारीं येऊन गेला कीं तो पुनः गुरुवारी किंवा शुक्रवारीं तोंड दाखवायचा. कारण गांवांत पोस्ट ऑफिसच नव्हतें. ही अडचण दूर करण्यासाठीं ग्रामस्थांनीं दादासाहेबांच्या नेतृत्वाखालीं पोस्टाच्या प्रमुख अधिकाऱ्याकडे अर्ज केला, पत्रव्यवहार चालू ठेवला आणि गांवासाठीं पोस्ट ऑफिस मिळविलें. या टपालकचेरीचें उद्घाटन दादासाहेबांच्या हस्तें ता. ९-९-१९४२ रोजीं झालें.

एक दिवस आड करून, दर दोन दिवसांनीं टपाल मिळूं लागलें. पुढें पोस्टाचें उत्पन्न वाढलें. तसा एक रनरहि मिळाला. आणि ग्रामस्थ मुंबईचीं पत्रें दररोज वाचूं लागले.

तुरंबवच्या पोस्ट कचेरीचें काम थोड्याच दिवसांत एवढें वाढलें कीं, कचेरीला दिलेली जागा अपुरी पडूं लागली. पुरेशा जागेच्या अभावीं कामाची गैरसोय होऊं लागली. पण त्या गैरसोयीपेक्षां शाळेच्या बाबतींत होणारी दुसरी एक अडचण एकसारखी डोकें वर काढूं लागली. शाळेची इमारत झाली; तींत मुलांची दाटीहि झाली. पण त्यांना शिकवायला शिक्षक पाहिजेत ना? शाळेचे जे शिक्षक बाहेरून येत त्यांना एखाद्या पडवींत किंवा अडचणीच्या जागीं आपला संसार थाटावा लागे. नवे शिक्षक अवसानपूर्वक तुरंबवमध्यें पांचसहा महिने काढीत आणि मग कंटाळून गांवाचा व शाळेचा निरोप घेत. पुनः नवीन शिक्षक यावयाचे आणि थोड्याच दिवसांत निघून जावयाचे. या दुरवस्थेनें मुलांची हेळसांड झाली. ग्रामस्थ बेचैन झाले. त्यांनीं अखेर ठरविलें कीं, शिक्षकांसाठीं मोफत वसतिगृह बांधावयाचें व त्यांतच एका खोलींत पोस्टाची कचेरी थाटून द्यावयाची.

वसतिगृह बांधण्याचा विचार निश्चितच चांगला होता. पण त्यासाठीं पैसा कुठें होता? याबाबतींत श्री शारदा समाज सेवा मंडळाच्या अहवालांत केलेला उल्लेख बोलका आहे. अहवाल म्हणतो. "सभासदांकडून वर्गणी वेळेवर येईनाशी झाली व शिल्लक तर कांहींही नव्हती. तेव्हां थोडीशी उसनवार करून कामाला सुरवात करण्याचें ठरलें व त्याप्रमाणें कामास सुरवात झाली. आणि लगेच पैशाचा तगादा मुंबईतील मंडळाकडे सुरू केला."

तुरंबवहून पैशाची मागणी होतांच दादासाहेबांनीं मंडळाचे अध्यक्ष या नात्यानें संस्थेची सभा घेतली आणि सभेचें प्रयोजन विशद केलें. या सभेंत असें ठरलें कीं, एखादा कार्यक्रम करून पैसा गोळा करावा व तो गांवीं पाठवावा.

या निर्णयानुसार दादासाहेब लगेच कामाला लागले. नाटकांचीं पुस्तकें चाळलीं गेलीं. श्री. नानू संझगिरी आणि इतर नाट्यप्रेमी लोक यांच्या बैठकी दादासाहेबांच्या घरीं होऊं लागल्या. आणि मग असा निर्णय घेण्यांत आला कीं, "साष्टांग नमस्कारा"चा प्रयोग करावयाचा.

श्री. रतिलाल वाडिया यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या 'साष्टांग नमस्कारानें' तिकीट विक्रीचे रु. १५६० दिले. त्यांपैकीं दादासाहेबांनीं रु. ९९५

जमविले. समारंभाचे अध्यक्ष श्री. वाडिया यांनीं पांचशें रुपयांची देणगी दिली. खर्च वजा जातां रु. १२०० कार्यकर्त्यांच्या हातीं आले.

एवढा पैसा आणि तेवढ्याच मोलाचें श्रमदान एकत्र येऊन वसतिगृह पूर्ण झालें. त्यांत सहा मोठ्या खोल्या बांधल्या होत्या. पांच खोल्यांत शिक्षकांचे संसार सुरू झाले आणि सहाव्या खोलींत पोस्टाचा प्रपंच उभा राहिला.

दादासाहेब यांना माधवराव बाबाजीराव पंडित यांच्याबद्दल प्रथमपासून आदर होता. त्यांचा सत्कार करून तो व्यक्त करावा असें दादासाहेबांना कित्येक दिवसांपासून वाटत होतें. १९५० मध्यें माधवराव मुंबईस आले असतां दादासाहेबांनीं एक सत्कार समारंभ घडवून आणला आणि माधवरावांच्या कार्याचा गौरव केला. त्यानंतर तीन वर्षांनीं माधवराव दीर्घ आजारानंतर ता. २७-५-५३ रोजीं कालवश झाले. संस्थेच्या कोंदणांतील एक हिरा हरपला. संस्थेचें न भरून येण्यासारखें नुकसान झालें. त्यांच्या निधनानिमित्त दादासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं दुखवट्याची सभा घेण्यांत आली. या सभेंत कै. माधवरावांना श्रद्धांजलि वहाण्यांत आली आणि त्यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करण्यांत आले.

कै. माधवराव यांचा सत्कार ज्या सर्वसाधारण सभेंत झाला तींत मंडळाचें " श्री शारदा फंड " हें नांव बदलण्यांत आलें. त्या ऐवजीं संस्थेनें " श्री शारदा समाज सेवा मंडळ, तुरंबव " असें नवें नांव धारण केलें.

या नव्या नांवानें ता. ११ एप्रिल १९५३ रोजी संस्थेचीं पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खालीं नोंद करण्यांत आली. या प्रसंगीं डेप्यूटी चॅरिटी कमिशनरनें दादासाहेबांजवळ जे उद्गार काढले ते उल्लेखनीय आहेत. ते म्हणाले, " मिस्टर मोरे, तुम्ही आपल्या गांवच्या शिक्षकांसाठीं वसतिगृह बांधून जशी सोय केली आहे तशी रत्नागिरी, कुलाबा आणि ठाणें या जिल्ह्यांत अद्यापि इतर कोणत्याही संस्थेनें केलेलीं नाहीं."

मंडळानें आतांपर्यंत जें कार्य केलें त्यामुळें कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. दादासाहेबांनीं त्या आत्मविश्वासाला गति देऊन ग्रामस्थ मंडळाकडून अधिक कामें करवून घेण्याची योजना मांडली. त्यांतील पहिलें काम साकवासंबंधीं. पावसाळ्यांत ओढ्यांत पाणी आलें म्हणजे तुरंबवच्या वाड्या अलग पडतात आणि एका भागाचा दुसऱ्याशीं संबंध राहात नाहीं.






कै. माधवराव बाबाजीराव ऊर्फ
आबासाहेब पंडित

श्री. मारुतीराव भिकाजीराव
पंडित


श्री. शारदा समाज सेवा मंडळ, तुरंबव—भूतपूर्व व विद्यमान् अध्यक्ष




श्री. गणपतराव शिवराम पंडित, मंडळाचे उपाध्यक्ष




श्री शारदा समाज सेवा मंडळ, तुरंबव, मुंबई—कार्यकारी मंडळ ( १९५६ )



तुरंबवचें श्री शारदा मंदिर



तुरंबवचा पूल



श्री शारदा समाज सेवा मंडळ, तुरंबव या संस्थेचें १५ वें स्नेहसंमेलन—
अध्यक्षस्थानीं श्री. आर. के. गोखले आहेत.



रत्नागिरीचे कलेक्टर श्री. कसबेकर यांच्या हस्तें तुरंबव रस्त्याचें उद्घाटन

शाळेजवळ जो ओढा आहे तो वर्षांतून दोनतीन वेळां असा फुगतो कीं ओढ्याच्या पलीकडे असलेल्या वार्डींतील मुलांना शाळेला जातांच येत नाहीं. ही स्थिति पालटण्यासाठीं १९५२ मध्यें गांवकऱ्यांनीं शाळेजवळील पऱ्यावर, पिंपळाच्या शेजारीं, एक मोठा मजबूत साकव बांधला. त्यासाठीं रु. ५०० खर्च आला. त्यांपैकीं ग्रामस्थांनीं वर्गणी व श्रमदानाच्या स्वरूपांत रु. ४०० जमविले होते आणि जिल्हाधिकारी श्री. देशपांडे यांनीं रु. १०० बक्षीस म्हणून दिले होते. या साकवामुळें विद्यार्थ्यांना प्रतिवर्षीं पावसाळ्यांत वाटणारी अडचण कायमची दूर झाली.

ग्रामस्थांनीं १९५४ मध्यें दुसऱ्या एका महत्त्वाच्या कामाला हात घातला. हरिजन वार्डींत एक तळी होती. अस्पृश्य त्या तळींतलें पाणी पिण्यासाठीं वापरीत. लोक तळींत उतरत, हातपाय धूत, चूळ भरीत. तळीवरच धुण्याचा व भांडीं घासण्याचा कार्यक्रम व्हावयाचा. कपडे व भांडीं धुतलेलें घाणेरडें पाणी तळींत उतरावयाचें. हेंच समिश्र पाणी पिण्याच्या कामीं यावयाचें. हा प्रकार शतकानुशतकें चालला होता. ग्राम-सुधारणेचें कंकण बांधलेल्या तुरंबवकरांना ह्या गोष्टीची खंत वाटल्या-शिवाय कशी राहील ? त्यांनीं तळी दुरुस्त करून तीभोंवती एक कठडा बांधला. हेतु हा कीं, तळींत कोणी उतरूं नये व पाणी घाण करूं नये. पण ही छोटीशी तळी हरिजनांची पाण्याची गरज भागविण्यास असमर्थ होती. म्हणून ग्रामस्थांनीं तळीशेजारींच एक विहीर खणली व ती बांधवून काढली. या विहीरीस रु. २३०० खर्च आला. विहीरीचें वैशिष्ट्य असे की, ती बांधण्या-साठीं गांवांतील स्पृश्य मंडळींनीं प्रथमपासून अखेरपर्यंत अंगमेहनत केली. हरिजनांना स्पृश्य समाजाबद्दल वाटणारा दुरावा त्या श्रमदानानें नाहींसा झाला.

त्याच वर्षी पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील एक मोठें काम मंडळानें हातीं घेतलें. तें म्हणजे तुरंबव-ओंबळी रस्ता. ह्या रस्त्याचा मुहूर्त झाला (१९५४) त्यावेळीं दादासाहेब मुद्दाम तुरंबवला गेले होते. रस्त्याचा मुहूर्त मामलेदार श्री. डी. एस्. जमदग्नी यांच्या हस्तें झाला. हा रस्ता साडेतेरा फर्लांग लांबीचा व सोळा फूट रुंदीचा आहे आणि त्याचें काम पूर्ण होण्यास १४ महिने लागले. रस्त्यास रु. ६००० खर्च आला. त्यांपैकी अर्धी रक्कम सरकारकडून मिळाली आणि ग्रामस्थांनीं अर्ध्या रकमेचें श्रमदान केलें.

कै. माधवरावांबद्दल दादासाहेबांना जेवढा आदर तेवढाच श्री मारुतीराव पंडित यांच्याबद्दल. माधवरावांच्या निधनानंतर मारुतीराव तुरंबव समितीचे अध्यक्ष झाले. त्यांनीहि गांवाची निरलसपणें सेवा केली. त्यांनीं केलेल्या सार्वजनिक कार्याचा गौरव करण्यासाठीं दादासाहेबांनीं त्यांचा माधव महाराज शिंदे हॉलमध्यें मोठ्या प्रमाणावर सत्कार घडवून आणला. (१५-१२-१९५५)

तुरंबव-ओंबळी रस्त्याचें काम सुरू होण्यापूर्वींच ग्रामस्थांनीं गांवांतील रस्ते रुंद केले होते. जेथें रस्त्यांची आवश्यकता होती तेथें नवे रस्ते बांधले होते. तुरंबवकरांनीं ह्या रस्त्यांची योजना अशी केली आहे कीं, चारहि दिशांनीं गांवांत प्रवेश मिळावा आणि श्री शारदादेवीचें दर्शन सर्वांना सुलभ व्हावें.

याशिवाय ग्रामस्थांनीं शाळेच्या इमारतीभोंवतीं छोटा बगीचा बनविला, विद्यार्थ्यांना खेळण्यासाठीं पटांगण तयार केलें आणि शाळेंत एक ग्रंथालयहि उघडलें.

शाळेला लागणारें सर्व प्रकारचें साहित्य पुरविणें, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणें, शिक्षकांची सोय करणें इत्यादि बाबतींतहि मंडळानें चांगली दक्षता घेतली.

ह्या सर्व सुधारणांमुळें तुरंबवचें स्वरूप पालटलें. सरकारी अधिकारी गांवाला भेट देत आणि सुधारणा पाहून खूष होत. तुरंबव हें रत्नागिरी जिल्ह्यांतील एक नमुनेदार खेडें आहे असा प्रत्येकानें निर्वाळा दिला.

आदर्श खेडें म्हणून सरकारकडून तुरंबवला रु. ५०० चें बक्षीस मिळालें. ( १९५५ )

या रकमेचा उपयोग बुरवण्यावरील मोठा साकव बांधण्यासाठीं करण्यांत आला. ( १९५६ ) बुरवण्याच्या मजबूत साकवामुळें कुणबी समाजांतील मुलांना पावसाळ्यांत शाळेला येणेजाणें सोयीचें झालें आणि शेतकऱ्यांची अडचणहि दूर झाली.

आणखी दोन साकव ग्रामस्थांनीं स्वखर्चानें व श्रमदान करून उभे केले. ते तुरंबव-आंबिटगांव व तुरंबव-निवळी हे होत.

तुरंबव-ओंबळी रस्ता पूर्ण झाल्यानंतर ग्रामस्थांनी सरकारी मदत घेऊन तुरंबव गोखले रस्ता, तुरंबव-आंबीटगांव रस्ता, तुरंबव-वाडदें रस्ता व

ग्रंथ संग्रहालय ...
४०४ ८६

तुरंबव–निवळी रस्ता असे चार रस्ते तयार केले. या पांचहि रस्त्यांमुळें तुरंबवकरांना ओंबळी, आबीटगांव, वांडदें, निवळी या गांवांशी सहज संबंध ठेवतां येतो. या सर्व रस्त्यांसाठीं ग्रामस्थांना रु. २६००० चें श्रमदान करावें लागलें.

१९४२ मध्यें बांधलेली शाळा आणि १९४५ मध्यें बांधलेलें वसतिगृह या दोनहि इमारतींची दुरुस्ती १९५६ मध्यें करावी लागली. त्यासाठीं मंडळाला चारपांच हजार रुपयांची आवश्यकता होती. नेहमींप्रमाणें ग्रामस्थ समितीनें मुंबईकडे पैशाची मागणी केली. ती पूर्ण करण्यासाठीं दादासाहेबांनीं "देवमाणूस" या नाटकाचा प्रयोग केला. या नाटकाचें एकंदर उत्पन्न रु. ३०३७ झालें. त्यापैकीं रु. १८५८ एवढी रक्कम दादासाहेबांनीं देणगी व तिकीटविक्रीच्या स्वरूपांत जमविली.

'देवमाणूस'नें दिलेली रक्कम दुरुस्तीसाठीं अपुरी पडल्यामुळें दादासाहेबांना "राणीचा बाग" हें नाटक बसवावें लागलें. या प्रयोगाचें रु. २११७ उत्पन्न झालें. त्यांपैकीं दादासाहेबांनीं तिकीटविक्री करून रु. १००९ मिळविले.

तुरंबवला वळसा घालणारा निवळी–तुरंबव सीमेवरील ओढा नदीएवढा मोठा आहे. तेवढाच तो त्रासदायकहि आहे. ग्रामस्थांनीं प्रत्येक वर्षी त्यावर साकव बांधावा आणि पुरानें तो वाहून तरी जावा किंवा निकामी तरी व्हावा आणि मग दळणवळण कांहीं आठवडे अशक्य होऊन जावें. हा निरंतर होणारा उपद्रव कायमचा निपटून काढण्यासाठीं ग्रामस्थांनीं त्यावर १९६० मध्यें एक पक्का पूल बांधला. खर्च आला रु. २५०००. त्यांपैकी दहा हजार विकास योजनेंतूत व पांच हजार जिल्हा लोकलबोर्डाकडून मिळालें. बाकीचे दहा हजार संस्थेनें उभे केले. मुंबईच्या कार्यकर्त्यांनीं १९५९ मध्यें एक नाटक करून रु. २०११ जमविले होते ते या पुलाच्या पायाभरणींत कामीं आले.

तुरंबवच्या वाड्या आठ. त्यांपैकीं वाडदे विभाग इतर वाड्यांपासून पाऊण मैलाच्या अंतरावर. लहान मुलें शाळेला यायचीं तीं पाऊण मैलाची पायपीट करून. मुलांना दररोज होणारी दीड मैलाची ही शिक्षा थांबविण्याचा एकच उपाय होता. तोच अखेर ग्रामस्थांनीं अवलंबिला. आणि वाड्याला

शाळा बांधली. इमारतीसाठीं रु. ७००० खर्च झाले. हें कार्य ग्रामविकास योजनेंत पार पडलें.

१९४५ मध्यें शिक्षकांसाठीं जें वसतिगृह बांधलें होतें त्याची १९५६ मध्यें दुरुस्ती करण्यांत आली होती. परंतु पुन्हा पांचसहा वर्षांनीं दुरुस्ती करण्याचा प्रसंग उद्‌भवला. जुन्या इमारतीची दुरुस्ती करण्यापेक्षां नवीन इमला उभा करणें श्रेयस्कर असें ग्रामस्थांना वाटल्यावरून त्यांनीं १९६३ मध्यें रु. ५००० खर्चून नवें वसतिगृह उभें केलें. यावेळींहि ग्रामस्थ श्रमदान करावयास विसरले नाहींत.

याशिवाय ग्रामस्थांनीं सहकारी सोसायटी, आरोग्य उपचार केंद्र, फेअर प्राइस शॉप, गुरांचा दवाखाना, ग्रामपंचायत इत्यादि सोयी उपलब्ध केल्या आहेत.

या कार्याचा वाढता भार वयस्कर मंडळींनीं, जुन्या कार्यकर्त्यांनींच अधिक उचलला. जी नवी पिढी शिकून तयार झाली तिचा या कार्याकडे साधारणतः ओढा कमीच. ही अनास्था नाहींशी करण्यासाठीं, सुशिक्षित तरुणांना कार्यप्रवृत्त करण्याच्या हेतूनें दादासाहेबांनीं १९६४ मध्यें ३६ ग्रामस्थांचें मुंबईंत एक शिबिर घेतलें. त्यांत गांवांतील आगामी सुधारणांच्या योजना दादासाहेबांनीं मांडल्या त्या अशा :-(१) शाळेची एक नवीन इमारत बांधणें. (२) पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करणें आणि (३) श्री शारदादेवीचें नवीन देवालय बांधणें.

असें तुरंबवचे वाढतें वैभव आहे. गांवची सुधारणा पाहून श्री जमदग्नी यांनीं एकदां जे उद्‌गार काढले ते तुरंबवकरांना निश्चितच भूषणावह आहेतः

'रत्नागिरी जिल्ह्यांतील तुरंबव हें एक आदर्श खेडें आहे.'

तुरंबवला मिळालेलें हें प्रशस्तिपत्र ग्रामस्थांच्या कष्टाचें व निष्ठेचें प्रतीक आहे. मुंबईकरांचा पैसा आणि ग्रामस्थांचें श्रमदान यांतून निर्माण झालेलें हें यश आहे. मुंबई समिति व ग्रामस्थ समिति यांच्या सहकार्याचें द्योतक आहे. या दोनहि समित्यांचें वैशिष्ट्य असें कीं, त्यांत हरिजनांना इतर ग्रामस्थांप्रमाणेंच मानाचें स्थान आहे. या संबंधीं तुरंबवचा एक कार्यकर्ता

म्हणतो, हरिजनांना ही जी समान वागणूक मिळते तिचें श्रेय दादासाहेबांनाच द्यावें लागेल.

हा कार्यकर्ता पुढें म्हणतो, दादासाहेब ही आमच्या मंडळाची प्रेरक शक्ति. मंडळाची कचेरी दादासाहेबांच्या घरीं. बैठकीहि तेथेंच. चहापाण्याचा खर्चहि दादासाहेबांचा. १९४० पासून १९६५ पर्यंत.

दादासाहेबांनीं पुढाकार घेऊन कै. माधवराव बाबाजीराव पंडित व श्री मारुतीराव भिकाजीराव पंडित यांचा सत्कार करून त्यांचीं मोठीं तैलचित्रें श्री शारदा मंदिरच्या हॉलमध्यें लावलीं. या दोन निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या सोबतीला आणखी एका कार्यकर्त्याचें तैलचित्र आहे. तें आहे श्री तुकाराम धोंडबाराव मोरे यांचें. सेवा करणाऱ्या व्यक्तीबद्दल अंतर्यामीं कृतज्ञता बाळगणाऱ्या तुरंबवकरांच्या उदार भावनेचें तें प्रसादचिन्ह आहे.

---

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८०४९ वि: चरित्र
क्रमांक २४४५ नों. दि. 23/9/65

*********

# १०

## एक व्यथा

दादासाहेब हरिनिवासमध्यें राहात असतांना ते आपल्या मित्रमंडळीसह —सर्वश्री जगन्नाथ पालव, रामचंद्र अंगणे, मंगेश मटकर, श्री आरोसकर, गणपतराव पंडित आणि गोविंदराव चव्हाण यांच्या सहकार्यानें—नाना चौकांत सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करीत असत. या मित्रांचें दादासाहेबांना आपल्या सार्वजनिक कार्यांतहि बहुमोल सहाय्य झालें. दादासाहेबांनीं तुरंबवच्या शाळेसाठीं " म्हातारपणचे डोहाळे " हें नाटक बसवून निधि गोळा करण्याचा प्रयत्न केला तेव्हांहि त्यांनीं पुढाकार घेतला होता. या नाटकाचे कॉम्प्लिमेंटरी पास देऊन कांहीं वजनदार लोकांना निमंत्रणें देण्यांत आलीं होतीं. श्री. गोविंदराव चव्हाण ( जानेवारी १९६५ मध्यें त्यांना जे. पी. पद देण्यांत आलें. ) एक कॉम्प्लिमेंटरी पास घेऊन श्री. राजाराम नागेशराव ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांच्या दुकानांत गेले आणि त्यांनीं त्यांना एक कॉम्प्लिमेंटरी पास देऊं केला. तेव्हां श्री शिंदे म्हणाले, " मी कॉम्प्लिमेंटरी पास कधीं स्वीकारीत नाहीं. मला दहा रुपयांचें एक तिकीट द्या. " असें म्हणून त्यांनीं दहाची नोट गोविंदरावांच्या पुढें सारली.

या घटनेचा इष्ट तोच परिणाम झाला. श्री. गोविंदराव आणि दादासाहेब प्रभावित झाले. श्री. शिंदे यांच्यासंबंधीं दादासाहेबांनीं जें ऐकलें होतें त्याला ह्या छोट्याशा प्रसंगानें पुष्टि मिळाली.

ह्या शतकाच्या पूर्वार्धात बहुजन समाजाची सेवा करणाऱ्या मुंबईतील कार्यकर्त्यांमध्यें श्री. शिंदे यांना मानाचें स्थान द्यावें लागेल. पोलीस खात्यांत कारकुनी करीत असतांनाच त्यांनीं १९२८ सालीं गिरगांवमध्यें चष्म्याचें दुकान काढलें. नंतर त्याच्या तीन शाखा निघाल्या. थोड्याच अवधींत " आर्. एन्. शिंदे-चष्म्याचे व्यापारी " म्हणून महाराष्ट्राला परिचित झाले.

त्यांनीं धंद्यांत अमाप पैसा मिळविला आणि मुक्त हस्तानें अनेक शैक्षणिक संस्थांना देऊन टाकला. त्यांचा मुंबईतील बहुजन समाजाच्या प्रमुख संस्थांशीं घनिष्ठ संबंध होता. ' बॉम्बे एज्युकेशन लीग ' या शैक्षणिक संस्थेचा पाया घालण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला होता. ते कॉंग्रेसचेहि कार्यकर्ते होते. सरकारी नोकरींत असतांनाच त्यांचें गिरगांवांतील चष्म्याचें दुकान १९४२ मधील भूमिगत कार्यकर्त्यांचें केंद्रस्थान बनलें होतें. मुंबईत त्यावेळीं ब्रिटिश सरकारविरुद्ध जहाल चळवळ जिवंत ठेवणारीं जीं बुलेटिन्स निघायचीं तीं बरींचशीं शिंदे यांच्या दुकानांतून. कॉंग्रेस कार्यकर्त्यांना शिंद्यांच्या निर्भय देशप्रेमाचा आणि सढळ हाताचा प्रत्यय आला तो बेचाळीसच्या लढ्यांत.

कॉम्प्लिमेंटरी पास न स्वीकारणाऱ्या शिंद्यांना भेटून त्यांचे आभार मानायला दादासाहेब कसे विसरतील? ते शिंद्यांना भेटायला गेले आणि हृदय हरवून बसले. शिंद्यांनीं त्यांना तत्काळ आपलेंसें केलें. त्यांच्या मनमोकळ्या बोलण्याची व दिलखुलास हंसण्याची दादासाहेबांवर अभावितपणें मोहिनी पडली. बोलतां बोलतां शिंदे त्यांना म्हणाले, तुम्ही तुरंबवच्या संस्थेंत कार्य करतां हें चांगलेंच आहे. पण आतां थोडेंसें तुरंबवबाहेर या. चिपळूण तालुका मराठा शिक्षण परिषदेंत येतां का?

दादासाहेबांनीं तत्परतेनें संमति दर्शविली. श्री. शिंदे चिपळूण तालुका मराठा परिषदेचे अध्यक्ष. त्यांनीं दादासाहेबांना संस्थेंत घेतलें आणि सरळ उपाध्यक्षाच्या खुर्चीवर नेऊन बसविलें. एका नवख्या तरुण कार्यकर्त्यानें थेट उपाध्यक्षाची जागा पटकावल्याचें पाहून चिपळूणच्या कांहीं जुन्या कार्यकर्त्यांना वैषम्य वाटले, कांहींना राग आला आणि कांहींनीं त्रागा केला. पण त्या सर्वांची समजूत घालतांना अध्यक्षांनीं म्हटलें, माझी निवड चुकलेली नाहीं हें तुम्हांला थोड्याच दिवसांत कळून येईल.

चिपळूण तालुका मराठा शिक्षण परिषदेचें चिपळूण शहरीं एक विद्यार्थी वसतिगृह होतें. त्यांत गरीबांच्या मुलांची खाण्याराहण्याची व्यवस्था करण्यांत येत असे. दुय्यम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या वसतिगृहाचा अतिशय फायदा होई. वसतिगृह सुरू झालें होतें १९२०-२१ सालीं. पण त्याची इमारत होती त्यापेक्षांहि आधींची. लहान आणि गैरसोयीची. आणि विद्यार्थ्यांची संख्या तर प्रत्येक वर्षी वाढत होती. म्हणून वसतिगृहाची

नवीन इमारत बांधण्याचें ठरलें आणि अध्यक्ष कार्याला लागले. यावेळीं दादासाहेबांनीं अध्यक्षांचे हात मजबूत केले. निधि उभारण्याच्या कामांत त्यांनीं बहुमोल सहाय्य दिलें एवढेंच नव्हे तर आपल्या आईच्या स्मरणार्थ एक खोली बांधण्याचा खर्चहि दिला. वसतिगृहाची जी इमारत पूर्ण झाली तिची किंमत आज सहज रु. ५०,००० च्या घरांत जाईल.

ह्या इमारतीचें काम चालू असतांना दादासाहेबांनीं जी कामगिरी बजावली तीवरून त्यांची उपाध्यक्षपदीं झालेली निवड चुकीची नव्हती हें इतर कार्यकर्त्यांनीं उदार मनानें मान्य केलें.

वसतिगृहाची इमारत झाली. तींत मुलांची गर्दीहि झाली. पण १९४६–४७ मध्यें वसतिगृहच बंद पडलें. कोंकणी मराठा विद्यार्थ्यांना सरकारकडून नादारीच्या स्वरूपांत ज्या शिष्यवृत्त्या मिळत होत्या त्या एका सरकारी फतव्यानें एकदम बंद झाल्या. विद्यार्थ्यांना फी भरून शिकण्याची ऐपत नव्हती. त्यांनीं भराभर पुस्तकें बांधलीं आणि शाळेचा निरोप घेतला तो कायमचा.

या संदर्भांत चिपळूणचा एक कार्यकर्ता म्हणतो, " मुंबई राज्यांतील एक मुख्यमंत्री दिवंगत झाला तरी आजहि किर्तिरूपानें जिवंत आहे. माणूस आमचाच. आमच्याच पक्षांतला. आम्हीच त्याला मुख्यमंत्री केलें. पण हें बाळ शिक्षण खात्यांत खेळायला गेलें आणि त्यानें शिक्षणाचा खेळ-खंडोबा केला. चार वर्षांत इंग्रजीचा अभ्यासक्रम पूर्ण करविण्याचा त्यानें धाडसी प्रयत्न केला. पण प्रयोग भोंवला विद्यार्थ्यांना. महाराष्ट्रांतील एक सबंध पिढी मोडक्या इंग्रजीचा आधार घेऊन चालू लागली आणि व्यव-हाराच्या शर्यतींत मागें पडली. कोंकणी मराठ्यांच्या शिष्यवृत्त्या बंद झाल्या आणि शेंकडों विद्यार्थी शिक्षणाला कायमचे मुकले. आणि हें घडलें आम्ही मिळविलेल्या स्वराज्यांत ! "

१९४६–४७ मध्यें वसतिगृह बंद झालें ते आजपावेतों उघडलेलें नाहीं. या घटनेनें अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचीं अंतःकरणें व्यथित झालीं.

चिपळूणमध्यें एक नवें कॉलेज सुरू होत आहे. त्यांत शिकणाऱ्या विद्या-र्थ्यांची राहाण्याची सोय करण्याच्या हेतूनें बंद झालेल्या वसतिगृहाचीं दारें उघडलीं तरच ही व्यथा दूर होईल. एरव्हीं नाहीं.

---



क्षत्रिय मराठा ज्ञाति समाज, मुंबई



क्षत्रिय मराठा ज्ञाति समाजाचा श्री माधव महाराज शिंदे हॉल, मुंबई

********

# ११

# एक मनीषा

श्री. राजाराम नागेशराव शिंदे यांनीं दादासाहेबांना केवळ चिपळूण तालुका मराठा शिक्षण परिषदेंत ओढलें असें नव्हे, त्यांनीं मुंबईच्या क्षत्रिय मराठा ज्ञातिसमाजामध्येंहि त्यांचा प्रवेश घडवून आणला. ही संस्था १९०० मध्यें स्थापन झाली त्यावेळीं सभासदांची वर्गवारी पुढीलप्रमाणें होती. पहिला वर्ग चार आणे, दुसरा वर्ग दोन आणे आणि तिसरा वर्ग एक आणा. यावरून त्यावेळीं चार पैशांना सध्यांच्या किती रुपयांचें मोल होतें याची चांगली कल्पना येते. कै. श्री. छत्रपति शाहूमहाराजांपासून गिरणींत काम करणाऱ्या मजूरापर्यंत सर्वांना या संस्थेंत स्थान होतें. महाराष्ट्रांत निर्माण झालेल्या आणि होत असलेल्या अनेक लहानमोठ्या मराठा संस्थांचें मूळ या संघटनेंत आहे असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्ञातिसमाजानें गेल्या पासष्ठ वर्षांत जें बहुविध सामाजिक कार्य केलें त्यांत शिक्षणप्रसाराला अग्रस्थान द्यावें लागेल. शालेय व विश्वविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या शेंकडों विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देऊन प्रकाशांत आणण्याचें थोर कार्य या संस्थेनें सातत्यानें केलें त्याप्रमाणेंच बहुजन समाजांत कार्यकर्त्यांची एक अखंड परंपराहि निर्माण केली.

ज्ञातिसमाजांत पदार्पण केल्यानंतर दादासाहेबांनीं केलेली कामगिरी अल्पावधींतच सर्वांच्या नजरेंत भरली. संस्थेची सभासदवर्गणी प्रथम एक आणा होती ती कालांतरानें एक रुपयापर्यंत वाढविण्यांत आली आणि एक हजार रुपये देणारांनाच प्रमुख पुरस्कर्त्यांचा मान देण्यांत आला. संस्थेची सभासदसंख्या शेंकड्यांनीं मोजतां येण्यासारखी. परंतु नियमितपणें वर्गणी देणाऱ्या लोकांची संख्या अल्प. अनेक सभासदांची वर्गणी कित्येक

# १२

# कर्जें देऊन कर्जमुक्ति

महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांचे दोन ढोबळ वर्ग करतां येतील. सधन शेतकरी आणि निर्धन शेतकरी. या दोनहि वर्गांचें सर्वसाधारणपणें एक वैशिष्ट्य आहे. ते कर्जबाजारी असतात. बहुतेक सधन शेतकऱ्यांवर कर्ज काढण्याचा प्रसंग येतो तो त्यांच्या बिनहिशेबी वागण्यानें. जमीनदारीच्या तोऱ्यांत, खानदानीच्या दिमाखांत केलेल्या अफाट खर्चामुळें. गरीब शेतकरी कर्जासाठीं बाहेर पडतो तो लुबाडला जातो म्हणून किंवा त्याची मिळकत कुटुंबाच्या मानानें पुरेशी नसते म्हणून. कारणें कांहींहि असलीं तरी दोनहि प्रकारचे शेतकरी केव्हांना केव्हां सावकाराचा उंबरठा ओलांडतांना दिसतातच.

अडलेला शेतकरी ब्राह्मण, मारवाडी, पठाण किंवा खोत सावकाराचा ऋणको असावयाचा. हें दृश्य कांहीं वर्षांमागें महाराष्ट्राच्या खेडोपाड्यांत प्रत्यहीं दृष्टीस पडत असे. शेतकऱ्यानें बैल घेण्यासाठीं, विहीर खणण्यासाठीं, बीबियाणें खरीदण्यासाठीं किंवा मुलांमुलींचीं लग्नें करण्यासाठीं शेंदोनशें रुपये कर्ज काढावें आणि तें फेडण्यासाठीं घर किंवा शेत विकावें किंवा घेतलेलें कर्ज एकदोन पिढ्या फिटूं नये हा अनुभव जेवढा व्यापक तेवढाच नित्याचा आहे. लग्नासाठीं काढलेलें कर्ज नातवालाहि फेडतां न आल्याचीं उदाहरणें कांहीं थोडथोडकीं नाहींत.

तुरंबवचा शेतकरी खास कोंकणांतला. तो सावकारांपासून दूर राहील हें कसें शक्य आहे? १९३० ते १९४० च्या दरम्यान तुरंबवचे शेंकडा पन्नास शेतकरी कर्जबाजारी होते. कर्ज विशेष नसायचें. फक्त शंभर दीडशें रुपये. परंतु संसाराच्या रगाड्याखालीं तें फेडायला ऋणकोचा उभा जन्म जायचा.

ह्या तापदायक परिस्थितीवर मात करण्यासाठीं तुरंबवचे कांहीं सुशिक्षित तरुण पुढें आले. त्यांचें नेतृत्व केलें दादासाहेबांनीं. त्यांनीं "श्री शारदा परस्पर सहाय्यकारी मंडळ" या नांवाची एक संस्था स्थापन केली. (१९४५)

या वेळीं एका मुंबईकरानें असा प्रश्न केला कीं, "तुरंबवचे लोक श्री शारदा देवीचें नामस्मरण करून कार्याला प्रारंभ करतात तो कां?"

ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यांत आलें तें असें : तुरंबवचें रक्षण करणाऱ्या देवता चार. चणकाई, मानाई, वरदा आणि शारदा. शारदा ही सर्वश्रेष्ठ देवता. तिचा भक्तगण मोठा. कृपाहि मोठी. गांवांत सर्वांत मोठें देऊळ आहे तें श्री शारदा देवीचेंच.

पूर्वी तुरंबवच्या आसपास मोरांची बरीच मोठी वसती होती. आतांहि आहेच. मोर हें श्री शारदेचें वाहन. तिचा तो सेवक. तिच्या सेवेसाठींच जणुं ते गांवांत प्रवेश करतांना आढळतात. या मोरांच्या अस्तित्वामुळें तुरंबवला श्री शारदा देवीचें मंदिर बांधण्यांत आलें कीं तिच्या सहवासासाठीं मोरांची गांवाच्या परिसरांत वसाहत आहे हें मात्र कोणालाच सांगतां येत नाहीं.

पण एवढें मात्र निश्चित कीं, श्री शारदा देवीच्या नांवानें काढलेलें परस्पर सहाय्यकारी मंडळ तिच्या आशीर्वादानें अत्यंत फलदायी ठरलें. कर्जानें गांजलेल्या तुरंबवच्या लोकांना आर्थिक सहाय्य करावयाचें हा मंडळाचा उद्देश. मंडळानें शेअर रूपानें भांडवल उभें केलें. पांच रुपयांचा एक शेअर. कांहींनीं पांच शेअर घेतले, कांहींनीं दहा घेतले. असे भाग धारण करणारे सुमारें दोनशें सभासद झाले. या भांडवलांतून मंडळानें गरजू तुरंबवकरांना कर्जें पुरविलीं.

मंडळाचे चिटणीस श्री बाबाजी गोविंदराव देसाई या संबंधीं म्हणतात, "आमच्या मंडळांतून ग्रामस्थांनीं पैसे घेतांच आपला जुना सावकार भागवून टाकावा असा आमचा कटाक्ष होता. आमचा व्याजाचा दर अगदीं माफक. दरसाल एका रुपयास एक पैसा व्याज! ह्या आमच्या योजनेचा बहुतक सर्व सभासदांनीं लाभ उठविला. मंडळानें दहाबारा वर्षें कर्जें पुरवून अनेकांना कर्जमुक्त केलें. पुढें कुळकायदा जारी झाला. कर्जविषयक कायदाहि अंमलांत आला. आणि त्यामुळें आमच्या मंडळाचें कार्यहि मर्यादित झालें. म्हणून मंडळाचे अध्यक्ष श्री. दादासाहेब मोरे यांनीं मंडळ विसर्जित करण्याचा निर्णय घेतला."

नडलेल्या व नाडले गेलेल्या तुरंबवकरांना दादासाहेबांनीं मदतीचा असा हात दिला व त्यांना सांवरून धरलें. मंडळाच्या ह्या कामगिरीमुळें तुरंबवच्या अनेक घरांत कर्जमुक्तीचें स्वतंत्र वारें खेळूं लागलें. त्या वाऱ्यांत स्वयंपाक-घरांतील चुली निर्धास्तपणें धगधगूं लागल्या.

# १३

## कार्यकर्ते निर्मिणारा कार्यकर्ता

बहुसंख्य सरकारी अधिकारी नोकऱ्या करतात, आणि कांहीं करतात सेवा. सेवाव्रत धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्याच अल्प. अशा अल्पसंख्य सेवाभावी अधिकाऱ्यांत चिपळूण तालुक्याचे एके काळचे मामलेदार श्री. द. शं. जमदग्नी यांचा अवश्य समावेश करावा लागेल. त्यांच्या ठिकाणीं असलेल्या आस्थेचा प्रत्यय तुरंबवकरांना अनेकदां आला होता. आणि म्हणून तुरंबव–ओंबळी रस्त्याचा मुहूर्त करण्यासाठीं (२८–११–५४) त्यांनीं श्री. जमदग्नी यांना पाचरण केलें होतें.

श्री. जमदग्नी आणि दादासाहेब यांचा परिचय झाला तो याच प्रसंगीं. तुरंबव ग्रामस्थ समितीचे अध्यक्ष श्री. मारुतीराव भिकाजी पंडित यांनीं जमदग्नींना दादासाहेबांची ओळख करून दिली. रस्त्याचा मुहूर्त-समारंभ झाल्यानंतर या दोघांची जी बैठक झाली त्यावेळीं श्री. जमदग्नी म्हणाले, देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठीं सरकार बद्धपरिकर झालें आहे. त्याचसाठीं विकास योजना आंखण्यांत आल्या आहेत. परंतु लोकांना वाटतें, विकासकार्याशीं आपला काय संबंध ? हें काम सरकारचें. पण हें पूर्ण सत्य नव्हे. विकासकार्य घडवून आणावयाचें तें जनता आणि सरकार या दोघांनीं एकत्र येऊन. चिपळूण तालुक्यांत अनेक ग्रामस्थ संस्था आहेत. त्यांचें एकीकरण करून एक मध्यवर्ति संस्था अस्तित्वांत आली तर तिला सरकारशीं संबंध ठेवतां येईल आणि मला स्थानिक विकास योजनेंतून सहाय्य करतां येईल.

श्री. जमदग्नी यांच्याकडून मध्यवर्ति संस्थेची कल्पना मिळतांच तिला मूर्त स्वरूप देण्यासाठीं दादासाहेबांनीं २९–१२–५५ रोजीं श्री. माधव

महाराज शिंदे हॉलमध्यें एक सभा घेतली. या सभेला श्री. जमदग्नी पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनीं चिपळूण तालुक्यांत विकास योजनेखालीं कशा सुधारणा घडवून आणतां येतील याचें सुंदर विवेचन केलें. आणि ‘ चिपळूण तालुका ग्रामविकास मंडळा ’ चा नारळ फोडला.

मंडळाचें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें आणि त्याच्या अध्यक्षस्थानीं दादासाहेबांची नियुक्ति झाली. मंडळाचे सहाय्यक व संघटक या नात्यानें सर्वश्री सखाराम यशवंतराव कदम, अनंतराव रामजीराव शिर्के, अमृत शिवराम आंब्रे, राजाराम रामाजीराव शिंदे, अर्जुनराव कोंडिबा राजे शिर्के, हुसेनभाई दळवाई आणि विश्वास शांताराम चव्हाण यांनीं बहुमोल कार्य केलें.

मंडळानें प्रथम प्रचाराला आणि संघटनेला हात घातला. चिपळूण तालुक्यांत १३१ गांवें व चार मजरें आहेत. त्या सर्वांशीं संपर्क ठेवून सभासदनोंदणी करण्यांत आली. पहिल्या वर्षी मंडळाच्या पटावर ५५२ सभासद होते आणि मंडळांत ६१ गांवांचा समावेश झाला. दुसऱ्या वर्षी सभासद संख्या ६६८ झाली आणि ६९ गांवें मंडळाला संलग्न झालीं. पुढील वर्षी ८६० सभासद झाले आणि मंडळांत ७४ गांवांचा अंतर्भाव झाला. सध्यां सभासदांची संख्या ११२५ वर गेली असून एकूण ८७ गांवांचा मंडळांत अंतर्भाव होतो.

दिनांक ९-१-५६ रोजीं मंडळानें जें माहिती पत्रक काढलें तें शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त ठरलें. तालुक्यांतील जमिनीच्या हक्क नोंदणीसाठीं ( रेकॉर्ड ऑफ राइट ) सरकारनें जमीन मोजणी केली आणि तो सर्व खर्च शेतकऱ्यांवर लादला. हा खर्च अर्थातच शेतकऱ्यांना न झेंपणारा होता. तो माफ करावा किंवा खर्चाच्या वसुलीबाबत सहा महिने तहकुबी मिळावी म्हणून कलेक्टरकडे अर्ज करावा अशा आशयाची पांच हजार पत्रकें मंडळानें काढून तीं १३४ गांवांना पाठविलीं. ह्या पत्रकांत अर्जाचा नमुनाहि दिला होता. या पत्रकानुसार ग्रामस्थांच्या सह्यांचे अर्ज कलेक्टर कचेरींत दाखल झाले आणि मंडळानें वरील खर्च माफ करून घेण्यासाठीं महसूल मंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून खटपट केली. त्या खटपटीला यश आलें. प्रथम खर्च वसुलीची तहकुबी झाली आणि नंतर तो पूर्णपणें माफ झाला.

मंडळानें दुसरें एक पांच हजार प्रतींचें पत्रक तयार केलें तें तालुक्यांतील गावांचें गट पाडण्याच्या हेतूनें. गांवांचे गट करण्यांत आले तर विकासकार्य सुलभ होईल, हें ओळखून मंडळानें कांहीं गट सुचविले. बराच पत्रव्यवहार आणि सरकारी अधिकाऱ्यांशी वाटाघाटी होऊन अखेर तालुक्याचे तीन विकास गट करण्यांत आले ते असेः—

दसपटी विभाग : ४७ गांवें
रामपूर विभाग : ४५ गांवें
सावर्डें विभाग : ४२ गांवें


प्रचार, संघटना व आगामी कार्ययोजना हे दोन उद्देश दृष्टिसमोर ठेवून मंडळानें ११–९–१९६० रोजीं मराठा मंदिरच्या श्री. जिवाजीराव महाराज शिंदे हॉलमध्यें तालुका ग्रामविकास परिषद भरविली. या परिषदेचें उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे शेतकी मंत्री नामदार पी. के. सावंत यांनीं केलें. आणि अध्यक्षपद विभूषित केलें खासदार श्री. प्रेमजीभाई आसर यांनीं. या परिषदेला ८४ ग्रामसंस्थांचे सुमारें एक हजार प्रतिनिधी उपस्थित होते.

तालुक्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं कोणत्या योजना आंखल्या पाहिजेत यासंबंधीं परिषदेंत चर्चा झाली. आणि विकासाच्या दृष्टीनें सरकारकडे छत्तीस ठराव पाठविण्यांत आले. रेल्वे, बंदरें, रस्ते, औद्योगिक वसाहत, पोस्ट ऑफिसें, हॉस्पिटलें, जनावरांचे दवाखाने, शाळा, पोल्ट्री फार्म, ग्रामपंचायती, खनिजसंपत्ति संशोधन इत्यादि बाबतींत तालुक्याची कशी सुधारणा करतां येईल याचें वरील ठरावांत दिग्दर्शन करण्यांत आलें. सरकारनें ह्या ठरावांची दखल घेऊन त्यांतील कांहीं सुधारणांना प्रारंभ केला, यावरून परिषद यशस्वी झाली असें म्हणावयास हरकत नाहीं.

या परिषदेच्या निमित्तानें जी तालुका परिचय पुस्तिका प्रसिद्ध करण्यांत आली ती अत्यंत उपयुक्त आहे. या पुस्तिकेंत तालुक्याची साद्यंत माहिती देण्यांत आली आहे. तालुक्यांत एकूण घरें २८,३०७, कुटुंबें ३०,३४१, आणि लोकसंख्या १,५३,१०२. त्यांपैकी ६१,२०८ पुरुष व ८३,८९४ स्त्रिया. म्हणजे पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या २२,६८६ नें अधिक. एकूण साक्षरतेचें प्रमाण शें. १३ टक्के. परंतु स्त्रीशिक्षण फक्त अर्धा टक्का ! ( १९५१ ची खानेसुमारी ).




मामलेदार श्री. द. शं. जमदग्नी चिपळूण तालुक्यांतील कार्यकर्त्यांपुढें विकासयोजनेचें स्वरूप स्पष्ट करीत असतां



चिपळूण तालुका ग्रामविकास मंडळाच्या वार्षिक सभेंत श्री. दादासाहेब तालुक्याच्या विकासयोजनेचा आराखडा सादर करीत आहेत.



वाशिष्टी को-ऑपरेटिव्ह इंजीनिअरिंग इंडस्ट्रीज ही संस्था स्थापन करण्यासाठीं शिर्केबाग, बोरिवली येथें जो मेळावा झाला त्या प्रसंगीं चहापान. श्री. आप्पासाहेब देवरुखकर, श्री. पी. के. सावंत, श्री. तु. धों. मोरे व श्री. अ. रा. शिर्के.




दि. १४-३-६४ रोजीं डेरवण ग्रामस्थ चव्हाण मंडळास गुढीपाडव्यानिमित्त शाळेस रु. २५१/- देणगी जाहीर करीत असतां.
श्री. दादासाहेब व श्री. पी. के. सावंत मुख्य पाहुणे.



चिपळूण तालुका विकास परिषद ( ११–९–६० )—अध्यक्ष खासदार प्रेमजीभाई आसर आणि उद्‌घाटक नामदार श्री. पी. के. सावंत.



नामदार पी. के. सावंत यांच्या अध्यक्षतेखालीं चिपळूण तालुक्यांतील कार्यकर्त्यांचा मेळावा भरला असतां



दसपटी विभाग प्राथमिक आरोग्य केंद्र, मजरें दादरच्या मदतीसाठीं नाट्यप्रयोग झाला त्या प्रसंगीं



डॉ. अरविंद घाग, एम्. एस. सी. पी. एच्. डी. यांना रबर संशोधनार्थ मुंबई विद्यापीठांकडून डॉक्टरेट मिळाल्याबद्दल श्री. गावडे यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचा सत्कार

याशिवाय खुशकी व सागरी वाहतूक, खनिज संपत्ति, पिकें, जनावरें, प्रेक्षणीय स्थळें, व्यापारउद्योग इत्यादि सर्व बाबतींत पुस्तिकेंत दिलेली माहिती जेवढी मनोरंजक तेवढीच कार्याच्या दृष्टीनें मार्गदर्शक ठरेल.

दिनांक २३-४-६१ रोजीं परळच्या कामगार मैदानावर श्री. शिवराम राजे भोसले यांच्या अध्यक्षतेखालीं कोंकणवासीयांचा मेळावा भरविण्यांत आला. मेळाव्याचें उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनीं केलें. कोंकणवासीयांच्या कोणत्या अडचणी आहेत, कोंकण भागांत कोणत्या सुधारणा घडवून आणतां येतील यासंबंधीं विचारविनिमय करण्यांत आला. सदरहू मेळाव्यांत मंडळानें तालुक्यांतील ग्रामीण संस्थांसह सक्रीय भाग घेतला व तो यशस्वी केला.

जनतेंत जागृति करण्याच्या हेतूनें मंडळानें एक दौरा आयोजित केला. (१३-१-६१). त्यासाठीं शेतकी मंत्री नामदार पी. के. सावंत यांचें मंडळाला मार्गदर्शन लाभलें. दौरा दहा दिवसांचा होता. आणि त्या अवधींत ३० सभा घेण्यात आल्या. या सभांमुळें जनतेंत जागृति झाली आणि त्यांनीं श्रमदानाचीं कामें उत्साहानें हातीं घेतली.

मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनीं चिपळूण तालुक्यांत ता. २३-१-६२ रोजीं जो प्रचारदौरा काढला त्यांत मंडळाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनीं भाग घेऊन तो यशस्वी करण्यास हातभार लावला.

दादासाहेबांनीं तालुक्यांत जे प्रचारदौरे केले त्यांत १९५७ मध्यें केलेल्या दौऱ्याचा उल्लेख करावा लागेल. त्यांनीं आणि श्री. अर्जुनराव कोंडिबा राजे शिर्के यांनीं सावर्डें पंचक्रोशींतील आणि तुरंबव गटांतील गांवांची विकासकार्याच्या दृष्टीनें पाहणी केली. त्याचप्रमाणें श्री. राजे शिर्के यांच्या प्रेरणेनें सावर्डें या केंद्रगांवीं सुमारें पंधरा गांवांतील लोकांची जाहीर सभा घेण्यांत आली. सभेला ५०० लोक उपस्थित होते. सभेचे अध्यक्ष या नात्यानें दादासाहेबांनीं भावी कार्याबद्दल मार्गदर्शनपर भाषण केलें. अनारी आणि दहीवली येथेंहि त्यांनीं प्रचार सभा घेतल्या.

पत्रकें, परिषदा, सभा इत्यादि द्वारां जागृत झालेलीं ८७ गांवें आपापल्या परिसरांत विकासकार्याला लागलीं आणि त्यांनीं गेल्या दहा वर्षांत चिपळूण

तालुक्याचें स्वरुप पालटून टाकलें. चिपळूणकरांनीं केव्हां स्वखर्चानें, केव्हां सरकारी मदत घेऊन जीं कामें केली तीं थोडक्यांत अशीं—

१. **शाळेच्या इमारतीः**—नांदिवसें ग्रामस्थांनीं स्वखर्चानें व श्रमदान करून दोन खोल्या शाळेंत वाढविल्या. कुडपच्या कार्यकर्त्यांनीं चार खोल्यांचें चिरेबंदी शाळागृह बांधलें. ह्या इमारतीचें उद्‌घाटन श्रीमंत शिवराम राजे भोसले यांच्या हस्तें झालें. समारंभाचे अध्यक्षस्थान दादासाहेबांनीं भूषविलें. या समारंभास सुमारें ५००० चे वर जनसमुदाय उपस्थित होता. स्वागताध्यक्ष श्री. अर्जुनराव राजे शिर्के यांनी समारंभाची सर्व जबाबदारी स्वीकारली. नंतर रामपूरच्या कार्यकर्त्यांनीं एक हजार रुपये खर्चून शाळेच्या इमारतींत वाढ केली. भोम येथेंहि नवीन शाळा बांधण्यांत आली. कळकवणें येथें रु. २५०० खर्चून शाळेचा जीर्णोद्धार करण्यांत आला. पेढांबे येथेंहि एक नवी शाळा दिसूं लागली. सावर्डें येथील शाळेचें काम सध्यां चालू आहे.

२ **पोस्ट कचेऱ्या**—मंडळाच्या प्रयत्नानें उमळें, गुढें, मिरवणें, सावर्डें, बोरगांव, रामपूर, कळकवणें इत्यादि गांवीं पोस्ट-कचेऱ्या उघडण्यांत आल्या.

३. **रस्तेः**—ग्रामस्थांच्या श्रमदानानें व सरकारी मदतीनें पुढील रस्ते तयार झाले. चिपळूण ते टेरव. घोणसरे ते वाघीवरे. पेढांबे ते पिंपळी. चिवेली-करांचा बंदरापासून साडेपांच मैलांचा रस्ता. त्याशिवाय सावर्डें-दुर्गवाडी रामपूर-पांभरे, पिंपळी-नांदिवसें, पिंपळी-तिवरें,-कळकवणें, चिपळूण-कळकवणें, सावर्डे-खरवते-दहीवली, चिंचखरी-अनारी-अडरें-बेहेलें इत्यादि ॲप्रोच रोड. तालुका ग्रामविकास परिषदेच्या ठरावानुसार अनेक एस्. टी. मार्गहि सुरूं झाले.

४. **फेअर प्राइस दुकानेंः**—ओवळी, रामपूर, कळकवणें, इत्यादि गांवी स्वस्त दरानें माल उपलब्ध करून देणारीं दुकानें उघडण्यांत आलीं. डोंगराळ विभागांत पावसाळ्यामध्यें वहातुकीची अडचण निर्माण होते. त्यामुळें गांवांना अन्नधान्याचा पुरवठा होत नाहीं. ही अडचण दूर करण्यासाठीं अशा दुकानांची आवश्यकता भासूं लागते.

५. **शेतकरी संघः**—शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्याच्या हेतूनें मजरें दादर या ठिकाणीं शेतकरी संघ निर्माण झाला.

६. **श्रमदान सप्ताहः**—रामपूरच्या ग्रामसेवक संघानें श्रमदान सप्ताह पाळून तीन जुन्या विहिरींचें बांधकाम केलें व रस्त्यांची साफसफाई केली.

७. **देवालयें**:—देखरकच्या ग्रामस्थांनीं श्रमदान करून शंकराचें देवालय बांधलें. खरवत्याच्या कार्यकर्त्यांनीं स्वखर्चानें व श्रमदानानें 'रघुवीराचें मंदिर' उभें केलें. टेरंबच्या लोकांनी निधी जमवून व श्रमदान करून 'राधाकृष्ण' मंदिर बांधलें.

८. **वाचनालयें**:—कळकवणें, पेढांबें, तिवरें इत्यादि गांवीं वाचनालयें उघडण्यांत आलीं.

९. **प्राथमिक आरोग्यकेंद्रं व गुरांचे दवाखानेः**—मंडळाच्या प्रयत्नामुळें अनेक गांवीं प्राथमिक आरोग्यकेंद्रे व गुरांचे दवाखाने उघडणें सुकर झालें.

१०. **बंदरें**:—करबवणें व दाभोळ या बंदरांच्या सुधारणा झाल्या.

११. **पूलः**—संबंधित लोकांच्या सहकार्यानें वाशिष्टी नदीवर पूल उभा राहिला.

१२. **ग्रामपंचायतीः**—मंडळाच्या प्रयत्नांमुळें ग्रामपंचायतींना चालना मिळाली. मोरवणें, वाळवटी, मुर्देतर्फ सावर्डा, कोसबी, फुरूस, कोडफसवणे, पोफळी इत्यादि ठिकाणीं ग्रामपंचायती आल्या.

१३. **अधिवेशनें**:—विकास कार्यासाठीं पेढांबे, तिवरें, कलमुंडी या ठिकाणीं अधिवेशनें भरविण्यांत आलीं.

१४. **धरणें**:—नांदिवसेंकरांनीं श्रमदान करून धरण बांधलें.

१५. **वसतिगृहें**:—रामपूरच्या लोकांनीं मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठीं चालू असलेल्या वसतिगृहाची श्रमदान करून दुरुस्ती केली.

१६. **सांस्कृतिक केंद्रः**—पेढांबे येथें सांस्कृतिक केंद्र सुरू झालें.

१७. **शिक्षक व शिष्यवृत्त्याः**—मंडळानें नांदिवसें, अनारी, तुरंबव, इत्यादि गांवांतील शाळांना शिक्षक पुरविले आणि अनेक होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या.

१८. **तालुका बचत योजनाः**—ही योजना पूर्ण करण्यास मंडळानें प्रोत्साहन व सहकार्य दिलें.

**१९. सेवानिवृत्तांची संघटनाः**—चिपळूण तालुक्यांत सुमारें बत्तीस हजार मुलकी व लष्करी सेवानिवृत्त लोक आहेत. त्यांना जे निवृत्तिवेतन मिळत असें तें वेळेवर मिळण्याच्या मार्गांत जेव्हां अडचणी निर्माण झाल्या तेव्हां त्या दूर करण्यासाठीं सेवानिवृत्तांची संघटना निर्माण करण्यांत आली.

**२०. नवीं पिकें:**—तालुक्यांत काजू, भुइमूग, व हरभरा यांचीं पिकें काढण्याच्या हेतूनें व रासायनिक खतांचा वापर करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठीं मंडळाच्या कार्यकर्त्यांनीं प्रचार केला.

**२१. निर्धीस सहाय्यः**—१९५८ मध्यें उत्तर कोकणांत अतिवृष्टि होऊन पूर आला आणि अनेकांचे नुकसान झालें. पूरग्रस्तांना मदत करण्यासाठीं जो निधि उभारण्यांत आला त्यास मंडळानें हातभार लावला. मंडळातर्फे रु. ९६५ इतकी रक्कम जमविण्यांत आली. त्यांपैकीं दादासाहेबांनीं रु. ४४८ उभे केले होते.

दि. २४ मे १९६१ रोजीं दक्षिण कोंकणांत वादळानें थैमान घातलें. त्यामुळें तेथील जनतेचें कैक वर्षांचें परिश्रम जमीनदोस्त झाले आणि अनेकांचे संसार उध्वस्त झाले. वादळानें ज्यांच्यावर आपत्ति कोसळली अशा लोकांना मदत करण्यासाठीं मुख्यमंत्र्यांचा कोकण सहाय्यक निधि उभा करण्यांत आला. या निधींत मंडळानें रु. १००० ची भर घालून आपद्ग्रस्तांना सहाय्य केलें.

**२२. सत्कारः**—चिपळूण तालुक्याचे माजी मामलेदार श्री. द. शं. जमदग्नी यांनीं तालुक्याची अत्यंत कळकळीनें सेवा केली होती. त्यांनीं केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठीं मंडळानें ता. २-६-५७ रोजीं श्री. दादासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईत जाहीर सत्कार केला.

महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळांत कोंकणचे नेते श्री. पी. के. सावंत कृषिमंत्री झाल्याबद्दल त्यांचा ता. २३-७-६० रोजीं श्री. दादासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सत्कार करण्यांत आला.

त्यानंतर दादासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं एक समारंभ झाला तो ५-४-६२ रोजीं. या प्रसंगीं आरोग्यमंत्री श्री. पी. के. सावंत, खासदार श्रीमती शारदाबाई मुखर्जी, आमदार श्री. हुसेन एम्. दलवाई, विधानसभेचे

सदस्य श्री. व्ही. एल. रिळकर गुरूजी यांचा मोठ्या थाटानें सत्कार करण्यांत आला,

दहिवलीचे रहिवासी श्री. श्रीराम नारायणराव घाग यांचे पुत्र श्री. अरविंद घाग, एम्. ए., पी. एच्. डी. यांनीं रबर संशोधनासंबंधीं लिहिलेल्या प्रबंधाला मुंबई विद्यापीठाकडून पी. एच. डी. पदवी देण्यांत आली. यासाठीं त्यांचा श्री. गं. गो. तथा बाबासाहेब गावडे यांच्या अध्यक्षतेखालीं प्रकट सत्कार करण्यांत आला.

तालुक्याचे दसपटी, रामपूर व सावर्डें असे जे तीन विभाग करण्यांत आले आहेत त्यांतील सर्व शिक्षणसंस्थांशीं दादासाहेबांचा घनिष्ट संबंध आहे. दसपटी विभागांतील शिरगांव हायस्कूलचे प्रमुख आधारस्तंभ श्री. केशवराव बाजीराव शिंदे यांचें १९५८ मध्यें देहावसान झालें. त्यानिमित्त जी दुखवट्याची सभा घेण्यांत आली होती तिला दादासाहेब उपस्थित होते. या सभेंत भाषण करतांना तालुक्याचे नेते श्री. रा. ना. ऊर्फ अण्णासाहेब शिंदे म्हणाले, मी आतां वृद्ध झालों आहे. तालुक्याचे सामाजिक कार्याचें नेतृत्व मी आतां दादासाहेबांच्या स्वाधीन करतों.

हें नेतृत्व आतां स्थूलमानानें दादासाहेबांकडे आलें आहे असा निर्वाळा देऊन श्री. अ. कों. राजे शिर्के म्हणतात, याचें प्रत्यंतर विधानसभा, विधान परिषद आणि लोकसभा यांच्या अलीकडे ज्या निवडणुका झाल्या त्यांत चांगल्या प्रकारें आलें. श्री. पी. के. सावंत विधानसभेच्या निवडणुकीसाठीं उभे राहिले असतांना श्री. दादासाहेब अनेक कार्यकर्त्यांसह मुंबईहून चिपळूणला गेले होते. त्यांच्या वजनानें नामदार बाळासाहेब सावंत यांच्या यशाचें पारडें जड झालें असें म्हटलें तर अतिशयोक्ति व्हायची नाहीं. त्याचप्रमाणें सर्वश्री, रा. ना. शिंदे, श्री. ग. ता. चव्हाण, खासदार जगन्नाथराव भोसले व श्रीमती शारदाबाई मुकर्जी यांना निवडणुकांत विजय प्राप्त करून देण्यांत दादासाहेबांचा मोठा वाटा आहे. आणि म्हणून चिपळूण तालुक्यांतील राजकीय पक्षांनीं दादासाहेबांना आपल्या पक्षाचें तिकिट देऊं केलें पण त्यांनीं तें नाकारलें.

चिपळून तालूक्याचा रंग पालटून गेला आणि तो अलीकडे झपाट्यानें

बदलत आहे. त्याचें श्रेय मंडळानें केलेलें दिग्दर्शन, सरकारी अधिकाऱ्यांचे सहकार्य आणि ग्रामस्थांचा उत्साह यांना द्यावें लागेल. आणि हा उत्साह निर्माण केला दादासाहेबांनीं. तालुक्यांत किती शाळा उघडल्या आणि किती रस्ते तयार झाले यांपेक्षां तालुक्यांत किती कार्यकर्ते निर्माण झाले हें अधिक महत्वाचें आहे. दादासाहेबांनीं माणसें टिपलीं, त्यांना कार्यप्रवृत्त केलें, त्यांचा विश्वास वाढविला. त्यांनीं स्थानिक नेतृत्व निर्माण केलें. हेच ग्रामस्थ नेते उद्यां ग्रामपंचायतींत, लोकलबोर्डांत, जिल्हापरिषदांत, विधानसभेंत आणि लोकसभेंत चमकणार आहेत. दादासाहेबांचें यश सामावलें आहे तें त्यांनीं निर्माण केलेल्या ह्या नेतृत्वांत !

*********

# १४

# मंदिरांतील ध्येयपूजा

हिंदुस्थान पाहण्यासाठीं येणारा पाश्चिमात्य प्रवासी प्रथम पाऊल ठेवील तें मुंबईच्या किनाऱ्यावर. मुंबई पाहण्याच्या उद्देशानें तो आपल्या हॉटेलमधून बाहेर पडेल, टॅक्सी बोलावील आणि तिच्यांत ऐटीनें बसेल. आणि मग टॅक्सीवाला पाहुण्याला गेट वे ऑफ इंडिया, फोर्टमधील टोलेजंग इमारती, म्युझियम, जहांगीर आर्ट गॅलरी, राजाबाई टॉवर, बोरी बंदर, मरीन लाइन्स, चौपाटी, हँगिंग गार्डन, राणीचा बाग इत्यादि स्थळांचा फेरफटका घडवून आणील. पाहुण्याची तब्येत खूष होईल. हॉटेलकडे परतण्यापूर्वी तो आपल्या हिंदींतून—बोटीवर उचललेल्या मोडक्यातोडक्या हिंदींतून विचारील, "और कुछ बंबईमें देखने जैसा है ?" टॅक्सीवाला मुंबईच्या खास हिंदींतून उत्तर देईल, "है जी साब. एक चीज है ! मैं आपको उधर ले जाता हूं." असें म्हणून तो आपली गाडी बॉम्बे सेंट्रलसमोर आणून उभी करील आणि म्हणेल, "वह देखो मराठा मंदिर ! वह एक देखने जैसी चीज है ! बहोत खूबसूरत है, साब !"

प्रवासी टॅक्सींतून उतरेल, मराठा मंदिरच्या आवारांत प्रवेश करील आणि मॅनेजरची परवानगी काढून चित्रपटगृहांत पदार्पण करील. गादीसारख्या मऊ गालीच्यावरून पावलें टाकीत, झुंबरें पाहात, नेत्रांना सुखावीत, प्रशंसेचा उद्‌गार काढीत तो खालचीं व वरचीं दालनें पाहील आणि त्यांतील दोन चित्रांपुढें थबकेल.

भारताचे संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं दि. १६ ऑक्टोबर, १९५८ रोजीं मराठा मंदिराचें उद्‌घाटन केलें त्यावेळीं ते याच दोन चित्रांपुढें थबकले होते. तीं पाहून त्यांच्या मनांत जे विचार उसळले होते

त्यांना त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत शब्दांकित केलें. ते म्हणाले, " मंदिराच्या चित्रपट गृहांत कांचेवर जीं दोन चित्रें आहेत त्यांपैकीं एका चित्रामध्यें श्री शिवाजी राजे श्री संत तुकाराम महाराजांना वंदन करीत असून पार्श्वभूमींत श्रीपांडुरंग उभे आहेत. दुसऱ्या चित्रांत राजमाता जिजाबाई विनम्र झालेल्या शिवाजीला आशीर्वाद देत आहेत. हीं चित्रें पाहून मला वाटतें कीं, महाराष्ट्राचे प्राण येथें वास्तव्यास आले आहेत. मंदिरास परमेश्वराचें अधिष्ठान तर आहेच; शिवाय मातेची महनीयता, संतांचे साधुत्व, शूरांचें शौर्य आणि विद्वानांची विद्वत्ता हीं सारीं या मंदिरांत नांदत आहेत."

जग पाहायला निघालेल्या रसिक प्रवाशाच्या नजरेंतून चित्रांचा हा आशय निसटेल हें कसें शक्य आहे ?

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांची जोपासना करणाऱ्या मंदिरांत सर्व महाराष्ट्रीयांना स्थान आहे एवढेंच नव्हे तर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत ज्याला ज्याला–मग तो गुजराथी असो, बंगाली असो वा मद्रासी असो–श्रीज्ञानेशतुकोबांच्या मुखांनीं गौरविलेल्या वाणीचा, श्री शिवप्रभूंच्या पराक्रमी स्पर्शानें धगधगणाऱ्या मराठी मातीचा अभिमान आहे त्याला येथें मानाचें आसन आहे.

अशा ह्या जातिपक्षप्रांत निरपेक्ष मंदिराचें स्वप्न पडलें श्री. गं. गो. उर्फ बाबासाहेब गावडे यांना. पंचवीस लाखांचें स्वप्न. पण वास्तु उभी केली तीस लाखांची. भव्य आणि सुंदर. बाबासाहेबांच्या व्यक्तित्वाला साजेशी.

बाबासाहेबांचें व्यक्तिमत्व आहे अनेक असामान्य गुणांनीं नटलेलें. पिंड जिज्ञासु शास्त्रज्ञाचा. गेलीं पसतीस वर्षें खगोलशास्त्राचा व्यासंग ठेवून त्यांनीं तो पिंड अबाधित राखला आहे एवढेंच नव्हे तर तो सुदृढ केला आहे. खगोलशास्त्रावर अधिकारवाणीनें बोलणारा त्यांच्यासारखा पुरुष महाराष्ट्रांत विरळा. त्यांची शास्त्रज्ञाची संशोधकीय व साक्षेपी वृत्ति ते पोलीस खात्यांत शिरले तेव्हांहि प्रगट झाली. याच गुणांच्या जोरावर त्यांनीं पोलीसखातें गाजविलें. तेथें एक इतिहास निर्माण केला. इंग्रजी लेखणी अशी फरडी कीं, त्यांनीं तयार केलेल्या मसुद्यांत पोलीस कमिशनर मि. डब्ल्यू. आर. जी. स्मिथ आणि डेप्युटी पोलीस कमिशनर मि. पी. बी. विल्किन्स यांनीं चुकूनही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २८८८५ वि
क्रमांक



मराठा मंदिराचे शिल्पकार आणि सर चिटणीस
श्री. गं. गो. तथा बाबासाहेब गावडे



मराठा मंदिर चित्रपटगृहांतील कांचेवरील चित्र
संतापुढें विनम्र झालेले श्री शिवप्रभु


राठा ग्रंथ संग्रहालय ठा . स्थ १५९
अनुक्रम वि:
क्रमांक .. नोंद दि: ....



मराठा मंदिर लि. इमारतीच्या कोनशीला समारंभप्रसंगीं ग्वाल्हेराधिपति कै. जिवाजीराव महाराज शिंदे यांना मंदिराचें मानचिन्ह लावीत असतांना



दिनांक १६–१०–'५८ रोजीं मराठा मंदिर–इमारतीच्या उद्घाटन प्रसंगीं श्री. दादासाहेब आभारप्रदर्शनाचें भाषण करीत आहेत. कै. जिवाजीराव महाराज, श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. चिंतामणराव देशमुख आणि सौ. चव्हाण




श्री. कामटे यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. जिवाजीमहाराज शिंदे हॉलच्या उद्घाटन प्रसंगीं श्री. दादासाहेब भाषण करीत आहेत.



पद्मश्री ले. ज. श्री. शंकरराव थोरात यांची महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या अध्यक्षपदीं नियुक्ति झाल्याबद्दल सत्कार झाला त्यावेळीं दादासाहेब स्वागतीय भाषण करीत आहेत.





मंदिराच्या बोर्डरूमध्यें दिनांक १६–११–६२ रोजीं श्री. दादासाहेब यांच्या तैलचित्राचें अनावरण झाल्यानंतर त्यांचा नामदार बॅ. जी. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार झाला. त्याप्रसंगीं नामदार पाटील, श्री. दादासाहेब, श्री. बाबडे



मराठा मंदिरच्या ' श्री शिवछत्रपति ' या ग्रंथाचें प्रकाशन व ग्रंथाचे लेखक कै. शेजवलकर यांच्या तैलचित्राचें अनावरण. श्री. दादासाहेब, श्री. चिंतामणराव देशमुख, श्री. बाळासाहेब देसाई




कलाकेन्द्रातर्फे नाट्यस्पर्धेसाठीं एकाद्याचें नशीब या नाटकाचा नामदार कल्याणराव पाटील यांच्या हस्तें मुहूर्त. श्री. दादासाहेब, श्री. बाबुराव पेंढारकर, श्री. गावडे, नामदार कल्याणराव पाटील व श्री. हुमणे



ग्वाल्हेराधिपति श्रीमंत माधवमहाराज शिंदे यांनीं मराठा मंदिरास प्रथम भेट दिली असतां—श्री. गं. गो. गावडे, ग्वाल्हेराधिपति आणि श्री. दादासाहेब मोरे



मराठा मंदिरचे कामकाज चालू असतांना श्री. स. य. कदम, डॉ. परब, श्री. चंद्रगिरी, श्री. चोबडे आणि श्री. दादासाहेब



दि. २३–२–१९६४ रोजीं नामदार श्री. बाळासाहेब देसाई गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त पुष्पहार.



दि. ८–६–६४ रोजीं नामदार श्री. बाळासाहेब सावंत कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त पुष्पहार

इकडचें अक्षर तिकडें करूं नये. डोळे उघडे ठेवून बिनधोक सह्या ठोकाव्या. मि. विल्किन्स यांचें त्यांच्यावर एवढें प्रेम कीं, त्यांच्यासाठीं त्यांनीं एक स्वतंत्र गुन्हा प्रतिबंधक खातें (पी.सी.बी.) सुरू केलें. तेंच पुढें 'गावडे खातें' या नांवानें ओळखलें जाऊं लागलें. या खात्याचे प्रमुख असतांना त्यांनीं आपल्या हाताखालील हवालदारांना कुणाला हात लावूं दिला नाहीं आणि म्हणून सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांचा हात 'गावडेसाहेबां'ना पाहतांच सलामासाठीं आपोआप वर जातो.

वयाची पन्नाशी उलटण्यापूर्वीच ते स्वच्छेनें नोकरींतून बाहेर पडले व समाजकार्यांत शिरले. ते सेवानिवृत्त झाले ते पोलिसखात्यांतील आपली शिस्त, दरारा आणि पाइप घेऊन. त्यांनीं आणखी एक मोलाची चीज बरोबर आणली. ती म्हणजे निष्ठा. सामाजिक कार्यांत एवढा अव्यभिचारी निष्ठेचा माणुस आढळणें दुरापास्त. शंकराच्या पिंडीवर बिल्वपत्र वाहण्यासाठीं मंदिरांत यायला एक वेळ निस्सीम भाविक चुकेल पण बाबासाहेबांची मराठा मंदिरांतील उपस्थिति कधीं चुकायची नाहीं. काम उरकण्याची ताकद एवढी दांडगी कीं, कागदपत्रांच्या फायलींचा हातभर उंचीचा ढीग हातावेगळा होईपर्यंत खालीं घातलेली मान वर जायची नाहीं कीं तोंडांतला पाइप हलायचा नाहीं.

माणूस जिद्दी. संकटांवर मात करणारा. बेडर वृत्तीचा. पण एकाच गोष्टीला बिचकणारा–प्रसिद्धीला ! प्रसिद्धि–पराङ्मुखता हें बाबासाहेबांचें एक विलोभनीय वैशिष्ट्य आहे.

मराठा मंदिराचा सध्यां जो व्याप दिसतो तो निर्माण झाला आहे बाबासाहेबांच्या उद्यमशीलतेंतून. मुंबईतील चार हायस्कुलें, एस. टी. सी. ट्रेनिंग इन्स्टिटयूट, जत व अक्कलकोट येथील हायस्कूलें, सोलापूरचें विद्यार्थी वसतिगृह, अॅकॅडमी ऑफ इंग्लिश, विद्यार्थ्यांच्या अभावी तात्पुरतें स्थगित झालेलें एन. डी. ए. ट्रेनिंग सेंटर, शिष्यवृत्त्या विभाग, ग्रंथालय, कलाकेन्द्र, वनिताविश्व, संसारशास्त्र वर्ग, साहित्य प्रकाशन शाखा, सेंट्रल स्टोअर्स, मोफत आरोग्य सल्लाकेंद्र, भाड्यानें दिलेलें चित्रपटगृह, श्री शिवाजी महाराज शिंदे हॉल......असा हा वार्षिक दहा लाखांचा प्रपंच आहे.

श्री. बाबासाहेबांचा हातच त्रिगुणात्मक. ते कार्याचा विस्तार करतील

आणि सांभाळतील, संस्थेसाठीं पैसा गोळा करतील आणि तो दक्षतेनें खर्च करतील, माणसें जमवितील आणि त्यांना कामाला लावतील.

माणसें जमविणाऱ्या ह्या हातानेंच दादासाहेबांना मंदिरांत ओढून घेतलें नि कार्यरत केलें. आणि दादासाहेबांकडे मंदिराचें जें जें काम आलें तें त्यांनीं मोठ्या निष्ठेनें पार पाडलें. कधीं संयुक्त चिटणीस म्हणून, कधीं शासनविभागाचे पदाधिकारी म्हणून, वनिताविश्व व कलाकेन्द्राचे अध्यक्ष म्हणून आणि आतां शिक्षण विभागाचे चिटणीस म्हणून. त्यांनीं मंदिराच्या व्यवस्थापक व नियामक मंडळाच्या सभा बोलाविल्या आणि त्या सभांचीं टिपणें घेऊन वृत्तांत लिहिले. वार्षिक सर्वसाधारण सभांचीं आमंत्रणें पाठविलीं आणि त्या सभांचे अहवाल तयार केले. पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकांसाठीं पूर्वतयारी केली आणि त्या घडवून आणल्या. मंदिरासाठीं मोठा निधि जमविला आणि संस्थेची सभासद संख्या वाढविली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सिंधमधून निर्वासितांचा लोंढा आला असतांना मंदिरानें शिबिरें उघडून त्यांना आसरा दिला त्यावेळीं दादासाहेब इतरांप्रमाणेंच रात्रंदिवस खपले. मंदिरानें कॅ. राम राघोबा राणे, ले. ज. पद्मश्री थोरात, डॉ. बी. डी. पवार, एफ. आर. सी. एस. (इंग्लंड व ग्लासगो) यांचे सत्कार केले त्यांत त्यांनीं भाग घेतला. मंदिराचीं दसरा संमेलनें असोत, शिवजयंति उत्सव असोत, महाराष्ट्र-दिन महोत्सव असो, शिवचरित्र ग्रंथाचें प्रकाशन असो, लोकनेत्यांच्या तैलचित्रांचें अनावरण असो, गायनवादनादि सांस्कृतिक कार्यक्रम असो, कोंकण व संरक्षण निधीं-साठीं पैसे जमवायचे असोत, खेळांच्या स्पर्धा असोत कीं भाषणें असोत, या सर्वांत दादासाहेबांचें अंग असावयाचेंच.

त्यांनीं वनिता विश्व आणि कलाकेंद्र या मंदिराच्या शाखांची आस्थेनें जोपासना केली. वनिता विश्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम सध्यां अशा उच्च अभिरुचीचे असतात कीं त्यांनीं या शाखेला मुंबईतील महिला-संघटनामध्यें मानाचें स्थान प्राप्त करून दिलें आहे. कलाकेन्द्रानें गेल्या पांचसहा वर्षांत भावगीत स्पर्धा, नामवंत गायकांच्या गायनाच्या बैठकी आणि शास्त्रीय संगीताच्या स्पर्धा यशस्वी केल्या. त्याचप्रमाणें केन्द्रानें 'एखाद्याचें नशीब,' 'वळणाचें पाणी वळणावर,' 'स्वामी तिन्ही जगांचा,' 'मुंबईचीं माणसें' या नाटकांचे प्रयोगहि सादर केले.

त्यांपैकीं चिंतामणराव कोल्हटकर स्पर्धेत एखाद्याच्या नशीबाला रु. ७५० चें दुसरें पारितोषिक मिळालें. 'मुंबईच्या माणसांना रु. ५०० चें तिसरें पारितोषिक मिळालें आणि कै. आळतेकर नाट्यस्पर्धेत एखाद्याच्या नशीबानें पुनः रु. १००० चें पहिलें बक्षीस पटकावलें. अशा रीतीनें रसिकांनीं केन्द्राच्या कलावंतांचा गौरव केला आहे.

दादासाहेबांनीं हें जें बहुविध कार्य केलें आणि सध्यां चालविलें आहे तें सर्व सरचिटणीसांच्या मार्गदर्शनाखालीं, त्यांच्या सहाय्यानें व इतर पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यानें. कै. ग्वाल्हेराधिपति जिवाजीमहाराजांपासून दैनंदिन कार्यभार वाहणाऱ्या कार्यकर्त्यांचा लोभ संपादून. मंदिराच्या कार्यांत जिथें तुटत होतें तिथें त्यांनीं जोडलें, जेथें घसरत होतें तेथें सावरलें, जेथें बळ कमी पडलें तेथें आपली शक्ति लावली.

महाराष्ट्राच्या राजधानींत मराठी माणसाची आज उपेक्षा होत आहे. तो अवमानित होत आहे. मराठी संस्कृतीची शान सुकत चालली आहे. महाराष्ट्रियांना येथें हक्काचें मानाचें स्थान प्राप्त करून द्यावें, मराठी संस्कृतीची जोपासना करणारें व महाराष्ट्राची अस्मिता जिवंत ठेवणारें प्रभावी केंद्र निर्मावें, पण हें करीत असतां राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेला धक्का पोंचूं नये अशी मंदिराची ध्येयपूजा आहे. या पूजेसाठीं जे अनेक लोक पहिल्या रांगेत बसले आहेत त्यांत दादासाहेब निश्चितच शोभून दिसतात.

## १५

# पहिला मानकरी

त्या दिवशीं–दिनांक १६–११–१९६३ रोजीं मंदिराचे सरचिटणीस श्री. बाबासाहेब गावडे अत्यंत खुषींत असलेले दिसले. त्यांच्या चर्येवर आनंद ओसंडत होता. मराठा मंदिरचें उद्‌घाटन झालें त्यावेळींहि ते इतके आनंदित झालेले कुणाला दिसले नव्हते. संध्याकाळीं पांचच्या सुमारास मंदिराच्या एका शाळेचे मुख्याध्यापक श्री. × × × मंदिरकार्यालयांत प्रवेश करतांना दिसले तेव्हां ते त्यांना म्हणाले, " पाहिलंत तुम्ही ? नाहीं पाहिलंत ? चला दाखवतों. " असें म्हणून ते तिसऱ्या मजल्याचा जिना घाईनें चढून वर गेले आणि त्यांनीं एका रेशमी वस्त्राचें आवरण दूर केलें. मग तोंडांतील पाइप हातांत घेऊन ते उत्साहानें म्हणाले, " आहे ना छान चित्र ? श्रीमती कुमी दलास यांनीं तयार केलें आहे हें. आवडलं तुम्हांला ? "

तें तैलचित्र होतें श्री. दादासाहेब मोरे यांचें.

आणि नंतर बाबासाहेब म्हणाले, " ही आपली नवी बोर्डरूम. कशी आलिशान आणि ऐसपैस आहे. मंदिराच्या वैभवाला शोभणारी आहे कीं नाहीं ? इथंच हें चित्र लावायचें आहे."

त्यानंतर एका तासानें नामदार जी. डी. पाटील यांच्या हस्तें नव्या बोर्डरूमचें उद्‌घाटन झालें आणि तिला दादासाहेबांच्या तैलचित्रानें शोभा आणली.

बोर्डरूममधून मंडळी श्री. शिवाजी महाराज शिंदे हॉलमध्यें आली. आणि तेथें दादासाहेबांचा नामदार जी. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार झाला.

हा सत्कार मराठा मंदिरच्या इतिहासांतील एक वैशिष्टयपूर्ण घटना समजली पाहिजे. श्री. बाबसाहेब हे मराठा मंदिरचे सरचिटणीस आणि दादासाहेब त्यांचे सहकारी. बाबासाहेबांनीं स्वखर्चानें आपल्या सहकाऱ्याचें तैलचित्र तयार केलें आणि तें मंदिराला अर्पण केलें. थाटाचा समारंभ घडवून आणला तोहि बाबासाहेबांनीच. याचा अर्थ असा कीं, जेष्ठ कार्यकर्त्यानें आपल्याशीं सहकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा यथोचित गौरव करून त्याला मोठेंपण दिलें. अशाप्रकारचें औदार्य सहसा दृष्टीस पडत नाहीं. पण बाबासाहेबांनीं मात्र मराठा मंदिरामध्यें त्याचा साक्षात्कार घडवून आणला.

या सत्काराच्या प्रसंगीं बाबासाहेब म्हणाले, मंदिराची कल्पना बीजरूपानें रूजली तेव्हांपासून हें मंदिर डौलानें उभें राहीपर्यंत ज्या ज्या कार्यकर्त्यांनीं आपलें तनमनधन वेंचलें त्यांत दादासाहेबांना मानाचें स्थान आहे. गेलीं वीस वर्षें त्यांनीं मला मोलाचें सहकार्य दिलें. आणि म्हणून त्यांचें तैलचित्र संस्थेला अर्पण करतांना मला अतिशय आनंद होत आहे. मी तें माझें एक कर्तव्य मानतों.

नामदार जी. डी. पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले, हा सत्कार सत्तेवर असलेल्या व्यक्तीचा नाहीं, किंवा परंपरेनें मोठेंपण मिळालेल्या सुदैवी माणसाचा नाहीं. हा गौरव आहे एका निरलस, निष्ठावंत आणि सेवाभावी कार्यकर्त्याचा. समाजाचें प्रगतिपथावर पाऊल पडतें तें अशा कार्यतत्पर महाभागांमुळें. राष्ट्राची उन्नति होते ती अशा त्यागी व्यक्तींमुळें. मोरे यांची सेवा मंदिरांत व चिपळूण तालुक्यांत नोंदली गेली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांत तिची आतां अवश्य नोंद होईल.

मराठा मंदिरनें श्री छत्रपति शिवाजी महाराज, कै. जिवाजीमहाराज शिंदे, महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर अण्णासाहेब शिंदे आणि शिवचरित्रकार कै. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचीं तैलचित्रें समारंभपूर्वक लावलीं. परंतु संस्थेचें कार्य करणाऱ्या व्यक्तीचें चित्र मंदिरानें लावलें नव्हतें. तो मान सरचिटणीसांनीं दिला दादासाहेब मोऱ्यांना. मराठा मंदिरचा पहिला मानाचा मुजरा मिळाला तो ह्या मानकऱ्याला!

---

# १६

## नटेश्वराच्या रंगमंदिरांत

१९२३ मध्यें एका रविवारीं संध्याकाळीं चार वाजतां नाना चौकांतील इराणी चाळींत सीताहरण झालें. ज्या सीतेचें हरण व्हावयाचें ती सीता आणि तिला फरफटत ओढून नेणारा रावण हीं दोघेंहि त्याच चाळींतील. सीताहरण मोफत होतें. पण फक्त चाळींतील बालगोपालांसाठीं. 'सीताहरण' ही नाटिका कोणी एका लेखकानें लिहिली नव्हती. ती अलिखित होती. आणि तिचें कर्तृत्व तिच्यांतील सहा कलावंतांनीं आपल्याकडे घेतलें होतें. रावणानें दंडकारण्यांतून सीतेचें हरण केलें आणि रामलक्ष्मणांनीं मारुतीच्या सहाय्यानें तिची मुक्तता केली एवढा कथाभाग नाटिकेंत येणार होता. प्रत्येक नटानें आपलें भाषण जागच्या जागीं रचून मोठ्यानें म्हणावयाचें असें सर्वांनीं ठरविलें होतें. त्यामुळें कथेच्या चौकटींत जेवढें स्वातंत्र्य घेतां येईल तेवढें उपभोगण्यास कोणाहि नटवर्यानें मागेंपुढें पाहिलें नाहीं.

या नाटिकेंत प्रमुख भूमिका उठविल्या त्या खालील मुलांनीं व मुलीनें.

राम : जगन्नाथ बाळकृष्ण पालव
लक्ष्मण : एक बारा वर्षांचा मुलगा
सीता : एक आठ वर्षांची मुलगी
मारुती : नारायण पुरुषोत्तम देवधर
बिभीषण : रामचंद्र भिकाजी अंगणे
रावण : तुकाराम धोंडबाराव मोरे (वय वर्षें १३)

या प्रयोगांत रंगरंगोटी मुळींच झाली नाहीं. वेषभूषा करण्याचीहि आवश्यकता वाटली नाहीं. सीतेनें परकरपोलकें घातलें होतें. राम, लक्ष्मण, मारुती

बिभीषण आणि रावण यांनीं अर्ध्या बाह्यांचे शर्ट आणि लांड्या खाकी विजारी चढविल्या होत्या. पण सीता आणि मारुतीशिवाय मिशा मात्र सर्वांना होत्या. रावणाच्या मिशा तर अधिक लांब व भरदार. मारुतीनें आपल्या मिशांची उणीव विजारीला बांधलेल्या कापडी शेपटीनें भरून काढली होती. योध्यांनीं आपल्या हातांत वेळूच्या कामटांचे धनुष्यबाण घेतले होते आणि मारुतीच्या हातांत गदेच्या स्वरूपांत चुलींतील एक मोठें लाकूड होतें.

ह्या नाटकाचा दिग्दर्शक रावण. नाटक चालू असतांनाच तो आपल्या मिशांचा झुबका सांभाळीत प्रेक्षकांसमोर दिग्दर्शन करीत होता.

नाटक एक तासभर चाललें. एवढ्या वेळांत पुरुष कलाकारांच्या मनांत एकच भीति वारंवार उसळी मारून वर येत होती. आपण गोंदानें चिकट-विलेल्या मिशा खालीं पडल्या तर? आणि मारुतीला वाटत होतें, आपल्या विजारीला बांधलेली शेपटी गळून पडली तर? पण असला अपघात झाला नाहीं आणि कारुण्यप्रधान नाटकांत हास्यरस उफाळला नाहीं. बाणांचा वर्षाव, उत्स्फूर्त भाषणें, रावणाचें ओरडणें आणि मारुतीचा भूभूःकार इत्यादि गुणांमुळें प्रयोग चांगलाच रंगला.

कलाकार आणि फुकटे प्रेक्षक बेहद्द खूष झाले. सर्वांनीं मिळून टाळ्यांचा कडकडाट केला. प्रेक्षकांनीं आणि नटांनीं! नटांनी केलेला कडकडाट अर्थातच मोठा होता.

सीतेची भूमिका करणाऱ्या मुलीशिवाय इतर नट त्यावेळीं इंग्रजी दुसरींत होते. दादासाहेबांना व त्यांच्या मित्रांना हें लोकनाट्य करण्याची प्रेरणा अर्थातच राममोहन शाळेंतून मिळाली. त्यांनीं १९२२ मध्यें राजा राममोहन रॉय यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्याच जीवनावर आधारलेला नाट्यप्रयोग पाहिला होता. दादासाहेबांच्या अंतर्यामीं वसलेला कलाकार जागा झाला तो त्याच वेळीं.

आणि त्यानंतर दादासाहेबांनीं शाळेच्या संमेलनप्रसंगीं किंवा प्रार्थना समाजातर्फें होणाऱ्या नाट्यप्रयोगांत कामें करण्याची संधि घेतली. त्यांच्या शिक्षकांनींच त्यांना उत्तेजन दिलें. त्यांनीं शाळेंत असतांना ज्या तीन नाटकांत भूमिका गाजविल्या त्यांत 'हिरा हरपला' या नाटकास अग्रस्थान द्यावें लागेल. हें नाटक कै. डॉ. भालेराव यांनीं बसविलें होतें. त्यांत दादासाहेबांनीं उदय-

भानूची भूमिका इतक्या कौशल्यानें वठविली कीं, विद्यार्थी, शिक्षक आणि पाहुणे यांनीं त्यांची मुक्तकंठानें वाहवा केली. नाटकाचा अखेरचा पडदा पडला त्यावेळीं दिग्दर्शक भालेराव घाईनें पुढें झाले आणि त्यांनीं दादासाहेबांची पाठ थोपटली.

शालेय जीवन संपलें तरी दादासाहेबांना नाटकांबद्दल वाटणारें प्रेम कमी झालें नाहीं. उलट तें वयाबरोबर वाढतच गेलें. आणि त्या वाढत्या प्रेमामुळें त्यांच्या जीवनाच्या कक्षाहि विस्तृत झाल्या. त्यांची आणि नामवंत दिग्दर्शक श्री. नानू संझगिरी यांची प्रथम भेट झाली ती दादासाहेबांना नाट्यकलेबद्दल वाटणाऱ्या आस्थेमुळेंच. जानेवारी १९४१ मध्यें लॅमिंग्टन रोडवरील मॉडर्न नाइट हायस्कूलमध्यें प्रा. अनंत काणेकर यांचें ' निशिकांतची नवरी ' या नाटकाच्या तालमी चालल्या होत्या. हें नाटक शाळेच्या स्नेहसंमेलनप्रसंगीं व्हावयाचें होतें आणि त्याचें दिग्दर्शक होते श्री. नानू संझगिरी. तालीम पाहण्यासाठीं दादासाहेब रात्रीं शाळेंत गेले असतांना शाळेचे सुपरिंटेंडंट श्री. शामराव गोपीनाथ वणवे यांनीं त्यांचा संझगिरी यांच्याशीं परिचय करून दिला.

श्री. नानू संझगिरी यांचें व्यक्तिमत्वच मोठें आकर्षक. विस्तीर्ण भालप्रदेश, तेजस्वी हंसरे डोळे, सतेज अंगकांति आणि कधीं न संपणारें तारुण्य. पण पोषाख मात्र कमालीचा साधा. लेहंगा आणि अर्ध्या बाह्यांचा नेहरू सदऱ्यासारखा झब्बा. डोक्यावर मागें परतविलेले काळे केस आणि पायांत साध्या वहाणा. पोषाखांत दिमाख नाहीं तसा वृत्तींतहि तोरा-नाहीं. जेवढे निगर्वी तेवढेच विनयशील. कष्टाळु नि हौशी. नटांनीं दहा वेळां चुका कराव्या आणि त्यांनीं अकरा वेळां अभिनय करून दाखवावा. आणि या कष्टाबद्दल मोबदला किती ? सहसा कसलाच करार केलेला नसायचा. केव्हां श्रमाचे पैसे मिळायचे, केव्हां मिळायचेहि नाहींत. पण कांहीं मिळालें नाहीं म्हणून राग धरायचा नाहीं. १९४१ मध्यें त्यांच्या दिग्दर्शनाचा बोलबाला झाला नव्हता हें खरें. परंतु वरील गुणविशेषांमुळें ते हौशी कलावंतांना हवेहवेसे वाटत.

मुंबईंत ओळखी होतात पुष्कळ, परंतु त्यांचें मैत्रींत रूपांतर व्हायला अवधि लागतो फार. आणि कित्येकदां तर ओळखीचें स्वरूप केवळ परिचया-

अनुक्रम वि
क्रमांक नोंद दि



श्री. नान् संझगिरी



'पेल्यांतील वादळ' मध्यें बाळासाहेबांच्या भूमिकेंत श्री. दादासाहेब



'चोर आले पाहिजेत' या नाट्यप्रयोगांत 'रामभाऊ' च्या भूमिकेंत श्री. दादासाहेब



'देवमाणूस' मध्यें 'दादा' च्या
भूमिकेंत श्री. दादासाहेब



'राणीच्या बागेंत' 'उमाकांत' च्या
भूमिकेंत श्री. दादासाहेब



मराठा मंदिर कलाकेन्द्रानें सादर केलेल्या 'मुंबईचीं माणसें' या नाट्यप्रयोगाला
रु. ५०० चें पारितोषिक मिळालें. श्री. दादासाहेब हे मेअर डॉ. दिवगी
यांच्याकडून पारितोषिक घेत आहेत.



‘ चोर आले पाहिजेत ’ या नाटकांतील एक अविस्मरणीय प्रसंग. श्री. दादासाहेब रामऊच्या भूमिकेंत.



कलाकेंद्रानें भारतीय विद्याभवनामध्यें श्रीमती धनवटे लिखित “ वळणाचें पाणी वळणावर ” हें नाटक सादर केलें त्यावेळीं बालगंधर्व उपस्थित होते.

पुरतेंच मर्यादित राहतें; ओळखीची मैत्रींत परिणतीच होत नाहीं. दादासाहेब आणि नानू संझगिरी यांच्या बाबतींत तसें झालें नाहीं. थोड्याच अवधींत परिचय वाढला आणि मैत्री जडली. याचें बरेंचसें श्रेय कॅ. मा. कृ. शिंदे यांचे बंधु श्री. बाबी शिंदे यांना द्यावें लागेल.

या नाट्यप्रेमी तरुणांच्या मैत्रींतून लवकरच सहकार्य निर्माण झालें तें दादासाहेबांच्या सार्वजनिक कामाच्या ओढीमुळें. तुरंबव शाळेच्या इमारतीसाठीं दादासाहेबांना पैसा हवा होता आणि या कामीं त्यांनीं नानू संझगिरी यांच्याकडे सहकार्य मागितलें. तें संझगिरीनीं दिलें.

दोघांचा विचारविनिमय झाला आणि सार्वजनिक कामाच्या उभारणीसाठीं पैशाचें पाठबळ निर्माण करण्याच्या हेतूनें एक नाट्यसंस्था स्थापन करण्याचें ठरलें. १५ ऑगस्ट १९४१ रोजीं संध्याकाळीं दादासाहेबांच्या घरीं बरीच मित्रमंडळी जमली आणि 'नाट्य नवजीवन' या संस्थेच्या मुहूर्ताचा नारळ फुटला.

संस्थेनें पहिलें नाटक सादर केलें तें "म्हातारपणचे डोहाळे". या नाटकाला संझगिरी आणि दादासाहेब यांचें संयुक्त दिग्दर्शन लाभलें. त्यांत दादासाहेबांनीं "रावसाहेबाची" भूमिका पार पाडली. शिवाय सर्वश्री नानू संझगिरी, बाबी शिंदे, बी. जी. देसाई यांनींहि भूमिका केल्या. देसाई स्त्रीभूमिकेंत चांगलेंच शोभून दिसले. सध्यां रंगभूमीला परिचित असलेल्या श्रीमती वर्षा शेट्ये यांच्या मातोश्री श्रीमती शैलजाबाई शेट्ये आणि त्यांच्या भगिनी श्रीमती ताराबाई शेट्ये यांनीं उपरोक्त प्रयोगांत कामें करून तो यशस्वी केला.

यानंतर संस्थेतर्फें जीं नाटकें झालीं त्यांत दादासाहेब पुरुष भूमिका करीत आणि बऱ्याचशा नाटकांतून ख्यातनाम नट व दिग्दर्शक श्री. आत्माराम भेंडे हे स्त्रीभूमिका करीत.

दादासाहेब यांनीं स्वतंत्रपणेंहि कांहीं नाटकांचें दिग्दर्शन केलें. त्यांपैकीं "चोर आले पाहिजेत" या विनोदी नाटकाचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. या नाटकाच्या प्रयोगासाठीं ज्या जाहिराती काढल्या होत्या त्यांत दिग्दर्शक म्हणून "श्री दादा मोरे" असें नमूद केलेलें आढळून येतें.

१९४४ मध्यें 'नाट्य नवजीवन'नें जें नाटक रंगभूमीवर आणलें त्याचा विशेष बोलबाला झाला. डॉ. भालेराव यांनीं साहित्य संघाच्या नाट्यमंदिरा-

साठीं निधि जमविण्याच्या हेतूनें आणि मराठी नाट्यसृष्टीच्या पुनरुज्जीवनासाठीं पहिला नाट्यशतसांवत्सरिक उत्सव एप्रिल १९४४ मध्यें आयोजिलेला होता. त्या प्रसंगीं झालेल्या स्पर्धेत २१ नाट्यमंडळांनीं भाग घेतला होता. 'नाट्य नवजीवननें आचार्य अत्रे यांचें 'उद्यांचा संसार' हें नाटक बसवून स्पर्धेत पदार्पण केलें आणि पहिल्या क्रमांकाचें रु. ५०० चें पारितोषिक पटकाविलें.

या नाटकाचें दिग्दर्शन दादासाहेब आणि संझगिरी यांनीं संयुक्तपणें केलें होतें. त्यांत दादासाहेबांची "बॅ. विश्राम"ची भूमिका फार बहारीची झाली. संझगिरींचे बंधु श्री दिवाकरपंत यांनीं उभा केलेला 'शेखर' प्रेक्षकांच्या मनश्चक्षूंसमोर दीर्घकाल वावरत राहिला.

दादासाहेबांचा "बॅ. विश्राम" विशेष आवडला तो डॉ. भालेरावांना. 'हिरा हरपला' या नाटकांतील 'उदयभानूनेंहि डॉ. भालेरावांच्या मनावर छाप पाडली होती. आणि म्हणून डॉ. भालेरावांनीं दादासाहेबांना साहित्य संघाच्या एका नाटकांत काम करावयास पाचारण केलें. 'पराचा कावळा' हें तें नाटक. या नाटकाचें दिग्दर्शन "बहुरूपी असा हा खेळ" या नाटकाचे लेखक व एक जुने अनुभवी नट श्री. दत्तात्रय केळुसकर यांनीं केलें होतें. त्यांत दादासाहेब "सॉलिसिटर भाईलाल शेठ"च्या भूमिकेंत चांगलेच चमकले.

दादासाहेबांच्या उपरोक्त भूमिकेवर डॉ. भालेराव निहायत खूष झाले. त्यांनीं दादासाहेबांना म्हटलें, तुम्ही येऊन संघाच्या नटसंचांत भर घातलीत तर आम्हांला खरोखरीच आनंद होईल.

पण दादासाहेबांना स्वतःच्या नाट्यसंस्थेचें विसर्जन करावयाचें नव्हतें. कारण, चिपळूण तालुक्यांतील सार्वजनिक कार्यासाठीं त्यांना निधि जमवावयाचा होता आणि नवीं नवीं नाटकें बसवून त्यांनीं तो जमविलाहि.

यासंबंधीं श्री. नानू संझगिरी म्हणतात, "कुणाला वाटतें, कलेसाठीं कला. कुणाला वाटतें, जीवनासाठीं कला. पण दादासाहेबांनीं कला राबविली ती सामाजिक कार्यासाठीं. सार्वजनिक कामाला पैसा मिळावा म्हणून. त्यांनीं याच हेतूनें पंचवीसतीस नाट्यप्रयोग केले आणि तीसचाळीस हजार रुपये ग्रामस्थ संस्थांसाठीं गोळा केले."

"दादासाहेबांनीं ज्या नाटकांत कामें केलीं त्यांचीं नांवं सांगतां येतील का तुम्हांला?" संझगिरींना प्रश्न विचारण्यांत आला.

संझगिरीनीं उत्तर केलं, "सगळींच नांवं सांगतां येतील असं नाहीं. आठवतील तेवढीं सांगतों. दादासाहेबांनीं कोणत्या भूमिका केल्या त्याहि सांगतों. शाळेंत असतांना त्यांनीं तीन नाटकांत भूमिका केल्या होत्या त्या मला पाहायला मिळाल्या नव्हत्या हें खरें. पण मला त्यांबद्दल चांगली माहिती आहे. सांगूं? घेतां टिपून?"

"हो, सांगा."

श्री. संझगिरी बोलूं लागले :

"आधीं नाटकाचं नांव आणि नंतर दादासाहेबांनीं त्यांत उठविलेली भूमिका या क्रमानं मी सांगणार आहें. पण नाटकं ज्या कालक्रमानं झालीं तो क्रम मात्र मला साधतां यायचा नाहीं. त्यांत मागंपुढं होणार बरं का!

| नाटक | भूमिका |
|---|---|
| १. बेबंदशाही | संभाजी |
| २. हिरा हरपला | उदयभानू |
| ३. पुण्यप्रभाव | कंकण |

"या विद्यार्थी दशेंतील भूमिका. आम्ही नाट्यसंस्था उभारून जीं नाटकं केलीं तीं व त्यांतील भूमिका आतां सांगतों.

| | |
|---|---|
| ४. म्हातारपणचे डोहाळे | रावसाहेब |
| ५. वंदे मातरम् | त्रिभुवन, सर गुरुनाथ |
| ६. भ्रमाचा भोपळा | कचेश्वर |
| ७. पराचा कावळा | भाईलाल शेठ |
| ८. साष्टांग नमस्कार | रावबहादूर |
| ९. घराबाहेर | आबासाहेब |
| १०. उद्यांचें जग | शामकांत |
| ११. जग काय म्हणेल | बाबासाहेब, दिवाकर |
| १२. देव माणूस | दादा |
| १३. उद्यांचा संसार | बॅ. विश्राम |

१४. राणीचा बाग ............... उमाकांत
१५. चंद्रग्रहण .................. जगदेवराव
१६. वार्ताविहार .................. बंडूनाना
१७. पंतांची सून ................ पंत
१८. चोर आले पाहिजेत ......... रामभाऊ
१९. पेल्यांतील वादळ ............. बाबासाहेब
२०. धर्मांतर ..................... बजाजी निंबाळकर
२१. खडाष्टक .................. राघोपंत
२२. छापील संसार ............... भगवंतराव
२३. वरपरीक्षा .................. ?
२४. तीन तासांत ............... ?

" शेवटच्या दोन नाटकांतील भूमिका मला आठवत नाहींत. " श्री नाना पुढें बोलूं लागले. " वरील नामावलीकडे दृष्टिक्षेप केला तर असं दिसून येईल कीं, दादासाहेबांना सर्व प्रकारच्या भूमिका करण्याची संधि मिळाली आणि त्यांनीं ती तत्परतेनं घेतली. त्यांनीं ऐतिहासिक नाटकांत तलवार हातीं घेतली तर सामाजिक नाटकांत वकील म्हणून कायद्याची पुस्तकें चाळलीं. गंभीर भूमिका करून हृदयाचा ठाव घेतला तशा खेळकर व हलक्याफुलक्या भूमिकांनीं मनाला गुदगुल्या केल्या. रंगमंचावर सुटाबुटांचा रुबाब केला तसा धोतरपंचांचा साधेपणाहि स्वीकारला.

" दादासाहेबांची एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे बरं का ? कांहीं नटांना ठराविक पद्धतीच्याच भूमिका हव्या असतात. त्यांना कामें हवीं तीं सुटाबुटांतील, त्यांना धोतरांची अतिशय लाज. दादासाहेबांचं तसं नाहीं. अमुक एका भूमिकेबद्दल त्यांनीं कधींच आग्रह धरला नाहीं. कसलंहि काम करण्याची त्यांची तयारी.

" दादासाहेबांना जी भूमिका मिळे तिचा ते कसून अभ्यास करीत— आणि आतांहि करतातच. पाठांतर चोख असलं पाहिजे असा त्यांचा कटाक्ष आणि अभिनय यथातथ्य व्हावा यासाठीं जिवाची घालमेल.

" आणि त्यामुळं त्यांचीं सारींच कामं चांगलीं व्हायचीं. पण त्यांच्या चार भूमिका मला विशेष आवडल्या. उद्यांच्या संसारांतील बॅ. विश्राम, राणीच्या

बागेतील उमाकांत देवमाणूसमधील दादा आणि पेल्यांतील वादळामधील बाबासाहेब."

इतकें सांगून श्री. संझगिरी यांनीं चहाचा पेला तोंडाला लावला.

या सर्व भूमिकांमध्यें दादासाहेबांचा "बॅ. विश्राम" अत्यंत प्रभावी आहे. तो रसिकमनाची तत्काळ पकड घेतो.

१९६३ मध्यें जयहिंद कॉलेजमध्यें 'उद्यांचा संसार' मांडला होता. त्यांतील बॅ. विश्रामचें चित्र पाहून मराठा मंदिराच्या ठाकुरद्वार हायस्कूल-मधील एक विदुषी × × × आपल्या पतीला म्हणाल्या, "मोरेसाहेब इतकें चांगलें काम करतात हें माहीत नव्हतं!"

नाटक संपल्यानंतर त्यांनीं आपला हा अभिप्राय व्यक्त करतांच दादा-साहेबांची मुद्रा समाधानानें उजळली. नेत्रांत आनंद सामावला.

तो कलावंताचा आनंद होता. रसिकांनीं केलेल्या प्रशस्तीची ती तृप्ति होती.

नाटकांचा विषय निघाला म्हणजे दादासाहेबांच्या चर्येवर नेहमींच तृतीची भावना दृग्गोचर होते. ते रंगांत येऊन म्हणतात, नाटकें वाचतांना नि पाहतांना मी माझ्या सर्व चिंता, सार्वजनिक कामाच्या कटकटी, दिवसभराचा कामाचा शीण हें सारं सारं विसरून जातों......आणि प्रत्यक्ष भूमिका करतांना? तो आनंद कांहीं वेगळाच आहे!......समोर सातआठशें प्रेक्षक बसले आहेत. प्रेक्षागृहांतील दिवे मालवले आहेत. पण रंगमंचकावर तेजस्वी दीप झगमगत आहेत. अशा वेळीं स्वतःला विसरून बोलूं लागावें, हंसावें, रागवावें. केव्हां आलिंगन देण्यासाठीं तर केव्हां गळा दाबण्यासाठीं हात पुढें करावे. असें काल्पनिक विश्व निर्मावें. त्या विश्वांत स्वतः संचार करावा आणि प्रेक्षकांना मोहिनीमंत्रानें त्याच विश्वाचा संचार घडवावा......स्वतःच निर्मिलेल्या काल्पनिक जगांत प्रेक्षकांसह एकरूप व्हावें. हीच निर्मितीची बेहोषी! अभिनेत्याला आणि कलाप्रेमी प्रेक्षकाला नटश्वरेच्या मंदिरांत लागणारी समाधि!........

दादासाहेब थांबतात पण ऐकणाराला वाटतें, त्यांनीं बोलावें. असेंच बोलावें.

********

# १७

# पांखरांची किलबिल

सौ. वत्सलाबाईंच्या भगिनी वारणाबाई गोविंदराव शिंदे चेंबूरच्या लाल-वाडींत चाळीस जणांचें गजबजलेलें कुटुंब मागें ठेवून १९६० मध्यें कालवश झाल्या. त्यांच्या मृत्यूनें शोकाकुल झालेल्या कुटुंबांत त्यांचीं स्वतःचीं सहा मुलें. तीन मुलगे आणि तीन मुली. त्यांपैकीं सर्वांत लहान मुलगा प्रकाश आणि मुलगी उज्ज्वला. पण त्यांना मातृवियोगाचें दुःख फार काळ सहन करावें लागलें नाहीं. कारण दादासाहेबांनीं प्रकाश आणि उज्ज्वला यांना मराठा मंदिराच्या श्री. शिवाजी महाराज शिंदे हॉलमध्यें धार्मिक विधि करून आपल्या मांडीवर घेतले. हा दत्तकविधानाचा सोहळा एखाद्या बड्या धनि-काच्या लग्नसमारंभासारखा मोठ्या थाटानें पार पडला. मंगलवाद्यांचे मधुर स्वर निनादले, पवित्र मंत्रोच्चार झाले, चविष्ट मिठाईनें शेंकडों इष्ट–मित्रांचीं तोंडें गोड झालीं आणि प्रकाश व उज्ज्वला यांना प्रेमळ मातापित्यांचा लाभ झाला. ( ३०–४–१९६१ )

या दोनही मुलांचा दादासाहेबांना वारणाबाईंच्या मृत्यूपूर्वींच लळा लागला होता. ती दोघें सोनावाला बिल्डिंगमध्यें वारंवार राहायला येत असत. आणि आतां तीं कायमचीं राहायला आलीं.

नियतीचा खेळ अतर्क्य असतो हेंच खरें. दादासाहेब आणि वत्सलाबाई या दोघांचा नवा संसार १९३२ मध्यें श्री हरिनिवासमध्यें सुरू झाल्यानंतर थोड्याच महिन्यांनीं, १९३३ मध्यें, वारणाबाईनें त्यांच्या जीवनांत प्रवेश केला होता. तेरा वर्षांच्या या मुलीनें आपल्या मोठ्या बहिणीला सोबत केली होती, कामाला हातभार लावला होता आणि आपल्या खेळकर वागण्यानें दादासाहेबांचें मन प्रसन्न केलें होतें. पुन्हां २८ वर्षांनीं त्यांच्या संसारांत त्याच मुलीच्या मुलांनीं प्रेमाचा शिडकाव केला.

उजळ रंगाची, नाकीं डोळीं नीटस असलेली बारा वर्षांची उज्ज्वला सध्यां नाना चौकांतील सॅंट कोलंबा या ख्यातनाम शाळेंत पुस्तकांचा भारा घेऊन जातांना दिसते. तिच्या पुस्तकांवर तिच्याच हस्ताक्षरांत लिहिलेलें असतें–मिस् उज्ज्वला तुकाराम मोरे, इयत्ता सातवी. तिचें हस्ताक्षर जेवढें गोड आहे तशीच ती स्वभावानेंहि लोभस आहे. मंजुळ आवाजांत मोजकें बोलणारी, हंसरी, लाजरी आणि संकोची. पण अज्ञाताबद्दलचें केवढें कुतूहल! जणुं साऱ्या जगांतील कुतूहल तिच्या सतेज टपोऱ्या डोळ्यांत सांठविलें आहे.

उज्ज्वलेचा आठ वर्षांचा भाऊ मात्र तिच्यापेक्षां वेगळा आहे. बहीण शांत आणि संथ, तर हा लुडबुड्या आणि धडपड्या. प्रकाशला फरशीवर पडण्याची, आपटण्याची हौस फार. नेहमीं अंगावर कुठेंतरी जखम असावयाची. पण जखमेची वेदना व्हायची नाहीं. आणि झाली असली तर तो व्यक्त करावयाचा नाहीं. तो जेवढा बोलका आहे तेवढाच मोकळाहि आहे. ‘आवर इंग्लिश स्कूल’ मधून संध्याकाळीं घरीं आल्यावर तो पट्टया-पट्टयांचा सदरा आणि पायजमा चढवील आणि खाणेंपिणें झाल्यावर घराबाहेर सटकेल. त्याचे सोबती त्याचीं वाट पहात असतातच. पण खेळ संपल्यावर तो स्वतः अधिक वाट पाहील दादासाहेबांची. ते आले म्हणजे आपल्या शाळेंतील मुलांच्या बारीकसारीक गमती सांगेल, नकला करील, हंसेल आणि हंसवील. तो जसा खेळायला चुकत नाहीं तसा पुस्तक उघडायलाहि चुकत नाहीं. तो अभ्यास करतांना दादासाहेबांना अडचणी विचारील, त्यांच्याशीं इंग्रजींत बोलेल आणि त्यांना लिहिलेलें दाखवील. त्याची बुद्धि अभ्यासांतील कठीण स्थळें शोधते तसेंच त्याचे मिस्किल डोळे भोंवतालच्या गमती व विसंगति टिपून घेतात. तो केव्हां केव्हां असा विनोद करतो कीं, ऐकणारा थक्क व्हावा. पण तो विनोद असतो निष्पाप आणि सहज सुंदर. वाहत्या ओढ्यांतील निर्मळ पाण्यासारखा!

ह्या दोनहि मुलांनीं दादासाहेबांचा आणि वत्सलाबाईंचा संसार खुलवला आहे, अनेक रंगांनीं रंगविला आहे. दादासाहेबांना नभोनाट्य आणि नाट्यसंगीत ऐकण्याची हौस फार. पण या दोन पांखरांची गोड किलबिल ऐकतांना रेडिओ सुरूं करण्याचें त्यांना भानहि राहत नाहीं.

———

*********

# १८


# मुक्त करणारी शक्ति

दादासाहेबांना उभ्या आयुष्यांत पिशवीशी कधीं सलगी करावी लागली नाहीं. एखादें दिवशीं दादासाहेबांनीं सकाळीं किंवा संध्याकाळीं पिशवी उचलली आहे आणि त्यांनीं भाजी आणलेली आहे असें दृश्य त्यांच्या मित्रांना किंवा शेजाऱ्यापाजाऱ्यांना पहायला मिळालें नाहीं. किंवा किराणा मालाच्या दुकानाची पायरी चढल्याचेंहि कुणी पाहिलें नाहीं. दादासाहेब व्यवहारकुशल असूनहि त्यांना हा व्यवहारी खटाटोप करण्याचा प्रसंग आयुष्यांत कधींच आला नाहीं.

याचें सर्व श्रेय वत्सलाबाईंना. त्यांनीं अर्थार्जनाखेरीज संसाराचा साराच भार अविरतपणें उचलला आहे. सुदैवानें तो उचलण्याइतकें आरोग्य त्यांना अखंड लाभलें आहे. घरांतील माणसांसाठीं कुरकूर न करतां कष्ट उपसायचे असा सर्वसाधारणपणें स्त्रियांचा धर्म. या स्त्रीधर्माचें उल्लंघन वत्सलाबाईंच्या हातून कधींहि घडलें नाहीं. दादासाहेबांच्या घरांत १९३३ पासून लहान मुलें एकसारखीं येत गेलीं. वारणा, इंदिरा, बाबाजी, रघुनाथ, मालती, वत्सला, शिवाजी, सतीश, शशिकान्त..............या साऱ्यांचें खाणें-पिणें, त्यांचें आजारपण, त्यांचे हट्ट, त्यांचे लाड, त्यांच्या हौशी-हें सर्व पहायचें वत्सलाबाईंनीं. काळजीपूर्वक कळकळीनें. आईच्या मायेनें. रामचंद्र अंगणे, जगन्नाथ पालव, दत्ताराम पवार यांच्यासाठीं ऊठबैस केली त्यांनीं. दादासाहेबांच्या घरीं पाहुण्यांचा, आप्तेष्टांचा राबता मोठा. त्या सर्वांचें आदरातिथ्य करावयाचें वत्सलाबाईंनीं. मोरे कुटुंबाचा एक विशेष आहे, तो म्हणजे त्या घरांतील आदरातिथ्य. घरांत कोणाचेंहि आगमन होवो, त्याचें यथोचित स्वागत व्हायचेंच. त्याच्यापुढें चहा-कॉफीचा कप किंवा सरबताचा किंवा पाण्याचा पेला हमखास यावयाचा. तुरंबव व चिपळूण तालुक्यांतील



रविवार दिनांक ३०–४–६१ रोजीं श्री. दादासाहेब व सौ. वत्सलाबाई यांनीं कुमार प्रकाश व कुमारी उज्ज्वला यांना दत्तक घेतलेल्या प्रसंगीं



कुमार प्रकाश



कुमारी उज्ज्वला



सौ. वत्सलाबाई मोरे



श्री. दादासाहेब आणि सौ. वत्सलाबाई

कार्यकर्त्यांच्या बैठकी रात्रीं अकरा–साडेअकरापर्यंत चालू असायच्या. त्या संपेपर्यंत सर्वांचें चहापाणी चालायचें. लोकांची गर्दी झाली म्हणून स्वयंपाक घरांत त्राग्यानें भांडीं आपटल्याचा आवाज मोऱ्यांच्या घरांत कधीं कुणी ऐकलेला नाहीं.

घरांत सत्यनारायणाची पूजा असली कीं, वत्सलाबाईंनीं त्यासाठीं भटजी-पासून सुपारीपर्यंत सारें साहित्य जमा करावयाचें. कुणाच्या लग्नाला जावयाचें असेल तर त्यांनींच अहेराची व्यवस्था पहावयाची. दादासाहेबांनीं फक्त उपस्थित राहावयाचें.

वत्सलाबाईंचें शिक्षण झालें आहे चार इयत्तांपर्यंत. परंतु वाचनानें त्यांनीं आपलें मन प्रगल्भ केलें आहे. त्यामुळें सभा–संमेलनांत किंवा लग्नप्रसंगीं वावरतांना न्यूनगंडाच्या भावनेनें त्या कधींहि बावरून जात नाहींत. त्यांच्या चालण्या–बोलण्यांत जेवढा विनय तेवढाच आत्मविश्वास दिसून येतो.

हें जोडपें अनेक वेळां समाजांत एकत्र वावरतांना दिसतें. दादासाहेबांचा पाश्चात्य पद्धतीचा पोषाख, तर वत्सलाबाईंचें नऊ वारी लुगडें. उभें आयुष्य मुंबईत काढूनहि त्यांनी बहुरंगी वस्त्रांचा नि सौंदर्यप्रसाधनांचा स्वतःला स्पर्श होऊं दिलेला नाही. मराठमोळा साधेपणा आणि शालीनता यांचा कधींहि त्याग केला नाही.

ज्या स्त्रिया स्वतःचें व्यक्तिमत्व अबाधित ठेवून आपल्या पतीच्या जीवनाशीं सहज एकरूप होतात अशा भाग्यशाली स्त्रियांत वत्सलाबाईंची गणना करावी लागेल. दादासाहेबांच्या बहुविध खटाटोपांत त्या रंगून जातात आणि पतीच्या कर्तृत्वानें त्या स्वतःच कृतकृत्य होतात. आणि म्हणून त्यांच्या चेहऱ्यावरचें हास्य कधींहि मावळत नाहीं.

दादासाहेबांना त्यांच्याविषयीं नितांत आदराची भावना आहे. ते म्हणतात, मी पस्तीस वर्षें संसार करूनहि मला संसाराचा ताप कधीं जाणवला नाहीं. मी कधीं दगदग केली नाही की मला धावपळ करावी लागली नाहीं. ज्याला संसाराचा भार म्हणतात तो माझ्या शिरापर्यंत कधीं पोंचलाच नाहीं. कारण तो मधल्यामधेंच उचलला आहे माझ्या सौभाग्यवतीनें. कधींहि कुरकूर न करतां, स्वेच्छेनें नि आनंदानें. त्यांनीं स्वतःला संसाराच्या जाळ्यांत अडकून घेतलें आणि मला मुक्त केलें—माझ्या न संपणाऱ्या व्यापासाठीं !

********

# १९

# चंद्र नभीं आला

घरांतील सर्व मंडळी शांतपणें पहाटेची साखर झोंप घेत असतां दादासाहेबांना जाग येते. ते आवाज न करतां उठतात, कपडे चढवतात आणि फिरण्यासाठीं बाहेर पडतात. ते भाटिया हॉस्पिटल जवळ येतात त्यावेळीं साडेपांचचा सुमार झालेला असतो. तेथें श्री सखाराम यशवंतराव कदम व श्रीराम लक्ष्मण पंडित हे त्यांचे मित्र वाट पाहात असतात किंवा त्यांना आपल्या मित्रांची वाट पहावी लागते. हे तिघे जमले म्हणजे केम्प कॉर्नरजवळून मलबार हिलकडे जाणारी चढण सरसर मागे जाते आणि मग हँगिंग गार्डनमध्यें प्रवेश होतो. तेथें वर्तुळाकार चार फेऱ्या घातल्यानंतर मंडळीचे पाय घराकडे वळतात. कित्येक वर्षें चालत आलेल्या या नित्यक्रमासंबंधीं दादासाहेब म्हणतात : सकाळचा गार वारा, पानाफुलांचा मंद गंध आणि हँगिंग गार्डनचा फेरफटका यांमुळें मनाला व शरीराला जी तरतरी येते ती दिवसभरच्या कामाचा बोजा पेलण्यास पुरेशी वाटते.

सुमारें तीन चार मैल चालून आल्यानंतर चहा, सिगारेट आणि वर्तमानपत्रें यांत ते रंगून जातात. त्यांच्या चौपाईवर एक इंग्रजी व दोन मराठी दैनिकें ठेवलेलीं असतात. शिवाय मासिकें येतात तीं वेगळींच. वर्तमानपत्रें वाचीत असतांनाच ते प्रकाश आणि उज्ज्वला यांच्या अभ्यासांतील अडचणींच्या जागा साफसूफ करतात. त्यानंतर दाढी. दादासाहेबांची दाढी वाढल्याचें कोणीहि पाहिलेलें नाहीं. ती व्यवस्थित झाल्यानंतर कॉफी व आंघोळ. स्नानोत्तर धोतर नेसून देवपूजा. त्यांच्या घरांत महादेवाची छोटी पिंडी आहे. रामकृष्णांच्या चांदीच्या मूर्ति आहेत. आणि दत्त आणि साईबाबांचीं चित्रें आहेत. गंध, फुलें, अक्षता आणि ऊदबत्त्या इत्यादि

साहित्यानें केलेल्या पूजेची सांगता व्यंकटेश-स्तोत्रानें पूर्ण होते. नंतर ते पाश्चात्य पद्धतीचा पोशाख चढवितात आणि फक्त कपभर दूध घेऊन बँकेला जातात. मधल्या सुटींत दोन सँडविचिस आणि पेलाभर ताक हा त्यांचा मधला आहार. संध्याकाळीं ते व श्री. गं. गो. गावडे हे दोघे मिळून मराठा मंदिरच्या कार्यालयांत सुमारें साडेसहाला येतात आणि तेथून साडे-आठला घरीं जातात. त्यावेळीं कोणीतरी कार्यकर्ता घरीं बहुधा वाट पहात असायचा. त्याचें काम आटोपून ते जेवायला उठतात. रात्रींचा आहारहि बेताचा. आणि मग प्रकाश, उज्ज्वला आणि ग्रामस्थ कार्यकर्ते यांची संयुक्त बैठक. कांहीं वेळानें मुलें झोपण्यासाठीं आंत जातात पण कार्य-कर्त्यांची बैठक अकरा साडेअकरा पर्यंत रंगलेली असते. झोपायला बहुधा बारा व्हायचे पण पहांटेचें फिरणें चुकायचें नाहीं.

लहानपणीं नाना चौकांत केलेला व्यायाम, नियमित तीनचार मैल फिरणें आणि मित आहार ह्या संवयीमुळें दादासाहेबांची प्रकृति छप्पन्नाव्या वर्षींहि हेवा वाटण्याइतकी चांगली आहे. ते धोतर नेसून व अंगांत मलमलीचें बनियन घालून घरीं बसलेले असले म्हणजे त्यांची पुष्ट मान, भरदार छाती, आणि पीळदार दंड यांचें दर्शन घडतें. या दर्शनानें कोणालाहि भास व्हावा, ह्या मनुष्यानें पूर्वाश्रमीं पहिलवानाचा पेशा तर पत्करला नव्हता !

त्यांनीं आखाड्यांत उतरून कुस्ती मारली नाहीं हें खरें. पण जीवनाच्या मैदानांत त्यांनीं फड जिंकला आहे. पति, पिता, मित्र, कलावंत आणि सामाजिक कार्यकर्ता अशा विविध भूमिकेंत. पण माणूस या नात्यानें त्यांचें जें चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें तें निश्चितच मनोज्ञ आहे. त्यांनीं प्रेमहीनांना प्रेम दिलें, निराधारांना आधार दिला आणि वाट चुकले त्यांना मार्ग दाखविला. दादासाहेब ज्यांना आपल्या सामाजिक कार्यांतील पहिले गुरु म्हणून मान देतात ते श्री. रा. ना. ऊर्फ अण्णासाहेब शिंदे त्यांच्यासंबंधी म्हणतात, " दादासाहेबांसारखा उपकारी माणूस विरळा. परोपकार करण्याची कोणतीहि संधि त्यांनीं वायां दवडली नाहीं. परिचितांच्या मुलांना शाळेंत घालायचें असो, लग्नें जुळवायचीं असोत, जुळविलेल्या लग्नांत हातभार लावायचा असो, पितापुत्रांतील भांडण मिटावयाचें असो, भांडलेल्या नवरा-बायकोची दिलजमाई करायची असो, शेजाऱ्यापाजाऱ्यांतील वाद तोडायचा असो,

जमिनीचे तंटे सोडवावयाचे असोत, कुणी पैशाअडक्याच्या अडचणींत असो—या सर्वांत त्यांचें तत्परतेनें यशस्वी सहाय्य व्हायचें. त्यांनीं कधीं कुणाचें वाईट चिंतिलें नाहीं कीं कधीं वाईट केलें नाहीं!"

गरीब विद्यार्थ्यांना त्यांनीं परोपरीनें सहाय्य केलें आहे. कोणाला पुस्तकें द्यावींत, कोणाला कपडे द्यावेत, तर कुणाची फी भरून टाकावी. नोकरी नसलेल्यांना नोकरी लावण्यांत त्यांचा विलक्षण हातखंडा. त्यांच्यामुळें कित्येकांना फर्स्ट नॅशनल सिटी बॅंकेंत प्रवेश मिळाला आणि ओळखीच्या अनेक व्यापारी कंपन्यांत अनेकांना नोकऱ्या मिळाल्या. त्यांचे एक स्नेही श्री. सखाराम यशवंतराव कदम म्हणतात, दादासाहेबांनी नोकरीस लावलेल्या लोकांची संख्या शेंसव्वाशेंच्या आसपास असावी असा माझा अंदाज आहे.

मुंबईतील व चिपळूण तालुक्यांतील सामाजिक व शैक्षणिक संस्थांना दादासाहेबांकडून जें आर्थिक सहाय्य लाभलें तेंहि लहानसहान नाहीं. त्यांनीं तीसचाळीस संस्थांना स्वतःच्या आर्थिक परिस्थितीला साजेशा देणग्या दिल्या आहेत. शिवाय संस्थांसाठीं नाटकांचे प्रयोग देऊन सहाय्य केलें आहे तें वेगळेंच. चिपळूण तालुका ग्रामविकास मंडळाचे सरचिटणीस श्री. राजाराम रामाजीराव शिंदे यांनीं केलेल्या नोंदीनुसार दादासाहेबांनीं स्वतः देणगी रूपानें मदत केलेल्या रकमेचा आंकडा वीस हजारांच्या घरांत जाईल इतका मोठा आहे. निरनिराळ्या संस्थांसाठीं जमविलेला निधी पाऊण लाखाच्या आसपास आहे. त्यापैकीं मराठा मंदिराचे आजीव सभासद या नात्यानें केलेला निधी रु. ३१,७९७ इतका मोठा आहे.

व्यक्ती आणि संस्था यांकडे दादासाहेबांच्या मनाची जी स्वाभाविक ओढ दिसते तिच्यांत एक वैशिष्ठ्य प्रकर्षानें प्रतीत होतें. तें म्हणजे त्यांची निष्ठा. त्यांना वाटणारा जिव्हाळा. व्यक्ति सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, दरिद्री असो वा धनिक असो, संस्था छोटी असो वा मोठी असो—जे जे त्यांच्याशीं जवळीक करतील त्या सर्वांकडे ते अत्यंत आत्मीयतेनें पाहतील. त्यांच्यासाठीं कष्ट करतील, धन वेंचतील. व्यक्ति किंवा पैसा असा प्रश्न जेव्हां उभा राहील तेव्हां ते हमखास निवड करतील व्यक्तीची. आणि म्हणून मुंबईचे कॉर्पोरेटर ॲड. रामचंद्र लक्ष्मण बेलोसे यांनी त्यांच्यासंबंधीं एकदां उद्गार काढले, आज मला लाख मोलाचा माणूस भेटला।

कांहीं वर्षांपूर्वी जयहिंद कॉलेजमध्यें श्री गं. गो. गावडे यांच्या अध्यक्षते-खालीं दादासाहेबांनीं बसविलेल्या "उद्यांचा संसार" या नाटकाचा प्रयोग झाला होता. त्यांत दादासाहेबांनीं बॅ. विश्रामची भूमिका केली होती. या प्रसंगीं भाषण करतांना श्री. गावडे यांनीं असे उद्गार काढले कीं, दादासाहेब मोरे आठ तास नोकरी करतात, नाटकें बसवितात, त्यांत भूमिका करतात; आणि इतकें करूनहि त्यांचें अनेक सामाजिक संस्थांत कार्य चाललेलें असतें. त्यांना हें सारें कसें जमतें याचेंच मला आश्चर्य वाटतें.

आणि दादासाहेब ज्या संस्थांत विनावेतन कामें करतात त्यांची संख्या तरी लहानसहान आहे काय! ते तुरंबवच्या श्री शारदा समाज सेवा मंडळाचे गेलीं पंचवीस वर्षें अध्यक्ष आहेत; ज्या तालुका ग्रामविकास मंडळाशी ८७ ग्रामसंस्था संलग्न आहेत त्याचे ते १९५५ पासून अध्यक्ष आहेत; चिपळूण तालुका मराठा शिक्षण परिषदेचे उपाध्यक्ष आहेत; क्षत्रिय मराठा ज्ञाति समाजाचे अध्यक्ष आहेत; मराठा मंदिरचे आजीव सभासद व वीस वर्षें सन्माननीय चिटणीस आहेत; मराठा विधवा-विवाह पुरस्कार मंडळाचे अध्यक्ष आहेत; राम मोहन इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थी संघाचे कार्याध्यक्ष आहेत; मराठा विद्यार्थी संघाचे आश्रयदाते आहेत; अखिल कोंकण फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष आहेत; क्षत्रिय मराठा सेवा संघ व मराठा समाज सेवा संघाचे सन्माननीय कार्यकर्ते आहेत; अखिल चंद्रराव मोरे समाजाचे अध्यक्ष आहेत; चिपळूणच्या डॉ. जी. एन्. दातार कॉलजचे फेलो आहेत; सह्याद्रि शिक्षण संस्थेचे सावर्डें हायस्कूल, रयत शिक्षण संस्थेचे शिरगांव विद्यालय, रामपूर एज्युकेशन सोसायटीचें मिलिंद विद्यालय आदि संस्थांचे आश्रयदाते, आजीव सभासद व हितचिंतक आहेत; सावर्डें विभाग मंडळाचे अध्यक्ष आहेत; नवजीवन नाट्यसंस्थेचे संघटक आहेत......दादा-साहेब इतक्या संस्थांशीं संबंध कसा ठेवतात याचें कोणालाहि आश्चर्य वाटण्या-सारखें आहे. वरील संस्थांशीं संबंध ठेवून त्यांतील कांही संस्थांचा ते दैनंदिन कार्यभार वाहतात याचें मर्म त्यांच्या उद्यमशीलतेंत आणि कामाच्या पद्धतींत आहे. जे कार्यकर्ते आपल्या हातांत सर्व संस्थांचे सर्वाधिकार ठेवण्याचा खटाटोप करतात त्यांना इतक्या संघटनांशीं नातें जोडतां येत नाहीं. दादासाहेबांच्या कार्यपद्धतीचा बाण साधारणतः कै. कर्मवीर भाऊराव

पाटील यांच्या कार्यपद्धतीच्या जातीचा आहे. कार्य उभें होईपर्यंत राबावयाचें, माणसें हेरायचीं, त्यांना कामाला जुंपायचें, अधिकार द्यायचे आणि वेळोवेळीं मार्गदर्शन करावयाचें. याच रीतीचा अवलंब दादासाहेबांनीं चिपळूण तालुक्यांतील कार्यांत केल्याचें आढळून येतें.

हीच पद्धति दादासाहेबांच्या प्रवृत्तीशीं मिळतीजुळती आहे. एखादा माजलेला बैल कर्दळीवनांत हुंदाडत, बेदरकारपणें कर्दळी तुडवीत जातो त्याप्रमाणें वैयक्तिक मोठेपणाच्या महत्वाकांक्षेनें झपाटलेले कांहीं सामाजिक व राजकीय कार्यकर्ते आपल्या पायांत काय आणि कोण तुडविलें जातें याचा विचार न करतां, आपले लक्ष्य गांठण्यासाठीं, मुसंडी मारीत सुटतात. अशी आसुरी महत्वाकांक्षा दादासाहेबांच्या मनाला स्पर्श करीत नाहीं. आणि म्हणून कार्यकर्ते त्यांना बुजून बाजूला सरकत नाहींत. ते प्रेमानें जवळ येतात.

कामाची कितीहि गर्दी असली तरी दादासाहेबांचा पोषाख कधीं गबाळा आलेला कुणी पाहिलेला नाहीं. ते ज्या अमेरिकन बँकेंत काम करतात तेथें पोषाखाचा नीटनेटकेपणा अपेक्षित नव्हे तर आवश्यक मानला जातो हें त्यांच्या व्यवस्थित पोषाखाचें मर्म असूं शकेल असें कांहीं मानतात. परंतु बँकेबाहेरहि त्यांच्या सर्वच कामांत टापटीप, व्यवस्थितपणा आणि शिस्त यांचा आढळ होतो हें लक्षांत घेतलें म्हणजे वरील गुण संपादित नव्हे तर अंगभूत असावेत असें मानण्याकडेच मनाचा कल होतो.

बँकेचे वरिष्ठ अधिकारी अमेरिकन असल्यामुळें दादासाहेबांचा त्यांच्याशीं नित्यसंबंध येणें स्वाभाविक अहे. शिवाय कामानिमित्त त्यांच्या अनेक पाश्चिमात्यांशींहि परिचय होतो. त्यांच्याबरोबर खाणेंपिणें होतें. परंतु दादासाहेबांनीं त्यांच्या समवेत नृत्यासाठीं एखाद्या क्लबमध्यें पाऊल टाकल्याचें कुणी पाहिलेलें नाहीं. स्त्रीपुरुषांचें नृत्य हें आपल्या भारतीय संस्कृतीशीं सुसंगत नाहीं असें ते म्हणतात. सकाळीं व्यंकटेश–स्तोत्र म्हणणाऱ्या भाविकानें संध्याकाळीं एखाद्या ललनेच्या नाजुक कटीभोंवतीं हात ठेवावा हे नाहीं तरी विसंगतच आहे.

त्यांना पाश्चात्य नृत्याचा मोह होत नाहीं हें खरें. पण पाश्चात्य वाङ्मयाबद्दल मात्र आकर्षण वाटतें. त्यांच्या छोट्याशा बॅगेंत एखादी इंग्रजी कादंबरी विशेषतः रहस्यकथा अनेकदां आढळून येते. विद्यार्थीदशेंत त्यांचें मराठी वाचन दांडगें होतें. पण आतां वर्तमानपत्रांच्या पलिकडे तें सहसा जात नाहीं. नाही

म्हणायला मराठी नाटकांचा व्यासंग मात्र त्यांनीं अखंडित चालू ठेवला आहे. त्यांचें नाटकाचें वेडच जबरें. दिवसां कामाची कितीहि दगदग झालेली असो, ते नाटकाची तालीम चुकवायचे नाहींत. ते म्हणतात, नाटकाची तालीम चालली असतांना मी माझ्या दिवसभरच्या कामाचा शीण पार विसरून जातों. श्रमपरिहाराचें तें एक साधन आहे.

दादासाहेब ताठर असल्याचा कांहींना केव्हां केव्हा भास होतो. हा अल्पकाळ टिकणारा अपसमज होण्याचें कारण असें कीं, दादासाहेब मानी आहेत. आपल्या स्वाभिमानावर आघात होत आहे अशी शंका त्यांच्या मनाला चाटून जातांच ते ताठरपणाचीं ढाल पुढें करतात. पण शंका दूर होतांच ती ढालहि दूर होते आणि गैरसमज विरून जातो.

दादासाहेब स्वतःसंबंधीं बोलतांना म्हणतात, "मी पूर्वीं फार संतापी होतों. आतां संताप ओसरत चालला आहे." या उलट, ते शांत व सोशीक असल्याचा त्यांचे मित्र व अनेक कार्यकर्ते निर्वाळा देतात. या मतभिन्नतेची संगति कशी लावायची ? अन्याय झालेला पाहिला, कार्यकर्त्यांनीं जमविलेले पैसे कार्यालयांत भरले नाहींत म्हणजे दादासाहेबांच्या संतापाचा पारा चढत असे हें खरेंच आहे. पण ते आपला संताप आवरून धरीत असत. त्याचा उद्रेक ते होऊं देत नसत. अलीकडे कार्यकर्त्यांच्या चुकांमुळें येणारा राग अत्यंत सौम्य असतो आणि तो व्यक्त मात्र कधींच होत नाहीं. आणि म्हणून त्यांच्या संतापाची झळ कोणालाच लागली नाहीं. अनुभवाला आली ती शांत वृत्तीची गार झुळूक !


दादासाहेबांचा अनेक लोकांशीं संबंध आलेला आहे. पण आपल्या मित्रांची संख्या मोठी नाहीं असें ते मानतात. "लहानपणीं व तारुण्यांत माझे मित्र मोजकेच होते आणि आतांहि मोजकेच आहेत." असें ते म्हणतात. या उलट, आम्ही दादासाहेबांचे स्नेही आहोंत असें म्हणणाऱ्या लोकांची संख्या फार मोठी आहे. दोन्हीहि विधानांत सत्यांश आहे. दादासाहेब जिव्हाळ्यानें वागतात, प्रेम करतात, मदतीचा हात पुढें करतात हें मित्रत्वाचेंच लक्षण नव्हे का ? आणि मग अनेकांना ते आपले मित्र वाटले तर त्यांत चूक काय ? परंतु ज्यांच्याशीं आंतरिक सूर जुळले, आत्मिक सुसंवाद झाला असे

लोक पुष्कळ नाहींत याची दादासाहेबांना अनेकदां जाणीव होते आणि म्हणून शेकडों 'मित्रां'त असे सुसंवादी महाभाग अल्पसंख्य असल्याचा त्यांना प्रत्यय आला तर तो वस्तुस्थितीशीं विसंगत आहे असें कसें म्हणतां येईल ?

आपल्या देशांत सुशिक्षित उच्चभ्रूंचा एक वर्ग निर्माण झालेला आहे. हे सुशिक्षित लोक स्वतःला फार मोठें मानतात. आपले आचार, विचार, आहार, विहार—आपलें सगळेंच वरच्या प्रातळीचें अशी त्यांची समजूत असते. ती पातळी सोडून खालीं येण्याची त्यांची तयारी असत नाहीं. अशिक्षितांशीं किंवा कमी शिकलेल्या लोकांशीं व्यवहार करणें त्यांना कमीपणाचें वाटतें. दादासाहेबांना या उच्चभ्रूंची चांगलीच ओळख आहे, त्यांच्याशी दाट परिचय आहे. पण त्यांच्या मालिकेंत बसण्याची दादासाहेबांची तयारी असत नाहीं. कारण त्यांना जवळीक वाटते ती बहुजन समाजाची. समाजाच्या खालच्या थरांत वावरतांना त्यांना संकोच तर वाटत नाहींच, उलट एक प्रकारचा आनंद होतो. आणि म्हणून तुरंबवकरांचें मुंबईंत लग्नकार्य असो, सत्यनारायणाची पूजा असो किंवा अन्य समारंभ असो त्याला ते न चुकतां हजर राहतील. केवढेंहि महत्त्वाचें काम असो, रात्र झालेली असो कीं पाऊस कोसळत असो दादासाहेब टॅक्सी करतील आणि वधूवरांवर अक्षता टाकून येतील किंवा सत्यनारायणाच्या प्रसादाचा द्रोण घरीं आणून वत्सलाबाईंच्या हातीं देतील.

दादासाहेबांनीं तुरंबव येथें एक बंगली उठवली आहे. प्रतिवर्षी मे महिन्यांत त्यांचे पाय या बंगलीकडे वळतात. बंगली आहे ऐटबाज. पण ती गांवकऱ्यांशीं फटकून वागत नाहीं. तेथें तुरंबवकर शेतकऱ्यांचा आणि चिपळूण तालुक्यांतील कार्यकर्त्यांचा अखंड राबता असावयाचा. दादासाहेबांनी या सर्वांचें आदरातिथ्य करावयाचें. आलेल्या पाहुण्यांना पेल्यांतून स्वतः पाणी द्यावयाचें, सुपारी स्वतःच कातरून हातावर ठेवावयाची आणि मांडीला मांडी लावून हितगुज करावयाचें. सगळें कांहीं समपातळीवर. जातिपातीचें बंधन नाहीं, गरीब-श्रीमंत भेद नाहीं, उच्च–नीच भाव नाहीं.


ही एकरूपता ज्यांना कित्येक दिवस पहावयाला मिळाली ते अण्णासाहेब शिंदे म्हणतात, "दादासाहेबांनी जनतासंपर्क साधला आहे तो अशा



श्री. दादासाहेब यांना जे. पी. पद मिळाल्याबद्दल फर्स्ट नॅशनल सिटी बँकेतर्फे सत्कार



जे. पी. हा बहुमान मिळाल्याबद्दल तुरंबवकरांतर्फे सत्कार



श्री. अण्णासाहेब शिंदे



श्री. बाबासाहेब गावडे



श्री. दादासाहेब मोरे

**दोन गुरु आणि एक शिष्य**

जिव्हाळ्यानें. आणि म्हणून तुरंबवभोंवतालच्या चाळीस-पन्नास गांवांची त्यांच्यावर श्रद्धा आहे. मोठा आदर आहे. शब्दाला मान आहे. दादासाहेबांचा शब्द म्हणजे देवाचा शब्द !"

चिपळूण तालुक्यांतील त्यांच्या ह्या लोकप्रियतेची ज्यांना ओळख आहे ते लोक म्हणतात, "दादासाहेब विनासायास आमदार म्हणून निवडून येतील." दादासाहेबांनीं कोणत्याही राजकीय पक्षाचा गंडा आपल्या हातांत बांधलेला नाहीं हें खरें असलें तरी त्यांचा कल काँग्रेस पक्षाकडे आहे हें निश्चित. परंतु ज्यावर सतत प्रसिद्धीचा प्रकाशझोत टाकलेला असतो तें राजकीय क्षेत्र त्यांना आकर्षित करूं शकत नाहीं. राजकारणाकडे त्यांनीं जणुं पाठच फिरविली आहे. परंतु भविष्यकाळाच्या उदरांत काय सांठवून ठेवलें आहे तें कुणी सांगावें ?

प्रजासत्ताकदिनीं (१९६५) महाराष्ट्र राज्यातर्फे त्यांना जे. पी. हा बहुमान मिळाला. ही संधि साधून तुरंबवचे लोक आणि त्यांच्या बँकेतील स्नेही व अधिकारी त्यांचा सत्कार करावयास कसे विसरतील ? मराठा मंदिरानें आणि इतर संस्थांनीं त्यांच्या कार्याचा यापूर्वीच गौरव केला होता. आपल्या सत्कार प्रसंगीं दादासाहेब नेहमींच्या शिरस्त्यानुसार दुसऱ्यास बोलावयास देतात अधिक आणि स्वत: बोलतात कमी. पण त्या आटोपशीर भाषणांत एका गोष्टीचा ते आवर्जून उल्लेख करतात. ते म्हणतात, "दत्तानें अनेक गुरु केले. पण माझे गुरु दोन. एक अण्णासाहेब शिंदे आणि दुसरे बाबासाहेब गावडे. अण्णासाहेबांनीं मला सामाजिक कार्याची दीक्षा दिली आणि बाबासाहेबांनीं त्या क्षेत्रांत वाटचाल करावयास प्रोत्साहन दिलें." त्यांच्या भाषणांत देशभक्ति, देशसेवा, देशप्रेम, समाजकार्य, इत्यादि सवंग शब्दांची पेरणी केल्याचें आढळून येत नाहीं. भाषेची कोठेंहि आतषबाजी केलेली दिसत नाहीं.

आतषबाजी हा दादासाहेबांचा धर्मच नव्हे. ती त्यांच्या वृत्तीलाच परकी आहे. त्यांचें व्यक्तिमत्त्व लग्नाच्या मिरवणुकींतील दारूकामासारखें स्फोटक नाहीं. दिवाळींतील फुलबाजीसारखें झळझळीत नाहीं. तें आहे देवळांतल्या पणतीसारखें शांत ! सुप्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार जॉन गाल्सवर्दीच्या गद्यासारखे निर्मळ आणि लयबद्ध. बाबुराव पेन्टर यांच्या रंगाकृतीसारखें

गोंडस आणि हळुवार. चंद्राच्या प्रकाशासारखें शीतल!...... उग्रप्रकृति चंद्रराव मोऱ्यांच्या वंशांतील हें चांदणें. काळोख उजळणारें चांदणें! त्याची शीतलता विसावली आहे मराठा मंदिरावर, फर्स्ट नॅशनल सिटी बॅंकेवर, नाट्य नवजीवन संस्थेवर, सोनावाला बिल्डिंगमधील संसारावर, तुंबवच्या पूलसाकवांवर आणि श्री शारदा देवीच्या परिसरांत नृत्य करणाऱ्या मयूरांवर!

(लेखनकाल: ३ एप्रिल ते १३ जून १९६५)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 14486
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, ग्रंथालय.
अनुक्रम... 38209 दि: 
क्रमांक ... नोंद दि: 23/11/85
REFBK-0014486